ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय ...... आहक
ना. क्र. २९४६२

IRBK-0121462

२१४६२
३।८।८६

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २१४६२ नों. दि. ३।८।८६
वि. नाटक

मालवणी

# ‘सौभद्र’

( दोन अंकी विनोदी विडंबन )

जयवंत दळवी

IRBK-0121462
IRBK-0121462

प्रकाशक
सौ. सुभद्रा विष्णू परचुरे
परचुरे प्रकाशन
' मेहता भवन '
३११ राजा राममोहन रॉय मार्ग
गिरगाव, मुंबई ४०० ००४

मुखपृष्ठ : मोहन वाघ / कमल शेडगे

© सौ. उमा दळवी १९८५

प्रथमावृत्ती १४ नोव्हेंबर १९८५

मुद्रक
अजित शशिकान्त देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे : ४११ ०३०

मूल्य २० रुपये

या नाटकाच्या तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी लेखी परवानगीसाठी—
जयवन्त दळवी / १३, विकास, भवानी शंकर रोड मुंबई २८

मुळात मालवणी बोलीत लिहिलेले हे नाटक येथे वाचनाच्या सोयीसाठी मराठीत प्रसिद्ध केले आहे. याचे प्रयोग मालवणीप्रमाणे मराठीतही करता येतील.

'मालवणी सौभद्र' या नाटकाचा प्रथम प्रयोग 'मंगलमूर्ती', मुंबई या संस्थेतर्फे गुरुवारी, २६ सप्टेंबर १९८५ रोजी गडकरी रंगायतन, ठाणे येथे संध्याकाळी ४ वाजता सादर करण्यात आला.

दिग्दर्शक : **लीलाधर कांबळी**

नेपथ्य–प्रकाश : **मोहन वाघ**

बाबूराव / सूत्रधार / कृष्ण / सुभद्रा–मच्छिन्द्र कांबळी

अर्जुन–उल्हास सावंत / सुभद्रा–नयना आपटे / नारद / सारंग नयना– दिलीप कांबळी / बाळ्या / दवंडीवाला– लवराज कांबळी / नटी / रुक्मिणी– संजीवनी जाधव / दत्तू–रघुवीर पाटकर / माणूस / द्वारपाल–रामकृष्ण गाडगीळ / राक्षस – जनार्दन पाटील / बलराम – प्रमोद कोरगावकर / दादा रेडकर – अशोक इंदुलकर / गर्गमुनी–विष्णु सावंत

म. ग्रं. सं ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २१७६२ ता. दि ३।७।८८
वि. नाटक क्र. ..................

# अंक पहिला

[ प्राथमिक घोषणा. बाहेरचा मोठा पडदा वर जातो. आत आणखी एक रंगमंच आहे. आणि त्या मंचावरचा पडदा पडलेला आहे. पडद्याची दोरी धरून सोळा-सतरा वर्षांचा बाळ्या कोपऱ्यात उभा आहे. पडदा तारेवर सरकणारा आहे. त्याला दोन दोऱ्या आहेत. पडदा ओढ म्हणताच बाळ्या एक दोरी ओढतो. पडदा उजवीकडे जातो. पडदा टाक म्हणताच बाळ्या दुसरी दोरी ओढतो. पडदा डावीकडे जातो. परंतु दोन्ही स्थितीत प्रेक्षकांना रंगमंचावर काय चालले आहे ते दिसते.

रंगमंचाच्या बाहेर ऑर्गनवाला आणि तबलजी बसले आहेत. त्यांच्या पुढ्यात ऑर्गनही नाही आणि तबलाही नाही ! पण प्रत्यक्षात सगळे पुढ्यात असल्यासारखे ते उत्तम ‘ मायमिंग ’ करतात. आणि त्यांच्या हावभावाप्रमाणे टेपवरून योग्य ते आवाज येतात. उदाहरणार्थ, ऑर्गनवर बोट दाबताच सूर ऐकू येतो. तबलजी काल्पनिक हातोडी मारतो आणि तबला लावतो तेव्हा ते ते आवाज येतात. त्या दोघांची रंगभूषा जुन्या दशावताऱ्यांची आठवण करून देईल अशी आहे. आसपास प्रेक्षकांची गर्दी असल्याचा आभास. नाटकाचा प्रयोग उघड्या मैदानात आहे. प्रेक्षकांचा गोंगाट, त्यांचे हसणे, खोकणे, त्यांची अधून मधून विनोदी शेरेबाजी हे सर्व टेपवर योग्य वेळी ऐकू येते. तसेच त्या शेरेबाजीला लोक हसतात, टाळ्या मारतात त्याचाही टेपवर योग्य वेळी आवाज ऐकू येतो.

रंगलेली पात्रे रंगमंचावर नमनासाठी जमत आहेत. तेवढ्यात बाबल्या उर्फ पी. बाबूराव येतो. हा नाटकाचा डायरेक्टर आहे. तो पँट, शर्ट, कोट, टाय वगैरे

पोषाख करून येतो. त्याच्या गळ्यात शिट्टी आहे. तो नर्व्हस झालेला असल्यामुळे शिट्टी फुंकण्यासाठी तोंडात धरतो. पुनः ती न फुंकता बाहेर काढतो. हातात एक कागद आणि मायक्रोफोन. पहिल्या प्रयोगाआधी कुठलाही डायरेक्टर घाबरतो तसा तो घाबरलेला आहे. तो बाहेर काही ऐकू जाऊ नये म्हणून मायक्रोफोनवर हात धरून बाळ्याला हाक मारतो. ]

**बाबूराव** : बाळ्याऽऽ रे बाळ्या–

**बाळ्या** : (पडद्याबाहेरून) बाबल्या, काय रे?

**बाबूराव** : (चिडून, पण आवाज मारून) मायझंया, बाबल्या म्हणू नकोस मला! पी. बाबूराव म्हण! डायरेक्टर आहे मी....तू तिथं काय करतोहेस?

**बाळ्या** : मी पडद्यावर आहे इथे–

**बाबूराव** : आहे ना, ठीक आहे! लघवीला जाऊ नकोस हां मध्येच! आणि मी शिट्टी मारल्याशिवाय पडदा उघडू नकोस!

**बाळ्या** : घाबरू नकोस! तू फक्त शिट्टी मार– (प्रेक्षकातून शिट्ट्या ऐकू येतात.)

**बाबूराव** : बाळ्या, ही माझी शिटी नव्हे हां! उघडू नकोस पडदा–वाजंत्री जागेवर आहेत का? (ते एकदम सूर काढतात. बाबूराव मायक्रोफोनवर) रंगदेवता आणि रसिक प्रेक्षक यांना अभिवादन...(चुकल्याची जाणीव होऊन कागद बघतो....) यांना नम्र... विनम्र अभिवादन करून मुंबईतील मालवणी कलाकार कोकणग्रस्त पुराच्या मदतीसाठी (लोक हसतात. गडबडून कागद बघत) सॉरी.... पूरग्रस्त कोकणच्या मदतीसाठी सहर्ष सादर करीत आहेत– दोन अंकी पौराणिक नाटक ‘ संगीत सौभद्र ’ (गॉंग). लेखक– अण्णासाहेब किर्लोस्कर. दिग्दर्शक– पी. बाबूराव, पी. बाबूराव यांनी मुंबईत सरकारी नाट्यशिबिरात शिक्षण घेतले असून त्यांनी प्रख्यात दिग्दर्शिका विजया मेहता यांच्या हाताखाली दिग्दर्शनाचे काम केले आहे. लवकरच ते ‘ मालवणी सौभद्र ’ नाटक घेऊन पूर्व जर्मनी, इंग्लंड, अमेरिका...

**प्रेक्षक** : (ओरडतात...) ते सगळं राहू द्या हो! नाटक सुरू करा.... नाटक सुरू करा–

**बाबूराव** : (गडबडून) सादर करीत आहोत– ‘ मालवणी सौभद्र ’... लेखक– पी. बाबूराव...सॉरी....दिग्दर्शक– पी. बाबूराव...(हळूच) बाळ्या पडदा उघडू नकोस हां! (शिट्टी तोंडांत धरतो आणि नमनासाठी हातवारे करतो– कंडक्टर करतो त्याप्रमाणे! कलावंत माना आणि तोंडे हालवतात. नमन टेपवर ऐकू येते. बाहेर ऑर्गनवाला आणि तबलजी रंगात येऊन मायमिंग करतात.

पद– ‘ नमुनि ईशचरणा । करिन मग गजाननाच्या पादस्मरणा ॥
नमुनि ईशचरणा । ’
तेवढ्यात आतून धावत धावत नारद येतो. )

नारद : ( गडबडीने– ) थांबा....थांबा रे !....बाबल्या, अरे शिट्टी नको मारू रे बाबल्या–

बाबूराव : ( गडबडून ) झालं काय ?

नारद : तुझ्या आवशीचो घो !

बाबूराव : ( चिडून ) कानफटात देईन एक ! डायरेक्टर आहे मी– लक्षात ठेव ! नारद झालास म्हणून मिजास करतोस की काय ?

नारद : ( चिडतो ) बाझंवतं तुझं डायरेक्शन ! ( सगळ्यांना सांगत) डायरेक्शन करतोय....नाटक सुरू झालं तरी सुशीचा नाही पत्ता–

बाबूराव : ( गडबडून–टायची गाठ सैल करीत. ) सुशी कोण ?

नारद : ध्या ! सुशी कोण ! दादाची बहीण ! मुंबईहून मारे आणलीत.... सुभद्रेचं काम करायला ! ‘ सौभद्र ’ करताहेत...सुभद्रेचा नाही पत्ता !

बाबूराव : ( एकदम बडबडतो. ) अरे, म्हणतोस काय तू ! आवशिक खांव ! आता रे काय करायचं ? ( तरीही गाण्याची टेप चालूच आहे. आणि पात्रांचे मायमिंगही चालूच आहे. त्यांच्या पॉजीसमध्ये वरील संवाद. बाबूराव चिडतो. ) अरे मेल्यानो, तुम्ही तोंडं का हालवताय...सुभद्रेचा नाही पत्ता !

सूत्रधार : ते तू आम्हाला काय सांगतोस ? आधी टेप बंद कर ! टेप बंद केल्याशिवाय आमची तोंडं कशी बंद होतील ? ( तोंडे आणि माना हालवणे चालूच ! )

बाबूराव : ( विंगेत बघून ) सखारामा, तू काय इथं तुझं लगीन लावतोहेस ?

सखाराम : ( आतून– ओरडल्यासारखा ) झालं काय ?

बाबूराव : ( चिडून ) अरे मेल्या, आधी टेप बंद कर ! (सखाराम टेप बंद करतो. तरी पात्रांचे मायमिंग चालूच... भडकतो. ) अरे, तुमच्या गांडीवर आता लाथा हव्यात ? तोंडं कसली हालवताय ? ( काल्पनिक पडद्यातून तोंड बाहेर काढून ऑर्गनवाल्याला– आणि तबलेवाल्याला– कारण त्यांचे मायमिंग चालूच आहे. ) अरे, तुम्ही काय माझ्या मर्तिकाचं बँड वाजवताय ? ( ते ऑर्गन, तबला बाजूला केल्याचे मायमिंग करतात आणि उठून जातात. )

सूत्रधार : झालं काय ?

बाबूराव : ( डोक्यावर हात मारीत ) आजी खपली माझी !

सूत्रधार : अरेरे ! वाईट झालं ! आजारी होती का ? ( बाबूराव चिडून अता जातो. )

नारद : ( सूत्रधाराला ) तू शुद्धीवर आहेस ना ? सुशीचा नाही पत्ता.

सूत्रधार : तिची लक्षणं बरी दिसत नव्हतीच ! तिचे अर्जुनाबरोबरचे चाळे–प्रेमाचे चाळे म्हणजे त्या खऱ्या अर्जुनाबरोबर त्या खऱ्या सुभद्रेनेसुद्धा केले नसतील !

नारद : चार दिवसांपूर्वी मी त्या दोघांनाही देवळात...अगदी रेडहँडेड पकडलं होतं.

सूत्रधार : ( आंबट शौकिनपणे ) काय, काय करीत होती ?

नारद : ( गंभीरपणे ) प्रदक्षिणा घालीत होती.

सूत्रधार : हात्तिच्या ! एवढंच ना ?

नारद : बापट, प्रदक्षिणा घालता घालता...

सूत्रधार : घालता घालता काय ? ( गडबडीने बाबूराव येतो. )

बाबूराव : ( चक्रावून ) काय घालता घालता ?

सूत्रधार : प्रदक्षिणा ! अर्जुन आणि सुशी !

बाबूराव : ( चिडून ) बापट, तुला काही वेळकाळ आहे ? सुभद्रेचा नाही पत्ता ! तो भोसडीचा अर्जुन कुठं गेला ? (हाका मारीत–) अर्जुना... अर्जुन .... (तेवढ्यात प्रवासी वेषातला अर्जुन रेंगाळत रेंगाळत येतो.)

अर्जुन : आता सुरू करा ना रे–आम्हाला पहाटेची एस्टी पकडून मुंबईला जायचं आहे.

बाबूराव : आवशीचो घो तुझ्या ! अरे पडदा उघडायची वेळ आली तरी त्या लागोऱ्याचा... सुभद्रेचा पत्ता नाही–

अर्जुन : (तडकतो) बाबल्या, तिला लगोरा म्हणायचं काम नाही ! याद राखून ठेव ! डायरेक्टर झालास मोठा म्हणून मी ऐकणार नाही !

बाबूराव : (नरम होत–) अरे पण ती गेली कुठं ?

अर्जुन : गेली कुठं ते मला काय माहीत ?

नारद : आता मला काय माहीत ? तालमीच्या नावाने दोन महिने सगळे चाळे केलेत... आणि आता मला काय माहीत ?

अर्जुन : कसले चाळे केले रे ? कसले चाळे केले ? (नारदाच्या अंगावर जातो.)

नारद : सांगू सगळयांना ? प्रदक्षिणा घालतांना (अर्जुन फाडकन् त्याच्या मुस्काटात मारतो–) अरे...अरे... तू मारतोस म्हणजे काय ?

अर्जुन : (संतापून) मारतोस ? लाथेनं तुडवीन ! मोठा कळीचा नारद झालास म्हणून कळी लावतोस की काय ?

नारद : तू काय स्वतःला पांडवातला अर्जुन समजतोस? साधा बीईएस्टीचा बस–ड्रायव्हर आहेस हे लक्षात ठेव.

अर्जुन : आणि तू कोण? साधा संपावरचा कामगार–

बाबूराव : (त्यांना सोडवीत... हात जोडून) अरे, बाबांनो, भांडू नका! एकदा हे 'सौभद्र' बरेपणी पार पडू दे! पूरग्रस्तांसाठी लोकांचे पैसे घेतले आहेत... अर्जुना, तू आत चल, बघूया– (अर्जुनाला आत घालवतो.)

नारद : (गाल चोळत) मोठा स्वतःला अर्जुन समजतो! आडवा पाडीन आणि पोटावर बसेन–

बाबूराव : उद्या बस! आता सुभद्रेचं काय ते बघ–

नारद : तिचं मी काय बघणार?

सूत्रधार : सुभद्रेला गाळली तर? तिची मिजास नको... गाळून टाका–

बाबूराव : बापट, तू जरा गप्प राहशील? सुभद्रेला गाळून सौभद्र?

नारद : रुक्मिणी करते काम का बघ सुभद्रेचं काम–

बाबूराव : (गोंधळून) रुक्मिणी कोण?

नारद : असं काय? नाटकात रुक्मिणीचं काम करते ती ..मंदा मातोंडकर!

बाबूराव : (त्याला आशेचा किरण दिसतो–) चालेल...जमेल! रुक्मिणी कुठं गेली? रुक्मिणीला बोलाव– (लोक बाहेर गडबड करतात.)

सूत्रधार : एऽऽ मंदा....ए मंदाऽऽ रुक्मिणी... (हाका मारीत आत जातो.)

बाळ्या : (बाहेरून....कंटाळून) बाबल्या, मी पडदा उघडू?

बाबूराव : (चिडून...खेकसत–) बाळ्या, तू जरा गप्प रहाशील ?

बाळ्या : (वैतागून) आता शिट्टी मार ना रे–

रुक्मिणी : (बाहेर येत–) काय झालं?....ही सुशी कुठं गेली? (तिच्या हातात नाटकाचे चोपडे आहे!)

बाबूराव : ती गेली मसणात! तू असं कर....तू आता सुभद्रेचं काम कर–

रुक्मिणी : बाबल्या, तू शुद्धीवर आहेस ना? की घेऊन (दारू) आलाहेस?

बाबूराव : काय झालं?

रुक्मिणी : काय झालं काय? माझे रुक्मिणीचेच संवाद नाहीत पाठ!

बाबूराव : (गयावया करीत) मी प्रॉम्पटिंग करतो ग–आजची रात्र जरा मारून ने–

रुक्मिणी : मला ही तीन कामं झेपायची नाहीत!

बाबूराव : तीन कुठली?

रुक्मिणी : सूत्रधाराबरोबर नटीचं काम मलाच आहे!...शिवाय रुक्मिणी! आणि माझे एकीचेही संवाद धड पाठ नाहीत....(फिरत पाठ करते.)

बाबूराव : ( गयावया करीत- ) अग, मंदा, तू असं काय करतेस? कामगार रंगभूमीवरची अभिनेत्री तू....आजच्या रात्रीपुरती ग.

रुक्मिणी : छे....छे ! असली जबरदस्ती केलीस तर ही मी चालले ! मला हे रुक्मिणीचं सुद्धा काम नको ! सुभद्रेच्या कामासाठी म्हणून तू मला आणलंस....आणि दिलंस काम रुक्मिणीचं !

बाबूराव : ते आता जाऊ दे ग ! या मायझंया अर्जुनानं मला तोंडघशी पाडलं- ( तेवढ्यात पडदा बाजूला करून बाळ्या येतो. लोकांचा बाहेर गोंगाट वाढतो. )

बाळ्या : झालं काय आता ?

बाबूराव : अरे ती लागोरी सुशी कुठं बेपत्ता-

बाळ्या : सुशी कोण ?

बाबूराव : सुभद्रा झालीय ती-आता ऐन वेळेला सुभद्रा कुठनं आणणार ?

बाळ्या : आमची दशावतरातली सुभद्रा घे ना रे-

बाबूराव : बरी आहे ? ( उत्साहित होतो. )

बाळ्या : बरी म्हणजे काय ? नंबरी माल !

बाबूराव : मग आण जा ना लवकर-

बाळ्या : आत्ता घेऊन येतो- ( धावत जातो. )

बाबूराव : माझा जीव खाली आला ! आता येऊ दे त्या सुशीला ! बरोबर दाखवतो तिला ! (नाटक सुरू करण्यासाठी लोकांचा गोंगाट. बाबूराव काल्पनिक पडद्यातून डोके बाहेर काढतो. बोलता बोलता त्याच्या तोंडावर भजी वगैरे फेकल्याचा तो आविर्भाव करतो. पडद्यात तोंड लपवतो. परत तोंड बाहेर काढतो. ) गाववाल्यांनो, जरा सहन करा ! ( गोंगाट - 'नाटकाचं काय...?' 'नाटक सुरू करा...!' 'नाहीतर आमचे पैसे परत करा !' ) थांबा...थांबा ! इतका वेळ मेहरबानी करून थांबलात ! आता आणखी पाच मिनिटं थांबा...आमच्या सुभद्रेला ( आवाज- 'महिना आला ?' ) नाही हो ! जरा उशीर झाला ! (लोक अधिक गोंगाट करतात. बाबूराव तोंडावर भजी वगैरे आल्याचा अभिनय करतो आणि तोंड पडद्यात लपवतो. तोपर्यंत बाळ्या आला आहे. बाळ्याबरोबर एक इसम येतो. कमरेला टॉवेल गुंडाळलेला. फाटका गंजीफ्रॉक. गालफडे बसलेली... काळा....ओबडधोबड, डोक्याला छोटा टॉवेल गुंडाळलेला, विडी फुंकतो आहे. )

बाबूराव : ( चमकून ) कुठं रे गेली तुझी सुभद्रा, बाळ्या ?

बाळ्या : ही काय ! हा दत्तू कांबळी-

बाबूराव : (निराश होत) हा कशाला?

बाळ्या : म्हणजे काय? हीच सुभद्रा! अरे, तू ह्याच्या तोंडावरून जाऊ नकोस! त्याचं काम बघ! (बाबूराव दत्तूला चारी बाजूंनी फिरून बघतो. आणि नाउमेद होतो.)

नारद : बाबल्या, आता वेळ काढू नकोस! ह्या दत्त्याला उभा कर! एकदा का हाही हातचा गेला की, बाबाही नाही आणि पुडियाही नाही असं होणार! (बाळ्या बाहेर जातो आणि पडद्याची दोरी धरून उभा रहातो.)

बाबूराव : तसं नव्हे रे! सुभद्रेचं काम म्हणजे बाईचं काम-! नाही?

नारद : काय ते? दत्तू कांबळी? सांगतोस काय? हा एकदा लुगडं नेसला की अर्जुनालासुद्धा कळायचं नाही लुगडं सोडीपर्यंत! हा दत्तू की सुभद्रा! हांऽऽ त्याची मी गॅरंटी देतो! (दत्तू खूष होऊन हसतो.) लुगडं सोडल्या-वर मग अर्जुन कुल्ल्याला पाय लावून पळेल ती गोष्ट वेगळी! (बाबूराव क्षणभर विचारात पडतो.)

दत्तू : (विडी फुंकत) बेगिन काय ता ठरंया! सुभद्रेचा लुगडा नेसा का नको?

बाबूराव : आणि मिशांचं काय? की मिशियाळी सुभद्रा?

दत्तू : (वैतागून) मिश्या काढू या हो! मिशांचं काय मोठंसं! गेला महिनाभर भीमाची आणि रावणाची कामं होती म्हणून ह्या मिशा? नाहीतर मुळातला मी स्त्रीपार्टीच!

बाबूराव : (नाइलाजाने-) मग नेस जा लवकर लुगडं! आणि आधी मिशा काढून ये! (दत्तू आत जातो.)

नारद : आमचा हा दत्तू काम करणारा जबरा! ह्याचं काम मुंबईकर बघतील तर? तोंडात बोटं घालतील-

बाबूराव : (चिडून) त्यांनी हवी तिथं बोटं घालू देत! तू तिसरी घंटा दे-

नारद : तिसरी घंटा मघाशीच झाली!

बाबूराव : तू चौथी दे- (तेवढ्यात दत्तू कांबळी लुगडे नेसत येतो. त्याने चोळी घातलेली आहे. पण गाठ मारलेली नाही!)

दत्तू : बाळो खंय गेलो? (मोठ्याने) बाळ्या, तू रे खंय खवासलंय?

बाळ्या : (बाहेरून) मी हंय पडद्यार आसंय मरे! उघडू?

दत्तू : तू आधी हंय ये- (बाळ्या उडी मारून वर जातो.) बाळ्या, ह्यां बघ... जरा समोरच्या बेकरीत जा- धावत जा आणि दोन कडक पाव घेऊन ये जा-

बाबूराव : (चिडून) दत्त्या, मी तिसरी घंटा देतोय-

दत्तू : (शान्तपणे-) दी मरे-

बाबूराव : (चिडून) दी मरे काय? तू नाटक संपल्यावर पाव खा ना रे! आता ही काय पाव खायची वेळ झाली?

दत्तू : (बाळ्याला –) तू मेल्या, बेगिन पळ जा रे – (बाळ्या जातो. बाबूरावाला– ) पाव खावूक न्हय रे–

बाबूराव : मग?

दत्तू : सुभद्रेच्या चोळीत काय घालू?

बाबूराव : दोन करट्या घाल ना रे–

दत्तू : करट्या? मला काय तू रुपया – दीड रुपयेवाली सुभद्रा समजलास की काय? मी नाय घालीत कधी करट्या! करट्यो कधी कोणाक दावीनशो दिसतंत?

बाबूराव : असू दे! तू आधी धड नेस!... नाहीतर सुटेल ऐनवेळेला!

दत्तू : (हसतो–) मग द्रौपदीवस्त्रहरण!

नारद : मेल्याच्या जिभेला हाड नाही!

दत्तू : (समजावीत) तसं नाही रे! मी चोळीत कधीच करट्या घालीत नाय! समजलां मा? सुभद्रेचा काम असू दे, नाहीतर रुक्मिणीचा असू दे! नाहीतर मंदोदरीचा असू दे! कडक पाव! शूर्पणखेचा काम असला तर चार चार कडक पाव–

नारद : म्हणतोस काय? (बाबूराव अस्वस्थ होतो.)

दत्तू : मग? अन्तोनच्या बेकरीचे पाव....कडक पाव हां ऽ ऽ माझ्या चोळीच्या मापाचेच पाव करतो तो! दाबले तर कुरुकुरू आवाज इला पाहिजे!

नारद : आणि ऐंशी वर्षाच्या म्हातारीचं काम असलं तर?

दत्तू : (मुद्दाम– ) मी माझा घरचा पीठ भिजवून पातळ लिबलिबीत करून आणतो! समजला ना? (सगळे हसतात. बाहेर प्रेक्षकांचा गोंगाट.)

बाबूराव : (चिडून) दत्त्या, तू आधी मिशा काढून ये बघू!...बाळ्या कुठं मेला? कोणी तरी तिसरी घंटा द्या ना रे!...बाहेर लोक ओरडताहेत– (बाळ्या धावत येतो. त्याला धाप लागली आहे. त्याच्या हातात दोन छोटी बटर–बिस्किटे आहेत.)

बाळ्या : दत्त्या, कडक पाव संपले! ही बटर–बिस्कुटां आणलंय!... कडक आसत! (दोन छोटी बिस्किटे समोर धरतो.)

दत्तू : बाळ्या, तुझा मस्तक ठिकाणावर आहे ना? ही कुत्र्याक घालूची बिस्किटा मी सुभद्रेच्या चोळीत घालू?

बाळ्या : अरे, पण तो अंतोन कडक पाव संपले म्हणता–

दत्तू : म्हणून काय ही बिस्किटा सुभद्रेची? मेल्या बाळ्या, सुभद्रेचा वय काय?

ही बिस्किटां म्हणजे ( बिस्किटे घेतो आणि निरखून मुठीत आवळून बघत– ) अंदाजे सरासरी धा वर्षांची सुभद्रा समज !.... म्हणजे पुढची सात-आठ वर्षा अर्जुनाक काय कामधंदोच नाय ? बाळ्या, तू जाऊन अंतोनीक सांग– दत्तू कांबळी पाव मागतोहे...दत्त्याची साइझ दे म्हणूचा ! ( बाळ्या जातो. दत्तू बिस्किटे कुडुम कुडुम खातो. )

बाबूराव : ( अस्वस्थ– ) दत्त्या, तू सौभद्र करणारेस की पावभद्र ? हे तुझं चाललंय काय ? . आणि तुझे संवाद पाठ आहेत ?

दत्तू : आम्ही तुमच्या मुंबैच्या सरकारी शिबिरातले नट नाही ! समजलां मा ? त्यामुळे आम्हाला संवादाचा भय नाय ! सुभद्रा अंगात शिरली म्हणजे सुभद्रेचे संवाद...भीम अंगात शिरला म्हणजे भीमाचे संवाद ! हनुमान अंगात शिरला म्हणजे...

बाबूराव : ( चक्रावून ) 'सौभद्र' नाटकात भीमही नाही...आणि हनुमानही नाही !

दत्तू : नाय तर नसो ! पण एक आपला सांगतो... तुमी भीमाचं काम म्हणाल तर ते पण करून दाखवीन.

बाबूराव : पण आज फक्त सुभद्रेचं काम आहे.

दत्तू : असू दे ! तुम्ही काळजी करू नकात ! ( सहज म्हणून ) अर्जुन आलाय ?

नारद : दत्त्या, अर्जुन आलाय हांऽऽ ! नाहीतर तू त्याचंही काम करशील ! दत्त्याचा काही नेम नाही !

बाबूराव : तू सुभद्रेच्या संवादावर नजर फिरवणार का ?

दत्तू : वाचायला कोणाला येतेय ? ( तेवढ्यात बाळ्या दोन पाव घेऊन येतो. ) मिळाले रे ?

बाळ्या : हे दोनच फळीवर होते !

दत्तू : ठेवतो रे तो माझ्यासाठी ! ( बाबूरावाला ) तू दी तिसरी घंटा ! ( पाव बघत...चोळीत ठेवीत आत जातो. )

बाबूराव : ( पोट दाबीत. ) हा करील ना बरोबर काम ?

नारद : करील....करील ! तू काळजी करू नकोस ! एकदा होतं 'लंकादहन' नाटक ! आणि ऐनवेळी हनुमान आला नाही ! दत्त्याला घाईघाईनं स्टेजवर ढकललं. हनुमानाचं काम एवढंच त्याच्या कानात सांगितलं... दत्त्या हूऽऽप हूऽऽप करीत इतका नाचला की लोकांना शेवटपर्यंत कळलंच नाही त्याला शेपूट नव्हतं ते !

( सगळे हसतात. बाबूराव पोट दाबतो. अस्वस्थ होतो. )

बाबूराव : ( पोट दाबत एकदम तडकतो. ) बाळ्या, तू मेल्या खुंटासारखा उभा का ?

बाळ्या : मग करू काय ?

बाबूराव : तिसरी घंटा दे ना रे– (पोट दाबतो.)

बाळ्या : तिसरी घंटा दोन वेळा दिली.

नारद : आणखी एक वेळा दे ! पाठीमागून गोंधळ नको ! (बाबूरावाला) बाबल्या, तू पोटसं दाबतोहेस ? खुटखुटतंय ?

बाबूराव : त्या मेल्या सरपंचाकडे कोंबडीचं जेवण होतं...

नारद : ज्यास्त झालं ?

बाबूराव : त्या मेल्याने कोंबडीत मसाला घातला होता की मसाल्यात कोंबडी घातली होती. कोण जाणे ! (पोटात मुरडा येतो.) मी जरा पटकन जाऊन येतो. तुम्ही सुरू करा ! तांब्या कुठं आहे रे ?.... तू जरा लक्ष दे हां– (टाय काढतो. कंबरेचा पट्टा काढतो. कोट काढतो.... तेवढ्यात बाळ्या आंतून घंटा घेऊन येतो.)

बाळ्या : देऊ घंटा ?

बाबूराव : दे....दे ! विचारतोस काय ?... मी जाऊ ? जरा घाईची आहे. (बाळ्या घंटा वाजवीत या टोकापासून त्या टोकापर्यंत फिरतो... तो घंटा घेऊन आत जातो न जातो तोच...आतून जोरजोराने कुत्रा भुंकल्याचा आणि बचावासाठी दत्तू ओरडल्याचा आवाज येतो...सगळे दचकून विंगेत बघतात...तेवढ्यात दत्तू भयभीत होऊन धावत येतो. लुगडे गुडघ्यापर्यंत वर केले आहे... आणि पाव पडू नयेत म्हणून छातीवर दोन हात धरले आहेत.)

दत्तू : (शिव्या देत–) माय झंयो...मेलो....हलकट भिकारडो....

बाबूराव : अरे पण कोण ?

दत्तू : हलकट मेलो ! माझ्या चोळीवर नजर

बाबूराव : अरे पण कोणाची ? (कुत्रा भुंकतो)

दत्तू : तो मेला कुत्रा ! कोणाचा रे तो ? आधी त्याला हाकला !

बाबूराव : झालं काय ? (घाईची झाली आहे ! पायावर पाय घेतो.)

दत्तू : एकदम माझ्या चोळीवर उडी घेतल्यानी ! चोळीतले पाव खायला– (सगळे हसतात.) बरां तर बरां ! वाईच बचावलंय !... आवशिक खांव ! शिरां पडो मेल्याच्या तोंडात–

बाबूराव : (एकदम भडकतो) दत्त्या, आता मी तुझ्या कानपटावर देणार हा–

दत्तू : कशाक ?

बाबूराव : तिसरी घंटा झाली तरी तुझ्या मिशा आहेत तशाच आहेत.

दत्तू : मिशा काढतो रे ! मिशा वाढायला वेळ... काढायला वेळ नाही !

(तो आत जाणार तोच– पुनः जोराने कुत्रा भुंकल्याचा आवाज येतो. पाठोपाठ बचावासाठी बाईंचे ओरडणे ऐकू येते! तेवढ्यात धावत धावत सुशी आत येते. कुत्र्याने तिच्या अंगावर उडी घेतल्यामुळे ती भयभीत झाली आहे! ती धापा टाकते....मागोमाग अर्जुन येतो.)

सुशी : (विंगेत बघत) तो बाहेर कुत्रा कुणाचा?

अर्जुन : का?

बाबूराव : (चिडून) अग, सुशी, तू एवढा वेळ होतीस कुठं?

सुशी : (विंगेत बघत) तो तिथं कुत्रा कुणाचा? त्याला आधी घालवून द्या.

बाबूराव : (चिडून) अग, त्या कुत्र्याचं राहू दे! तू आधी जा... आणि रंगवून घे तोंड.

सुशी : अरे, पण मला त्या कुत्र्याची भीती वाटते.... त्यानं माझ्या चोळीवर उडी घेतली ना रे–

दत्तू : (चमकून बघत) अगो म्हणतेस काय? (दोन्ही हातांनी दाबल्या-सारखे करीत) तूही चोळीत पाव घालून आली आहेस? कुरूकुरू!

बाबूराव : अग, सुशी, तू रंगवून घे!... आणि होतीस कुठं तू एवढा वेळ? (कपडे काढतो.)

सुशी : आमची पहाटेची एस्टीची... मुंबईची तिकिटं करमेळकराकडे होती... त्याचा पत्ता नाही.

अर्जुन : मग मिळाली की नाही?

सुशी : मिळाली रे! ही काय? (पर्स उघडते,)

अर्जुन : असू दे! तू आधी रंगवून घे–

सुशी : आधी त्या कुत्र्याला घालवा बघू! (कुत्रा भुंकतो. सुशी घाबरते. बाबूराव 'हाड...हूड...हुड्डत–' करीत कुत्र्याला घालवीत आत जातो— तरी कुत्रा भुंकतोच आहे. सुशी घाबरत घाबरत आत जाते.)

दत्तू : (तिच्याकडे बघत अर्जुनाला) हिनेही चोळीत पाव घातलैत?

अर्जुन : तू, दत्त्या, म्हणतोहेस काय?

दत्तू : ही आली... ही कोण?

अर्जुन : का?

दत्तू : (हसतो.) आवशिक खाव! काय ही हल्लीची बाइसमाणसा–

अर्जुन : झालं काय?

दत्तू : (हसत.) हिनेही चोळीत पाव घातलैत ना रे– कुरूकुरू! (अर्जुन फाडकन त्याच्या तोंडात देतो.) अरे, अर्जुना, मायझंया, मी तुझां काय केलां?

अर्जुन : तुला कोणी सांगितलं तिच्या चोळीत पाव आहेत म्हणून ?

दत्तू : मग तो कुत्रो तिच्या चोळीवर उडी का घेतो ? पाव असल्याशिवाय कुत्रा उडी घेल ? ते पाव...

अर्जुन : (पुन्हा फाडकन दत्तूच्या तोंडात देत-) हा मायझंया पाव पाव काय करतोय ? काय बेकरी खोलतोहेस ?
(दत्तू चिडतो आणि अर्जुनाची गर्दन धरतो. दोघांच्या झटपटीत दत्तूच्या चोळीतले पाव खाली पडतात. बाबूराव गडबडीने येतो.)

बाबूराव : अरे हे चाललंय काय ! 'सौभद्र' संपलं असं वाटलं की काय तुम्हाला ?

दत्तू : (चिडून) बावल्या, तू आधी ह्येला काय ते सांग !

बाबूराव : अरे, पण झालं काय ?

दत्तू : हा मला मारतो म्हणजे स्वतःक समजता कोण ? अर्जुन झाला म्हणून ? अरे, मी भीमाची आणि घटोत्कचाची कामं केली आहेत ! मी बरा तर बरा ! चिडलो तर धोतर सोडून घेईन !
(तेवढ्यात अर्जुन दत्तूच्या अंगावरचे लुगडे ओढू लागतो. दत्तू लुगडे घट्ट धरतो.)

दत्तू : (झटापट करीत) तू मला द्रौपदी समजलास की काय ?... अरे थांब थांब.... मी द्रौपदी न्हय... सुभद्रा मी !
(बघता बघता दत्तूचे लुगडे सुटते. दत्तू एकदम पट्ट्यापट्ट्याच्या चड्डीत उभा. वर पाव नसलेली चोळी !)

दत्तू : बाबल्या, तू बघतोहेस ना हे काय चाललंय ते ?
(बाबल्या रिकामी चोळी पाहतो, चड्डी पाहातो. अर्जुन लुगडे घेऊन जातो.)

बाबूराव : दत्त्या, सुशी आलीय ती पाहिलीस ना ? सुशीला नेसायला लुगडं नको ?

दत्तू : (हातवारे करीत) मग मी काय नागड्यानं काम करू ?

बाबूराव : आता तुझं काम कसलं ? सुशी सुभद्रेचं काम करणार...! तू पाठीमागे जाऊन चहा पी जा—

दत्तू : (कपाळाला हात लावीत) असा ? बरा रे बाबा ! तरी बरा.... मी मिशा काढल्या नाहीत ! (पडलेले पाव उचलतो. हाका मारीत—) बाळ्या, रे बाळ्या...दोन कप चहा सांग मरे...पाव चहात बुडौन खाईन...
(जातो. त्याच्या मागून चहा सांगायला बाळ्या जाणार तोच—)

बाबूराव : (चिडून) बाळ्या, तुझ्या गांडीवर आता लाथ मारीन ! चाललास कुठं ?

बाळ्या : चहा सांगतो दत्तूला—

बाबूराव : आधी, मेल्या, सूत्रधार कुठं मेला तो बघ—

बाळ्या : ( विंगेत बघत ) हा काय तिथं झोपलाय– ( आत जातो. )

बाबूराव : लाथ मार भोसडीच्याच्या गांडीवर....इथं काय झोपायला आलाय? (बाळ्या सूत्रधाराला ओढत आणतो. सूत्रधार डोळे पुसतो.) आता एकदा सुरू करा ना रे! बाळ्या तिसरी घंटा दे ना रे– ( लोकांचा गोंगाट. )

बाळ्या : तिसरी घंटा किती वेळा देऊ?

बाबूराव : दे म्हटल्यावर दे! कुल्यावर पाणी घाल म्हटल्यावर घाल! लोंबतं काय म्हणून विचारू नकोस!

बाळ्या : ( घंटा उचलतो. ) देऊ घंटा?

बाबूराव : दे...दे लवकर...
( बाळ्या काल्पनिक पडद्यातून डोके बाहेर काढतो आणि बघतो. )

बाळ्या : ( डोके आत घेत ) आर्गनवाला आणि तबलेवाला– दोघेही लघवीला गेलेत–

बाबूराव : ह्यावेळेला? ( एकदम आठवण होते– ) बाझंव! मी जातो परसाकडला– ( पोट दाबत पळ काढतो. )

बाळ्या : जा जा तू! आम्ही बघतो...( पडद्यातून बघतो. ) आले....आले! ऑर्गनवाले आले! ( घंटा देतो.... घंटा वाजवतो. घंटा ठेवून बाहेर येतो आणि पडद्याची दोरी धरून उभा रहातो. पडद्याच्या आत सूत्रधार उभा. टेपवर सूत्रधाराचे पद सुरू–लोकांच्या टाळ्या, शिट्ट्या वगैरे. ऑर्गनवाला, तबलेवाला काल्पनिक वाद्ये वाजवीत असल्याचा अभिनय करतात. सूत्रधाराचे पद टेपवर सुरू होते. सूत्रधार अजून पडद्याच्या आत असल्यामुळे तो पद तोंडाने न म्हणता फक्त मान डोलवीत उभा आहे. मध्येच तो मिशा काढून मिशांना पीळ देतो आणि पुन्हा मिशा अडकवतो. तेवढ्यातच दत्तू कांबळी दोन पाव हातात धरून येतो आणि बाळ्याला हाका मारतो...आणि 'बाळ्या, अरे माका चहा आणून दी मरे–' असे ओरडून सांगतो. )

सूत्रधाराचे पद :

'तुम्हा तो शंकर सुखकर हो । हिमधरस्थित विकट काननी । तप करी प्रियकरी शुभकरी सुंदरी तिजवरी भुलत निज कैलासनगिं तो । शंकर सुखकर हो ॥ धृ० ॥ पद्मजा मुररिपुसही अवमानुनी इंद्रा चंद्रा सकलां सोडुनी पर्णनी कुंदरदनि सुकुंतलावेणी जाहली शिववरानुसारिणी पर्वताग्रशिरोमणी अर्पि कन्या सद्‌गुणी हर्षनिर्भर करग्रहणी झाला महादेवास तो । शंकर सुखकर हो ॥ तुम्हा० ॥

सूत्रधार : ( आतून ) बाळ्या, उघड रे पडदा–

बाळ्या : तू शिट्टी तरी दे–

सूत्रधार : अरे, शिट्टी बाबूरावाच्या...बाबल्याच्या गळ्यात राहिली–

बाळ्या : उघडू ना ?...उघडतो हां ऽऽ! (पडदा उघडतो.)

सूत्रधार : (लोकांना बघताच गडबडतो.) चला !.... (विसरतो.... मिशा दाबत फेऱ्या मारतो.)

आवाज : अरे, मुंबैकर डायलाग विसरलो का काय ? (लोक हसतात.)

नारद : (चोपडी घेऊन प्रॉम्प्टिंग करतो–) चला ! झालं तेवढं ईश्वराचं स्तवन खूप झालं !

सूत्रधार : चला, झालं तेवढं ईश्वराचं स्तवन खूप झालं ! आता घराकडे जातो आणि कारभारणीला भेटून नाटकाला सुरुवात करतो. (इकडे तिकडे बघत–) अरे, माझी कारभारीण कुठं गेली ?

आवाज : मायेराक गेली असतली–! (लोक हसतात.)

नारद : (प्रॉम्प्टिंग)–ती बघा–

सूत्रधार : (इकडे तिकडे बघत–) ती बघा...ती बघा ! एक नंबरची ताळभेकरी आहे ! मी हा इथं आणि ती बघतेय तिथं ! ह्या बायकांना आपल्या नवऱ्याकडे बघायला नको !

आवाज : घो घरी खंय आपल्या बायकांकडे बघतंत ? (लोक हसतात.)

नटी : (प्रवेश करून) ह्यांचा गावभर उंडगेपणा ! मला तर काळजीनं जेवण-सुद्धा जात नाही.

आवाज : बरेसे मासे आणून खा मगो– (लोक हसतात.)

नटी : पोरगी झाली लग्नाची ! तिला बरासा नवरा बघायला नको ? ह्यांचा म्हणजे घराकडे लक्षच नाय ! अहो, हल्लीचे नवरे...हल्लीच्या सासवा ! हुंडा मागतील, हुंड्यासाठी माझ्या पोरीला डागण्या देतील...जाळून मारतील...काय सांगता येतं ? म्हणून नवरा मुलगा काळजीपूर्वक बघायला नको ? पण ह्यांचं आपलं लक्षच नाही ! (सूत्रधार ऐकतो आहे. त्याच्याकडे लक्ष जाते.) तुम्ही गेला होता कुणीकडं ?

सूत्रधार : अगो, कामं काय थोडी आहेत ?

नटी : तुमची कामं काय ती मला माहीत आहेत...

सूत्रधार : (गडबडून) ते जाऊ दे ग–! अग, तुला येऊन जाऊन काळजी म्हणजे कन्येच्या लग्नाची ना ?

नटी : मग ? तुमचं काय घराकडे लक्ष आहे ? मुलगी वाढली म्हणजे मग ?

सूत्रधार : तू काळजी करू नकोस ! समजलं ना ? कारण–(हरदासाप्रमाणे गद्यात)
'कन्येपूर्वी तिच्या पतीते विधि निपजवितो भार्ये।
ईशाशेविण काही न होती सृष्टीतील ती कार्ये।'

नटी : पुरे तुमचं ! हे भलतं सलतं मला सांगू नका ! मुलीच्या लग्नाचं काय ते सांगा ! तुम्ही आपले गाव भटका....पगडी घाला आणि—

सूत्रधार : तुला खूळ लागलं की काय ?

नटी : का ?

सूत्रधार : का म्हणजे काय ? अग, मी हा तिथनंच येतोय ना.

नटी : तिथनं ? मला वाटलं तुम्ही 'इथनं' येताहात.

सूत्रधार : 'इथनं' म्हणजे कुठनं ?

नटी : ती तुमची... आहे ती... (जाडी या अर्थी दाखवीत–) दुधीभोपळा–

सूत्रधार : (ओशाळून) छे...छे ! तुझं आपलं काही तरीच ?...मी हा येतोय ते लग्नाचं सगळं पक्कं करून !

नटी : खरं ? म्हणताय काय ? (आनंद होतो.) मला तर मुळी खरंच वाटत नाही !

सूत्रधार : अगदी सगळं ठरवून... पक्कं करून मी येतोय—

नटी : (हर्षित होऊन) देव पावला ! मला सगळं सांगा तरी ! हा नवरा मुलगा कोण, कुठला, करतो काय ? (केसात बोटे घालून उवा शोधते.)

सूत्रधार : हा असतो मुंबापुरीत ! आणि कामाला राष्ट्र...राष्ट्री... (अडकतो.) राष्ट्रीकृत बँकेत.

नटी : म्हणजे नॅशनलाइज्ड बँकेत ? अगो बाई–

सूत्रधार : होय ! तिथं तो कारकून आहे !... ओव्हर टाइम मिळतो.

नटी : पगार नाही ?

सूत्रधार : पगार आहे ग ! पण पगाराशिवाय ओव्हरटाइम ! दिवसाचं काम दिवसा न करता दिवस संपल्यावर केलं की ओव्हरटाइम मिळतो.

नटी : अहाहा ! म्हणजे तर दुधात साखर ! (उवा काढून नखावर 'स्' आवाज करीत मारते.)

सूत्रधार : थोडीच घाल.

नटी : काय ?

सूत्रधार : साखर ! आधीच ती लघवीत आहे म्हणून म्हणतो–

नटी : आणि हुंडा ? देणं घेणं....मानपान.. काय ठरलं ?

सूत्रधार : त्याचे आईवडील म्हणाले हुंडा नको ! ते पुरोगामी आहेत–

नटी : (आनंदित होऊन) अग बाई ! देव पावला ! माणसं सुधारलेली दिसतात–(डोक्यात बोट घालते.)

सूत्रधार : हो सुधारलेली आहेत ! ते म्हणाले, त्यांच्या जावयानेसुद्धा काही मागितलं नाही ! पण तरीसुद्धा वीस तोळे सोनं द्यावं लागलं ! आणि दोन्ही बाजूचा खर्च ! आणि मानापमान–

नटी : ह्याचा अर्थ काय?

सूत्रधार : ह्याचा अर्थ काय? ह्याचा अर्थ – ते हुंडा मागणार नाहीत पण आम्हाला तो द्यायला हवा!

नटी : पण का?

सूत्रधार : कारण ती माणसं सुधारलेली आहेत! पुरोगामी आहेत!

नटी : (कपाळावर हात मारून घेत) अरे देवा! मग हो काय करणार? (उवा मारते.)

सूत्रधार : ते काय ते आपण नंतर बघू! समजलं ना? ही जी माणसं इथं जमली आहेत ती तुझ्या मुलीच्या लग्नाला जमलेली नाहीत.

नटी : येतील ती लग्नाला...आपण आमंत्रणं पाठवू!

सूत्रधार : कुणी एक येणार नाही! 'अहेर आणू नये' म्हटलंस तर सगळे येतील आइस्क्रीम खायला....! जाऊ दे! (फेरी मारतो.) ही माणसं पैसे देऊन नाटकाला आली आहेत. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी नाटक करायचं ठरलंय ना?

नटी : पूरग्रस्त कोकणासाठी सरकारी मदत आहे ना?

सूत्रधार : सरकारी मदत येईपर्यंत....आणि ती येता येता मधल्यांनी खाऊन होई-पर्यंत पुढल्या वर्षाचा पूर येईल–

नटी : चला तर मग? कुठलं नाटक करणार?

सूत्रधार : आज आपण अण्णासाहेब किर्लोस्करांचं 'संगीत सौभद्र' नाटक करू या! हल्लीच या नाटकाला शंभर वर्षं झाली! यामुळे लेखकाला पैसे द्यायला नकोत!

नटी : पण संगीत करणार की–?

सूत्रधार : (हसत–) आमचे कलाकार गायला लागले तर प्रेक्षक उठून जातील म्हणतेस?

नटी : उठून गेले तरी नशीब! मारायला धावले तर काय करणार?

सूत्रधार : बघूया कसं काय जमतं ते–

नटी : चला तर लवकर लवकर– (दोन वाटोळ्या फेऱ्या मारतात.)

सूत्रधार : (इकडे तिकडे बघत–) अग, तू बघते आहेस कुठं? अगं, हीच ती श्रीकृष्णाची द्वारकानगरी! बघ ना– सरकारी दुधाच्या बाटल्यांसाठी गवळणी कशा लाइन धरून उभ्या आहेत त्या–

नटी : (त्याला हाताला धरून ओढत–) चला तुम्ही पुढे! तुमची सवय जात नाही! टक लावून बघायची! कुणी दिसली बाई की हे थांबलेच!

सूत्रधार : असू दे ग! तू चल! आपण द्वारकानगरी बघून येऊ! इथं तू उवा

मारीत फिरू नको हां–(फेरी मारतो–) ही बघ– श्रीकृष्ण ट्रॅव्हल्सची टुरिस्ट बस ! हात दाखव... हात दाखव ! (दोघेही हात दाखवतात. खडखड करीत बस थांबल्याचा आवाज येतो. पाठोपाठ कंडक्टरसारखा दिसणारा माणूस येतो.)

माणूस : क्यां जवानु छे ?

नटी : हा कुठल्या भाषेत बोलतोय ?

माणूस : गुजराती ! द्वारका गुजरात स्टेट मां छे !

सूत्रधार : हां... हां ! श्रीकृष्णाचा राजवाडा कुठेसा आहे ?

माणूस : (हसत) श्रीकृष्णाचा राजवाडा ? आवशिक खाव ! हा काय श्रीकृष्णाचा राजवाडा !

सूत्रधार : म्हणता काय ? हा श्रीकृष्णाचा राजवाडा ? अहो, ह्याच्यापेक्षा मुंबईतले आमच्या मंत्र्यांचे बंगले मोठे असतात–

माणूस : हल्ली श्रीकृष्णाचं पूर्वीचं काही राहिलेलं नाही !

सूत्रधार : असं ?

माणूस : सगळ्या गाई सरकारी डेअरीनं घेतल्या ! अर्ध्या राजवाड्यात हॉटेल घातलंय !...पण एमेले लोक येऊन मोफत राहतात. खातात...पितात त्यामुळे तेही धड चालत नाही !

नटी : सोळा हजार बायका आहेत त्यांचं काय ?

माणूस : छे हो ! कुठल्या सोळा हजार बायका ? एक रुक्मिणी नीट रहायला तयार नाही !...रोजची भांडणं !

नटी : असं ? अग बाई ! ही भांडणं कशासाठी ?

माणूस : स्त्रीमुक्तीचं लफडं इथं सुरू झालंय ! कृष्णानं नको नको म्हटलं तरी रुक्मिणीनं 'उंबरठा' सिनेमा बघल्यानी !

सूत्रधार : 'उंबरठा सिनेमा बघल्यांनी की 'उंबरठ्या'वरची चर्चा ऐकल्यांनी ? (बसचा हॉर्न वाजतो. बसमधले लोक गुजरातीत आणि हिंदीत आरडा-ओरड करतात, ती ऐकू येते.) लोक ओरडताहेत....जाया तुमी–

माणूस : वरांडू दे ! बस थांबवून ठेवलीहा म्हणान् वराडतहत – मायझये–

नटी : मगे जाया जाया तुम्ही ! (तो जायला निघणार तोच–) मी काय म्हणंय...तुमका मालवणी कशी बोलाक येता ?

सूत्रधार : असां काय ? अगो, हल्ली 'गगनभेदी' आणि 'वस्त्रहरण' इंग्लंडाक गेल्यापासून इंग्रज लोकसुद्धा मराठी आणि मालवणी नाटका बघतंत आणि मालवणी बोलतंत ! इंग्रज लोक हल्ली 'माय डियर' म्हणणत नाय ! 'मायझंया' म्हणतंत !

माणूस : असां ? असा....असा ! म्हणजे एकदा इंग्लंडाक जावून येवूक होया !

सूत्रधार : जावून या ! म्हंजे आयल्यार इंग्रजी बोलशात !

माणूस : शिरां पडो ! इंग्रजीक काय आमच्या मालवणीची सर आसा ? काय हो ?

नटी : तुमी मुळचे खंयचे ?

माणूस : होडावड्याचो ! मी होडावडेकर—

नटी : ( नवल करीत ) होडावड्याचे ? आवशिक खाव !

माणूस : कित्याक ?

सूत्रधार : ह्येचा कोणीतरी होडावड्याक असतला—

नटी : असां काय ?....आमचा यमना होडावड्याकच दिलाहा !

माणूस : यमना कोण ?

सूत्रधार : ह्येची चुलत चुलत भैण — यमना !

माणूस : होडावड्याक कोणाकडे ? ( बसचा फुगा वाजतो. लोक ओरडतात. )

सूत्रधार : होडावडेकर—

माणूस : कोण होडावडेकर ?

नटी : जगन्नाथ होडावडेकर—

माणूस : मेलो ! जगलो होडावडेकर ! तो मायझंयो तुमचो मेवणो ?.. हां... हां... त्येची बाईल ( कोडे सुटल्याप्रमाणे ) हां....हां...तां यमना.

नटी : ( आनंदित होऊन ) होय...होय !

माणूस : तां बाळंत झाला ?

नटी : अगेबाये, तां गुरवार होता ?

सूत्रधार : गुरवार असल्याशिवाय बाळंत कसा व्हयत ?

नटी : आमका खबरच नाय ! तुमका कधी भेटलंला ?

माणूस : कोण ?

नटी : यमना—

माणूस : छा ! दोन वर्सां झाली, मी होडावड्याक गेलहय खंय ?

नटी : मग तुमका कोणी सांगला ?

माणूस : काय ?

नटी : यमना गुरवार म्हणून ?

माणूस : छा...छा ! तसा न्हय ! दर वर्सा यमना गुरवार तरी असता...नायतर बाळंत तरी असता म्हणान् इच्यारलंय. ( बसमधले लोक गडबड करतात. ) मेले हुयेर घालतहत ! हयचे लोक कोणाक कामा करूक दिवचे नाय ! नुसती धांदल !

नटी : जाया...जाया तुमी ! आमच्यो गजाली संपाच्यो नाय—

माणूस : जातंय ! तुमी हंय राजवाड्यात कोणाकडे ?

सूत्रधार : सहज : एलटीए गावता फॅमिलीक...म्हणून इलो ! म्हटलां, लगीन बघया ! सुभद्रेचा लगीन आसा मा ?

माणूस : लगीन आसा खरां, पण काय तरी लफडा आसा–

नटी : अगे बाये, कसला लफडा ?

माणूस : तांच ! नेहमीचाच झेंगाट ! लगीन एकाबरोबर आणि प्रेम दुसऱ्यार ( पुनः बसमधल्या लोकांची गडबड ! ) जातंय ! मेल्याकनी थारो नाय. ( जातो. )

नटी : ( सूत्रधाराला ) सुभद्रेचं लग्न ठरलंय ते कोणाबरोबर ?

सूत्रधार : ( खिशात हात घालीत ) असं काय ? तू लग्नपत्रिका पाहिलीस नाहीस

नटी : पाहिली, पण वाचायला कुणाला येतं ?

सूत्रधार : ( पत्रिका काढून वाचतो. ) 'श्रीकृपेकरून आमचे येथे आमची भगिनी सुभद्रा हिचा विवाह राजा दुर्योधन याच्याशी करण्याचे योजले आहे.' कार्य सिद्धीस नेण्यास श्रीसमर्थ आहे....( पुढे प....प...प...करीत तोंडातल्या तोंडात वाचतो. ) 'आपले नम्र–बलराम वासुदेव यादव... श्रीकृष्ण वासुदेव यादव....प...प...प... दुपारी ११ ते १ या दरम्यान भोजनास यावे....प...प...प....येताना आहेर आणावा.... एकावन्न रुपयापेक्षा कमी अहेर स्वीकारला जाणार नाही ! '....काय ह्या देवादिकांची परिस्थिती आलीय बघ ! ( पत्रिका खिशात घालतो. )

नटी : आम्ही जाऊया जेवायला ? ( उवा मारते )

सूत्रधार : जाऊया ! तू तिथं उवा मारीत बस !... आणि अहेराचे एकावन्न रुपये कोण घालणार ?

नटी : पाकीट देऊन येऊया ! पाकिटात पैसे कशाला घालायला पाहिजेत ?

सूत्रधार : ( तिला नमस्कार करीत ) आहेस गं बाई, खरी मालवणी !.... चल लवकर ! नाहीतर दुर्योधनाबरोबर सुभद्रेचं लग्न लागलंही असेल ! ( पडद्यात – " कोण ह्यो मायझंयो ? शिरा पडो मरे त्येच्या तोंडार ! अरे मेल्या, अर्जुनाऐवजी त्या मेल्या दुर्योधनाचा नाव घेतंय... आग लागो मेल्याच्या तोंडाक–" )

सूत्रधार : ( घाबरून ) आवशिक खाव ! ह्ये तर झेंगट झालं !

नटी : काय झालं ?

सूत्रधार : काय झालं काय ? हा अर्जुन–

नटी : कुठला अर्जुन ?

सूत्रधार : अग, पांडवातला अर्जुन–

नटी : तो ह्यावेळी इथं कुठं आला ?

सूत्रधार : तेच म्हणतोय मी ! तीर्थयात्रेला गेला होता म्हणून ऐकलं होतं !... त्यालाही एल्टीए मिळतो की काय ? चल... चल लवकर ! इथनं पळ काढूया ! नाहीतर तो बाणबीण मारील.... जिकडे तिकडे अतिरेकी... एक्सट्रीमिस्ट ! (दोघे पळ काढतात.) अगो, तिकडून कुठून ? तो बघ तिथूनच येतोय.... इथनं पळू या.... (उलट दिशेने पळ काढतात. दुसऱ्या बाजूने प्रवासवेष धारण केलेला अर्जुन प्रवेश करतो !)

अर्जुन : कुठं गेला तो भटजी ? शिरां पडो मेल्याच्या तोंडार ! सुभद्रेचं लगीन अर्जुनाबरोबर म्हणायचं सोडून दुर्योधनाबरोबर असं म्हणाला ! हराम-खोर ! आग लागो त्याच्या तोंडाला ! (थांबून–फेरी मारून) सुभद्रेचं आणि माझं कधीपासून लव्ह अ‍ॅफेअर ! आणि आता मध्येच दुर्योधन कुठं उपटला ? गेले सहा महिने मी तीर्थयात्रा करतो आहे ! अनायासे एलटीए मिळतो. लीव्हट्रॅव्हल अलावन्स... म्हटलं, तीर्थं पाहू ! तर मध्येच हे विप-रीत ? पण मी म्हणतो, हे जर खरं असेल तर सुभद्रा कशी गप्प राहील ? तिनं सांगू नये का की माझं अर्जुनावर प्रेम आहे म्हणून ? आणि कधीचं ? जुनं प्रेम...( तालावर....पण गद्यात– ) 'होतो द्वारकाभुवनी । ती तरुणी मजला निरखुनि वर शशिकर–विकसित कुमुदिनीपरि हरिखुनि किंचित मुरडुनि मधुर स्मित करि करिगमनी ।। ( एवढे लांब एकदम. मग कोंडलेला श्वास सोडत– ) 'होतो द्वारकाभुवनी ॥' ( विचार करून ) पण ह्या लग्नासाठी सुभद्रेवर बळजबरी झाली असेल ? कृष्णाचा नाही तर बलरामाचा नेम सांगता येत नाही ! ( त्रासून ) जाऊ दे ! मी कशाला जिवाला त्रास करून घेतो आहे ? तसं काही नसेल सुद्धा ! मला चिडवण्यासाठी सुद्धा त्या भटानं मुद्दाम दुर्योधनाचं नाव घेतलं असेल ! जाऊ दे ! आता तीर्थयात्रेचे थोडे दिवस राहिलेत ! राहिलेली तीर्थं बघतो आणि मग धर्मराजाच्या भेटीला जातो....मग काय ते बघू– ( पडद्यात नारदाचा वीणा झंकार आणि पाठोपाठ टेपवर गाणे..., राधाधरमधुमिलिंद । जय जय रमारमण हरि गोविंद ।। धृ० ।। ) अरे वा ! हा तर हरिभजनाचा आवाज...म्हणजे नारदमुनींची स्वारी येते-यशी दिसतेय ! ह्या वेळेला या सत्पुरुषाचं दर्शन म्हणजे शुभशकुनच ! ( नृत्य करीत नारद गात गात येतो–' राधाधरमधुमिलिंद । जयजय रमारमण हरि गोविंद ।। धृ० ।। कालिंदी तट– ' नारद टेप केलेल्या गाण्याप्रमाणे गातो. पण मध्येच टेपचे आणि त्याचे गाणे मागे–पुढे होते. म्हणून नारद विंगेत बघून भडकतो. टेपवाल्या साउंडमावर डाफरतो. )

नारद : एऽऽ साटम, मेल्या तुझं लक्ष कुठं आहे ? तुझी टेप एका वाटेला आणि माझं गाणं दुसऱ्या वाटेला ! माझ्या गाण्याप्रमाणे टेप वाजव ना रे ! ( लोक हसतात. )

साटम : ( आतून – ) तू नारद झालास म्हणजे कोण मोठा शहाणा झालास ? तुला टेपप्रमाणे गायला काय झालं ? (' पुलिंद–लांच्छित सुरतनुपदार-विंद । जय ० ॥ ' टेप सुरू होते आणि नारद राधाधर सुरू करतो. नारद भडकतो. )

नारद : असली ही मेली कोंकणी माणसां ! कोंकणाचा विकास कसला होणार ?

साटम : ( आतून–चिडून ) टेप वाजते त्याप्रमाणे तू तोंड हालव ना रे–( लोक हसतात. )

नारद : ( चिडून ती बाझंवता तुझी टेप ! मी टेपशिवाय गायला लागेन हांऽऽ ( दुसऱ्या विंगेत बघत ) तो डायरेक्टर बाबल्या कुठं मेला ?

अर्जुन : ( आवाज मारून ) तो गेलाय तांब्या घेऊन ! तू गाऊ मात्र नकोस हांऽऽ ! लोक उठून जातील...घे संवाद ( एकदम मोठ्याने आपले संवाद सुरू करतो. ) मुनिवर्य, हा अर्जुन तुम्हाला वंदन करतो आहे !

नारद : कोण ? अर्जुन ? तुझं कल्याण असो ! तू इथं कुठं ?

अर्जुन : मी सध्या तीर्थयात्रा करतो आहे...! पण तुम्ही एकदम हिमालय सोडून ह्या वाटेला कुठे ?

नारद : कोकणात गेलो होतो ! तिथनं हा परत येतोय–

अर्जुन : तुम्ही कोकणात कशासाठी !

नारद : अरे अर्जुना, मी मूळचा कोंकणीच ! कळी लावणं...कलागती लावणं हा मूळचा कोकण्यांचा गुण ! तो मला लागला....म्हणून मला कळीचा नारद म्हणतात.

अर्जुन : असं ? हे मला माहीत नव्हतं ! मग तुम्ही कोंकण सोडून हिमालयात का गेलात ?

नारद : आत्मविकासासाठी ! कोंकणी माणसाला आपला कसलाही विकास करून घ्यायचा झाला तर त्याला कुठं तरी कोंकणाबाहेर तोंड घेऊन जावंच लागतं ! बरेचसे मुंबईला जातात...मी हिमालयाला गेलो ! हल्ली मुंबईलासुद्धा राहायला जागा मिळत नाहीत, त्यामुळे बरेचसे कोंकणी आता हिमालयात येण्याची शक्यता आहे ! मग तिथंही भांडणं सुरू होतील. आणि मला कुठं तरी तोंड घेऊन जावं लागेल !

अर्जुन : कोंकणात तुमचे सत्कार-बित्कार झाले असणार–

नारद : माझे ? छे ! ( हसून ) तिथं रे मला विचारतो कोण ? तिथं सगळेच नारद !

अर्जुन : मग कोकणात काय असेच गेला होता ?

नारद : (चमकून) असेच? अरे अर्जुना, तुला काहीच माहिती दिसत नाही–

अर्जुन : मी तीर्थयात्रा करतोय ना ?

नारद : अरे, कोकणात यावर्षी मोठा पूर आला होता–

अर्जुन : असं? मोठा पूर?

नारद : मोठा म्हणजे...तसं कोकण कायमचंच गळ्यापर्यंत बुडलेलं असतं...पण ह्या वर्षी नाकापर्यंत बुडलं होतं! म्हणून म्हटलं कोकणग्रस्तांच्या मदतीसाठी–

अर्जुन : कोकणग्रस्त की पूरग्रस्त ?

नारद : एकच रे ते! पूर आला म्हणून पूरग्रस्त...! कोकणात राहिला म्हणून कोकणग्रस्त! एकूण एकच!

अर्जुन : मग मदतीचं काय?

नारद : हल्ली सरकारी मदत! ती खाली येता येता जिरत जिरत येते...पुढं ती कुठं कशी जिरली याची जाहीर चर्चा सुरू होते....मग चौकशी...! त्यामुळे पूर आला होता हेच लक्षात राहत नाही!

अर्जुन : पण ज्यांनी सरकारी मदत जिरवली त्यांचं काय होतं?

नारद : काही होत नाही! तोपर्यंन्त पुढल्या वर्षीचा पूर आलेला असतो (थांबून) चला! आता मी निघालोय द्वारकेला–

अर्जुन : द्वारकेला का? असेच?

नारद : (चमकून) असेच? अरे, तिथं लग्नाचा बोवाळ चाललाय–

अर्जुन : कुणाचं लगीन ?

नारद : कृष्णाच्या बहिणीचं–सुभद्रेचं! दुर्योधनाला दिली– (अर्जुन एकदम खाली मान घालतो. काही क्षण गप्प राहतो.) अर्जुना, तू असा एकदम गप्पसा ?

अर्जुन : नारदमुनी, हे तुम्हाला कसं दिसलं?... हे...हे... लग्नाचं ?

नारद : त्यात वाईट काय? असलं स्थळ सुभद्रेला शोधूनसुद्धा सापडलं नसतं! सासरा आंधळा! सासवेच्या डोळ्यांवर पट्टी; म्हणून तिला काही दिसत नाही! त्यामुळे सुनेचा छळ...स्टोव्ह भडकला.... हुंडाबळी...असली लफडी नाहीत–

अर्जुन : नारदमुनी, तुम्ही माझी चेष्टामस्करी करताहात का ?

नारद : काय झालं ?

अर्जुन : अहो, काय झालं काय? सुभद्रा आणि मी लहानपणी एकजागी खेळलो. एकमेकांवर प्रेम केलं! बरं, प्रेम करून शेवटी हुंडाबिंडा मागणारा मी नव्हे! (दुःखभराने) आणि आता हे एकाएकी काय झालं पाहा!

नारद : अर्जुना, हे कदाचित् कृष्णाचंसुद्धा कारस्थान असेल !

अर्जुन : मलाही तेच वाटतं ! आणि हा कृष्ण आमचा मित्र.... माय.... (शिवी हासडणार तोच–)

नारद : अरे, असू दे ! आपण अपशब्द काढू नये–

अर्जुन : (चिडून) आता ये म्हणावं – कृष्णाला ! तुला देतो आरेचं दूध आणि अमूलचं लोणी ! (तेवढ्यात आत कोणी तरी ट्रान्झिस्टर लावतो. आणि त्यावर 'अमूल' बटरची जाहिरात लागते. अर्जुन चिडून विंगेत बघतो.) तो ट्रान्झिस्टर बंद कर ना रे ! (लोक हसतात.) आलेल्या वेळी हा कृष्ण एवढं लोणी मागून मागून खातो ! (रागावून) नारदमुनी, मला अधिक वाईट वाटलं म्हणजे....हा दुर्योधन माझा शत्रू....वैरी ! त्यालाच सुभद्रा दिली म्हणजे मला बाहेर तोंड दाखवायला नको ! (हुंदका देतो.)

नारद : अर्जुना, तू असा रडू नकोस ! तू तीर्थयात्रेत आपलं मन रमव–

अर्जुन : तुम्ही, मुनिवर्य, एक कराल का ?

नारद : काय ?

अर्जुन : माझे भाऊ– धर्म, भीम, नकुल आणि सहदेव– ह्यांना सांगा– (दुःख-भराने) आता अर्जुनाची आशा करू नका ! म्हणावं, तुमचा अर्जुन संपला !

नारद : म्हणजे ? तुझा, अर्जुना, विचार काय ?

अर्जुन : जीव देतो ! मला आता दुसरा मार्गच उरलेला नाही !

नारद : तुझ्यासारख्या क्षत्रियाला हे शोभत नाही, अर्जुना–

अर्जुन : क्षत्रियांना न शोभणाऱ्या गोष्टी हल्ली खूप चालल्या आहेत....! असू दे ! मला तर आता दुसरा इलाजच दिसत नाही !

नारद : तरीसुद्धा तू असा जीव देणं बरं नव्हे !

अर्जुन : मग संन्यास घेऊ ?

नारद : तू असं कर–

अर्जुन : कसं ?

नारद : तू संन्यास घेणार असशील तर त्रिदंडी संन्यास घे–

अर्जुन : म्हणजे कसा ?

नारद : म्हणजे समज....तुझं आणि सुभद्रेचं जमेलसं दिसलं तर, ताबडतोब लंगोटी सोडून तुला धोतर नेसता येईल ! परत तू झट की पट गृहस्थाश्रमात येऊ शकतोस !

अर्जुन : छे ! पण ते बरं दिसत नाही !

नारद : काय बरं दिसत नाही ? हल्ली उलट सर्वजण असंच करतात...राजकारण-संन्यास घेतात आणि मंत्रिपदाची खुर्ची मिळते म्हटलं की, राजकारणात परत येतात.

अर्जुन : असं म्हणता ? मग तसंच करतो ! त्रिदंडी संन्यासच घेतो.
(तेवढ्यात दवंडीवाला येतो.)

दवंडीवाला : आयका हो आयका...पैशाला दोन बायका !

नारद : एऽऽ रगल्या, मेल्या, दवंडी सरळ दी बघया—

दवंडीवाला : आयका हो आयका ! सरसेनापती सात्यकी महाराजांचा सर्व शिपायांना सक्त हुकूम आहे....रैवतगिरी प्रदेशातल्या अरण्याभोवती पाहारा कडक करा.. नवटाक नवटाक मारून झोपू नका ! कारण कृष्णभगिनी सुभद्रा-देवी हिचं आजच लग्न होणार होतं— पण सुभद्रा एकाएकी आपल्या खोलीतून बेपत्ता झाली आहे पोलिस तपास सुरू आहे. असिस्टंट पोलिस कमिशनर रामराव जाधव यांच्या देखरेखीखाली इन्स्पेक्टर एम्. के. शिंदे यांच्या मदतीने हवालदार सावंत, देसाई आणि बागुल जातीने तपास करीत आहेत होऽऽ
(एकदम बाबूराव येतो. तो चिडलेला आहे. त्याने कमरेला आखूड टॉवेल गुंडाळलेला आहे, वर गंजीफ्रॉक, हातात कथलाचा घाणेरडा तांब्या किंवा डालडाचा डबा.)

बाबूराव : ( दवंडीवाल्याला ) रगल्या, मायझंया, मुस्काट फोडीन तुझा -

दवंडीवाला: ( काही न कळून — ) काय झाला ?

बाबूराव : आवशिचो घो तुझ्या ! ह्या सगळ्या पोलिस हापिसरांची नावं सांगायची काय गरज होती ?

दवंडीवाला: खोटी नावं रे ती—

बाबूराव : पण ती सांगायची गरज काय ?

दवंडीवाला: वर्तमानपत्रात तशी नावं छापून येतात ! तपास चालू नसला तरी नावं छापून येतात.

बाबूराव : चल .. चल ! रस्ता धर ! ( दवंडीवाला कपाळाला हात लावीत ‘ बरो बुवा ! ’ म्हणत निघून जातो. ) डायरेक्शनच्या बाहेर जाण्याची या लोकांना फार वाईट सवय ! ( अर्जुनाला ) अर्जुना, तू तुझं सुरू कर — ( तांब्या हालवीत जातो. )

अर्जुन : ( आनंदाने — ) देव पावला ! आज सुभद्रेचं लग्न व्हायचं होतं... पण सुभद्राच घरातून पळाली. बरं झालं ! आता दुर्योधनाला म्हणावं— बस तेल लावीत — ( वर बघून हात जोडीत— ) देवा, तुझी लीला अगाध

आहे ! नारदमुनी, मला आता आशा वाटू लागली आहे ! मी या अरण्यात फिरतो आणि सुभद्रा कुठं दिसते का पाहतो.... तुम्ही उभे का ?... तुम्ही चला आपल्या कामाला –

नारद : जातो ! पण माझा उपदेश लक्षात ठेव–

अर्जुन : कुठला ?

नारद : त्रिदंडी संन्यास –

अर्जुन : (हसत– ) हो.... हो ! आता त्रिदंडीच ! घेतो... सोडत नाही !... तुम्ही चला–

नारद : ( आशीर्वाद देत– ) कल्याण असो ! (गळा खाकरतो आणि गाण्याचा प्रयत्न करतो. ) 'पावना वामना–'

अर्जुन : गाणार ?

नारद : होय –

अर्जुन : पण मला थांबायला टैम नाही ! तुम्ही गात गात चला–

नारद : बरं... बरं... ( जाता जाता – गळा खाकरतो आणि विंगेत पाहत–) टेपवाला साटम जागा आहे का पाहातोय.... (तेवढ्यात टेप सुरू– 'पावना वामना या मना । दे तव भजनी निरंतर वासना ।। धृ० ।। तोपर्यन्त नारद गेलेला असतो. तेवढयात अर्जुन दोन फेऱ्या मारतो. आणि जंगलाचे दृश्य दिसते. अर्जुन जंगलात इकडे तिकडे बघतो.)

अर्जुन : (एकदम दचकून) आवशिक खाव ! हा रे काय एकदम चमत्कार ? हा कोण बरे देवनारासारखा दिसतो आहे ? आणि त्याच्या खांद्यावर कोणी तरी बाईमाणूस दिसते आहे.... हीच सुभद्रा नसेल ना ? ( बाजूला जाऊन पाहत उभा राहातो...)

( तेवढ्यात राक्षस येतो. त्याच्या खांद्यावर निश्चेष्ट पडलेली सुभद्रा आहे. डायरेक्टर बाबूरावाने काढून खुंटीवर ठेवलेला सूट राक्षसाने घातला आहे. टाय बांधली आहे. इतकेच नव्हे, तर बाबूरावाचा ट्रान्झिस्टर-सुद्धा काखेत अडकवलेला आहे. )

राक्षस : हाः हाः हाः हाः ! मी राक्षस आसय – राक्षस ! महाभयंकर राक्षस ! हाः हाः हाः हाः ! ( हसतो. पाठोपाठ फडाफड तीनचार वेळा शिंकतो. आणि सुभद्रेच्या पदराने नाक पुसतो. ते पाहून ती भडकते आणि त्याच्या पाठीत दोन गुद्दे घालते. )

सुभद्रा : मेल्या शिंकतोस आणि माझ्या पदराला घाणेरडं नाक पुसतोस ? शीः ! बुर्सा कुठला !

राक्षस : अगो, तो मायझंयो मेकपवालो....हजाम भोसडीचो....मेल्यान् मिश्यो

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा

वा. क्र. 29662 नों. दि. 3/5/66

उलट्यो चिकटायल्योत...केस जातंत नाकात ! ( शिंकतो ! ) काय ह्यां ? हैराण झालंय शिंकान शिंकान – ( नाक तिच्या पदराला पुसतो. )

सुभद्रा : तुझ्या आता कानशिलात देईन हां ऽ

राक्षस : तू बोला नको गो ! तू बेशुद्ध आसंय मा ?...तू पडान् रव– ( प्रेक्षकांकडे बघत. ) मी राक्षस आसय राक्षस ! ( फडाफड शिंकतो– ) सर्वशक्तिमान....बलशाली ( शिंकतो –) छाः हैराण झालंय ! ( पदर धरतो तोंच– )

सुभद्रा : खबरदार माझ्या पदराला नाक पुसशील तर–

राक्षस : सुभद्रे, बाये तू पडान् रव गो ! बेशुद्ध आसंय मा तू ? डोळे मिटान् पडान रव – ( ती गपकन डोळे मिंटते आणि पडून राहते. ) आधी या सुभद्रेचा ओझां खाली उतरवून ठेवतंय...माझे खांदे मोडले ! ( तिला उतवून ठेवता ठेवताच तो शिंकतो. त्यामुळे ती खाली ठेवण्याआधीच धाडकन पडते. )

सुभद्रा : ( पडल्यामुळे किंचाळत– ) अरे मेल्या, मुद्दाम टाकतोस ?

राक्षस : नाय गो बाये, एकदम शिंक आयली गो ऽ ! ( पुनः शिंकतो ) छाः ! या मिश्यान् जमाचा नाय ! काढून ठेवल्याशिवाय गत्यंतर नाय – ( मिशा काढून खिशात ठेवतो. दाढी तशीच असते. ) तू, सुभद्रे, पडान् रव गो ऽ ! ( संवाद विसरतो. प्रॉम्प्टिंगसाठी इकडे तिकडे बघतो. )

सुभद्रा : ( हळूच ) तू पुढचं काय ते बोल ना रे–

राक्षस : तू पडान् रव गो– ( तेवढ्यात प्रॉम्प्टिंगचा आवाज ऐकू येतो.... मग प्रॉम्प्टिंगप्रमाणे बोलतो– ) शेबास...शेबास ! ह्या सुभद्रा माझ्या मोहिनी– मंत्रामुळे बेशुद्ध पडलाहा ! आता ह्येका माझ्यापासून कोण सोडयता तां बघया ! कोणाची माय विलीसा ता बघतंय ! हात्....हुत् ...जादूमंतर....छूः !....आता ह्येच्यार बलात्कार करतंय– ( सुभद्रा एकदम दचकून उठून बसते– ) पडान् रव गो तू ! भिया नको !....हाः हाः हाः हाः ....या सुभद्रेचा...सुंदरीचा काय ता मी बघतंय– (मध्येच काखेतला ट्रान्झिस्टर धरतो. एरियल बाहेर खेचतो आणि मीटर फिरवतो.... कान लावून ऐकतो....आवाज येत राहतात. )

अर्जुन : ( स्वतःशीच ) नक्कीच ! आता बघायलाच नको ! या दुष्ट राक्षसाने या बाईलमाणसाला पळवून आणलेली आहे ! ही कोण असेल ? माझी सुभद्रा तर नसेल ना ? ( खात्री होते. ) अरेच्या मारी ! ही सुभद्राच ! बघायलाच नको ! ( गद्यात–पण तालावर एक ओळ म्हणतो. ) कारण 'सुवर्णकतिकेपरि जो दिसतो वर्ण नव्हे तो दुसरीचा–' ( ही ओळ

म्हणताच ट्रान्झिस्टरवर नाट्यगीत लागते. ‘ आकाशवाणी–नाट्यगीत ऐका....‘ सुवर्णकेतकिपरि जो दिसतो वर्ण नव्हे तो दुसरीचा । सडपातळ नाजुक हा बांधा खचित त्याच मृदु देहाचा ॥ ’

अर्जुन : ( संतापतो. ) अरे, हे आता माझं गाणं आहे.

राक्षस : ( गंमतीने हसत ) तांच म्हणतंय मी ! जुस्त ह्यां येळेर रेडियोर कसा लागला ?

अर्जुन : ( संतापून ) तू तो ट्रान्झिस्टर आधी बंद कर ! मला वेळ होतोय... रात्री दोनाची येष्टी पकडून मला मुंबईला जायचंय.

सुभद्रा : ( वर मान करून ) आता वाजले किती ?

राक्षस : तू पडान् रव गो...तू बेशुद्ध आसंय मा ? (ती पटकन डोळे मिटते.)

अर्जुन : तू ट्रान्झिस्टर बंद कर ना रे. तो डायरेक्टर बाबूराव कुठं गेला ?

आवाज : तो तांब्या घेऊन भरडार गेलो हा.

अर्जुन : हे नाटक आहे की काय आहे ?

आवाज : अरे, ‘ सौभद्र ’ नाटकात ट्रान्झिस्टर कसों ?

राक्षस : थंयसर खुंटेर होतो रे.

अर्जुन : ( चिडून ) खुंटीवर होता म्हणून न् तो इथं आणतोस ? या बाबूरावानं ही कुठली सोंगं आणलीत परमेश्वर जाणे !

राक्षस : ( चिडतो. ) अर्जुना, तू माका सोंग म्हणा नको हांऽ ! तुका सांगान ठेवतंय ! तुझा खूप आयकला ! काय मोठो मुंबैचो म्हणान् तोंड वाजयतंय का काय ?

अर्जुन : तुझ्या कानपटात देव ?

राक्षस : ( चिडून ) दी बघया !...मी राक्षस आसय....राक्षस ! हाः हाः हाः !

नारद : ( एकदम आतून येत राक्षसाला ) अरे मायझंया, तू तुझे संवाद म्हण.

राक्षस : ( सुभद्रेला ) सुभद्रे, तू शुद्धिर ये बघया ( अर्जुनाला ) अर्जुना, तू तुझे संवाद घे ! ( सुभद्रा शुद्धीवर येते. )

अर्जून : ( आनंदित होत ) अहाहा ! देव पावला ! ही शुद्धीवर येते आहे... आता खरं काय ते समजेल.

राक्षस : ( आनंदाने ) हाः हाः हाः ! आता ही साळुंकीमैना शुद्धीवर येताहा ! येऊ दे ! मग मिठीत घेतंय....आणि ज्याम आवळून धरतंय.

आवाज : हळू रे, मायझंया, हळू आवळ ! नायतर आवळेल तेल पडात- ( लोक हसतात. ) ( सुभद्रा सावध होते. राक्षस तिच्या अंगावर जातो. तोच अर्जुन धावत येतो आणि राक्षसाला लोटतो. राक्षस पडतो आणि चिडतो. )

राक्षस : ( चिडून ) भोसडचोरीच्या, मी पडलंय मरे ! बरा तर बरा ! मुद्दाम धक्को देवून माका लोटलंय का काय? ( लंगडत उठतो...लंगडतो... मग दोन्हीही झोंबाझोंबी करीत आत जातात. )

सुभद्रा : ( उठून बसते. ) अग बाई ! हे ग बाई काय ? मला तर बाई भीती वाटतेय.... ही भुताटकी तर नसेल ना ? थोड्या वेळेपूर्वी तर मी माझ्या महालात निजले होते. ती एकदम या अरण्यात मी कशी आले ?... आणि माझी दासी कुठं गेली ? सगळ्या मेल्या खायच्या कामाच्या ! कामाला कोणीही नाही !

( पडद्यात अर्जुन–' दुष्ट राक्षसा ! त्या बाईलमाणसाला पळवून इथं आणलंस ..तिच्यावर मोहिनीमंत्र घालून तिला बेशुद्ध केलंस....आता मी तुला ठार मारून डोंगरावरून खाली फेकून देतो'.... राक्षसाचा मोठ्याने ओरडल्याचा आवाज. )

सुभद्रा : ( ऐकून ) कोणाचा बरे हा आवाज ? कुणाचं बोलणं ऐकू आलं की मला लग्नमंडपात न्यायला कोणीतरी आलं असं वाटतं आणि मला कापरं भरतं ! आता ह्यातून माझी सुटका कशी होईल कोण जाणे ! ( राक्षसाच्या रक्ताने माखलेला अर्जुन प्रवेश करतो. )

अर्जुन : ( स्वतःशीच ) शिरां पडो ! हा तर दैवी चमत्कार झाला ! मी त्या राक्षसाच्या छातीवर बसलो....आणि त्याला ठार मारणार तोच एकदम तो नाहीसा झाला ! भुताटकी व्हावी तसा ! कुठं गेला कळलंच नाही ! त्याला शोधावं तर सुभद्रा इथं एकटी ! म्हणून इथं यावं लागलं ! आता काय बरे करू ?

आवाज : प्रदक्षिणा घालताना केलंय तां कर मरे ! ( लोक हसतात. )

अर्जुन : (स्वतःशीच) ह्या घटकेला हिला माझी ओळख न देणं हे बरं. त्या राक्षसाचं रक्त माझ्या अंगावर पडलं आहे .... त्यामुळे तीही मला ओळखणार नाही ! (दुरून ऐकत ) ती आधी काय म्हणतेय ते ऐकू–

सुभद्रा : तसं म्हटलं तर या दासीने मला एकटीला इथं सोडली ते बरंच झालं ! घटकाभर मला माझ्या मनातलं बोलता येईल ! नाहीतर ते लग्न ठरल्यापासून कोणी ना कोणी माझ्या पाठीमागे आहेच–

अर्जुन : मला वाटतं, त्या राक्षसाने तिला इथं आणून सोडली हे तिला ठाऊक नसावं–तेही न सांगितलेलंच बरं ! नाहीतर तिची गाळण उडेल !

सुभद्रा : (खाली बसते–) काय हा माझ्यावर प्रसंग आला आहे !कृष्णानं तरी मला ह्यातून सोडवावं ! पण सगळे दादाला... बलरामदादाला घाबरून गप्प राहातात.... काहीही झालं तरी मी दुर्योधनाच्या गळ्यात माळ मुळीच घालणार नाही ! त्यापेक्षा मरण बरं–!

अर्जुन : (खूष होऊन) शाब्बास.... शाब्बास प्रिये ! हे ऐकून मला इतकं बरं वाटलं की काही बोलायला नको!

सुभद्रा : कधीपासून अर्जुनावर माझं प्रेम ! मी लग्न केलं तर–फक्त अर्जुनाबरोबरच करीन ! नाहीतर अशीच राहीन !

आवाज : नको गो ऽऽ ! अर्जुन एका पायावर तयार आसा ! लोक हसतात.)

आवाज : आजची येष्टीची तिकिटं काढलीत मगोऽ ! (लोक हसतात)

सुभद्रा : अग बाई ! दिवस मावळला तरी कुणाचा पत्ता कसा नाही ?ए ऽऽ सारंग नयने.... अग कुसुमावती...

आवाज : इलंय इलंय ! इलंय गो ऽऽ ! (लोक हसतात.)

अर्जुन : (पुढे होऊन) तू कुणाला बरे हाका मारते आहेस ? इथं आहे कोण ? (तेवढ्यात 'बाळ्या....बाळ्या' अशा हाका मारीत दत्तू येतो. अर्धी चड्डी. वर उघडा. वर चोळी. बटणे उघडी. दोन्ही हातात कडक पाव धरून येतो.)

दत्तू : बाळ्या, रे बाळ्या–

बाळ्या : (बाहेरून) काय रे ?

दत्तू : अरे, मेल्या उलागलंय खंय तू ?

बाळ्या : मी हंयसर पडद्यार आसय मरे–

दत्तू : अरे माका चहा आणून दिलंय नाय... मी पाव कसे खाव ?

बाळ्या : (बाहेरून) तू चहा आणून घे मरे–

अर्जुन : (चिडून) अरे, हे नाटक चालू असताना मध्येच काय तुझं ?

दत्तू : तुमचा नाटक चला दे रे ! मी बाळयाक चहा सांगतंय–

अर्जुन : अरे, पण सगळं सोडून तू इथं कुठं मरायला आलास ?

दत्तू : अरे, माका सुभद्रेचा काम करूक बोलायतात आणि कपभर चहा दिणात नाय– ही तुमची दानत ?

अर्जुन : (विंगेत बघत) तो डायरेक्टर बाबुराव कुठं गेला ?

आवाज : अरे तो टमरेल घेवन गेलो– (लोक हसतात.)

अर्जुन : (विंगेत बघत) बाबुराव अजून इलो नाय ?

आवाज : येवून परत गेलो ! सरपंचाचो मसालो ! (लोक हसतात.)

अर्जुन : (दत्तूला) तू आधी इथून आत जा बघूया–

सुभद्रा : (अर्जुनाला) तू त्याच्या कानपटात दे एक–

दत्तू : तू काय सुभद्रा झालंय म्हणान शाणा झालंय ?

अर्जुन : दत्त्या, तू इथनं जातोस...की गांडीवर लाथ मारू ?

दत्तू : माझ्या गांडीवर लाथ ? तू मारतलंय ? (पाठ करतो.) मार ! (आतून नारद येतो. त्याला–) तू मारतलंय ? मार–

नारद : दत्त्यां, नाटकाच्यामध्ये तू कुठं आलास ?

दत्तू : अरे मी तुमची तोंडां धरली ? तुमचा चलां दे रे.

नारद : तुला आता पाहिजे काय ?

दत्तू : कपभर चहा ! पाव बुडौन खातंय.

नारद : मी तुला चहा देतो....तू आत चल-( त्याला ओढत नेतो. )

अर्जुन : कुठपर्यंत आलो होतो आम्ही ?

सुभद्रा : मी दासीला हाका मारीत होते.

अर्जुन : हां...हां ! मार हांका.

सुभद्रा : अगबाई ! दिवस मावळला ! कुणाचाच पत्ता कसा नाही ? एऽऽसारंग नयने,...अग, कुसुमावती.

अर्जुन : तू कुणाला बरं हाका मारते आहेस ?

आवाज : त्या बाबल्यास हाको मारा.

सुभद्रा : ( दचकून उभी रहाते. ) हा कोण बरं आला इथं ? आणि याचे कपडे असे रक्ताने माखलेले कसे ? ( अर्जुनाला ) तुम्ही कोण ? तुम्ही इथं कसे आलात ?

अर्जुन : हे चारुगात्री, मी एक प्रवासी आहे ! तीर्थयात्रा करता करता चुकून मी या अरण्यात आलो...वाटेत जंगली प्राण्याची शिकार केली. म्हणून माझे हे कपडे रक्ताने माखले. बाकी तसं काही नाही.

सुभद्रा : (दचकून) काय ? म्हणता काय ? मी इथं जंगलात आहे ? मला इथं सोडली कोणी ?

अर्जुन : ते समजायला मार्ग नाही !

सुभद्रा : (भयभीत होते) अरे कर्मा ! आता दादा, वहिनी ह्या सगळ्यांना वाटणार की मी लग्नाचा मुहूर्त चुकवण्यासाठी इथं पळून आलेय !.... परमेश्वरा, अरेरे. माझा प्राण चालला....!
(एकदम मूर्च्छा येऊन पडते. अर्जुन तिला सावरतो. वारा घालतो. )

आवाज : अर्जुना, वाइंच हळू रे !.... लोका बघतहत ! (लोक हसतात.)

अर्जुन : (गडबडून) अरे देवा !... आता मी करू तरी काय ?

आवाज : काय तां लवकर करून घे- (लोक हसतात.)

अर्जुन : हे आता लचांडच झालं ! सांगतो काय ? सगळा माझाच खुळेपणा ! मी हिला सांगू नये कीं-मी धनंजय अर्जुन म्हणून?...इथूनच मी हिला इंद्र-प्रस्थाला न्यायचं सोडून छे... छे ! हाफमॅडच मी !— आता असं करतो.... सुभद्रा शुद्धीवर आली की तिला उचलतो आणि घेऊन जातो. मग काय होईल ते होवो. हा शेला.... हिनंच मला दिला होता, प्रेमाची

खूण म्हणून... तो हिच्या अंगावर घालतो. (तिच्या अंगावर शेला घालतो.) हिला शुद्धीवर आणायला पाणी हवं... कुठून तरी थोडं पाणी आणतो (जाऊ लागतो. तोच आतून टेपरेकॉर्डवाला साटम ओरडतो–)

साटम : अर्जुना, आता तुझं गाणं आहे–

अर्जुन : (गोंधळून) आता गाणं कुठलं? बाबूरावानं कापलंय ते!

साटम : कापलंय कुठं? (तो टेप सुरू करतो. पण अर्जुन थांबत नाही. आत जातो. टेप चालू– 'दैवयोग दुर्विपाक आजि जाहला। पुण्यबळे प्राप्त लाभ मीच दवडिला ॥' या दोन ओळी पुऱ्या होता होता राक्षस येतो. त्याने दाढी–मिशांचे जंजाळ काढून हातात धरले आहे.)

राक्षस : हाः हाः हाः मी मोठो राक्षस आसंय! मी शक्तिशाली बलवान राक्षस आसंय! हाः हाः हाः! मी बलशाली राक्षस आसंय ... (संवाद विसरतो.)

आवाज : अरे मायझंया, पुढचां बोला! इसारलंय का काय? (लोक हसतात.)

राक्षस : (प्रॉम्टिंग्गची वाट बघत–) मी बलशाली राक्षस आसय... (गडबडतो.... प्रॉम्पिटगचा आवाज येतो, त्याप्रमाणे तो बोलतो....) त्या...भगवान... द्वारकाधीश .... गोपाळकृष्णाचा कर्तुत कोणाक समजाचा नाय!.... कृष्णान आज्ञा केल्याप्रमाणे सुभद्रेक मी हंय आणून सोडलां! सगळी बतावणी केली. आता त्येच्या कपट नाटकाचो शेवटचो भाग रवलोसा तो करतंय आणि मोकळो होतंय! (हळूच) बाटली हाडान ठेवलीहा... वाइंच मारतंय आणि सुशेगात निजतंय... (मोठ्याने) कृष्णान् सवता ह्या पत्र लिल्यान... (पत्र उघडून वाचल्यासारखे करतो.) मेल्याचा अक्षर बरा नाय .. वाचणा कठीण!

आवाज : मेल्या, तुका लिवाक-वाचाक येता? (लोक हसतात.)

राक्षस : ह्यां पत्र मी थैलीत घालतंय! (थैलीचा वास घेतो. तोंड वेडेवाकडे करतो.) अरे भोसडीच्यानु, ही भगवान श्रीकृष्णाची थैली! अरे, बरी तरी बघात हाडाची! (परत वास घेतो...वाईट तोंड करतो.) ही रोजची मासे हाडूची पिशवी....! कोणाची रे ही? मेले नाटका करतहंत! जांव.... (पिशवी सुभद्रेच्या जवळ धरतो.)

सुभद्रा : (तडकते) ती मासळीची पिशवी लांब धर ना रे–

राक्षस : तू डोळे मिटान पडान रव गो! (लोक हसतात. ती पडून रहाते.) ह्या थैलीत कृष्णाचा पत्र घालतंय आणि कृष्णान सांगितल्याप्रमाणे ही थैली हंय टाकतंय! (विंगेतून प्रॉम्टिंग– 'भिक्या' मेल्या, रत्नहाराचं बोल ना रे–') काय ता?

आवाज : अरे, रत्नहार....रत्नहार... (लोक हसतात.)

राक्षस : (आठवून) हां...हां...रत्नहार! कृष्णान सांगल्यानी....मेल्याच्यो कटकटीच खूप! कृष्णान सांगल्यानी ..सुभद्रेचो रत्नहार काढून तो पिशवीत घाल आणि पिशवी तिथंच टाकून सुभद्रेला रंगमहालाल आणून ठेव! तर त्याप्रमाणे करतंय.... (सुभद्रेच्या गळ्याकडे चाचपतो. तोच सुभद्रा स्वतः मान वर करून आपल्या गळ्यातली रत्नमाला काढून देते.) अगो, तू कशी काढतंय रत्नमाला? बेशुद्ध आसंय मा तू?

सुभद्रा : तू मेल्या हलकट आहेस नंबर एकचा! माळ काढायच्या निमित्ताने इथं तिथं हात लावतोस.

राक्षस : मुद्दाम नाय गो! ती माळच आत गेलेली...! तू पडान रव. (मोठ्याने) हाः हाः हाः! मी मोठो राक्षस आसय, राक्षस! (हार थैलीत घालतो. थैली तिथंच टाकतो.) आता मी हिच्यावर मोहिनी मंत्र घालतंय.... (मंत्र घालण्याच्या निमित्ताने तिच्या अंगावरून चाचपल्यासारखा हात फिरवतो. ती उठते आणि पटकन त्याच्या मुस्कटात मारते. आणि–)

सुभद्रा : मी अर्जुनाला बोलवू?

राक्षस : चुकून हात लागलो गो! (मोठ्याने) हाः हाः हाः! मी राक्षस आसंय, राक्षस! शक्तिमान राक्षस....बलशाली राक्षस!
(तेवढ्यात संतापाच्या भरात विंगेतून बबूराव येतो. त्याच्या डाव्या हातात सगळीकडे चेपलेला कथलाचा घाणेरडा तांब्या आहे. अंगात फाटका गंजीफ्रॉक. कमरेला आखूड टॉवेल. तो धावत आल्यासारखा येतो आणि राक्षसाच्या फाडकन थोबाडीत देतो.)

बाबूराव : अरे, मायझंया, तुझं चाललंय काय? दारू पितोस आणि पेयतोस?

राक्षस : अरे, पण मी कलं काय?

बाबूराव : केलं काय? गांडीवर लाथ घालीन–

राक्षस : (चिडतो.) तू माझ्या गांडीर लाथ घालतलंय? तू समजतंय कोण? मोठो डायरेक्टर असशील तर मुंबैक! मी तुका (डाव्या हातावर उजवे मनगट मारून) मारतंय! (दोघे झटपट करतात.)

बाबूराव : (झटापट करता करता) अरे, अरे, सोड माका! माझा टुवाल सुटला– (तेवढ्यात आतून अर्जुन येतो. पाठोपाठ नारद येतो. अर्जुन राक्षसाच्या मुस्कटात देतो. तशी झटापट थांबते. क्षणभर नुसताच गोंधळ.)

अर्जुन : मघाशी मायझंयो स्टेजवर ट्रान्झिस्टर घेऊन आला– मी गायच्या टायमाला नाट्यसंगीत लावलं! तू हगायला गेला होतास–

बाबूराव : ( टॉवेल नीट बांधत– ) ते ऐकलं मी ! म्हणूनच पुढे आलो ! ( क्षणभर रागाने राक्षसाकडे बघत राहतो. ) भिक्या, तू राक्षस ना ?

राक्षस : ( हात उंचावून ) हा: हा: हा: !

बाबूराव : चूप ! गप्प उभा रहा ! तू राक्षस ना ? तुझी-दाढीमिशी कुठं ?

राक्षस : ( वैतागून ) त्यो मी काढून ठेवलंय....ह्या काय - ( खाली पडलेल्या उचलून दाखवतो )

बाबूराव : काढल्यास कशाला ?

राक्षस : तू ह्यो लावून बघ ! माका ह्यो जमाच्यो नाहीत–

बाबूराव : कां...कां ?

राक्षस ; त्या भडव्या मेकपवाल्यानं त्यो उलट्यो बसयल्योत ! मिश्यो नाकात जातंत ! हुळहुळ न् शिंको येतंत ! शिंकान शिंकान हैराण झालंय मी–

बाबूराव : ( नखशिखान्त कपड्याकडे बघत– ) आणि तू राक्षस–

राक्षस : हा: हा: हा: ! ( हात उंचावून ) महाशक्तिमान राक्षस–

बाबूराव : चूप ! महाभारतातला विषय ! दिवस कौरव–पांडवाच्या काळातले ! म्हणजे केव्हाचे ?

राक्षस : केवाचे ?

बाबूराव : ( चिडून ) अरे, मायझंया, हजारो वर्षे झाली !

राक्षस : झाली म्हणान काय झालां ?

बाबूराव : आणि तू टेरिलीनचे कपडे घालून येतोस ? पँट....कोट....टाय ? हॅट घालायचीस–

राक्षस : बघा होतंय गावता का–

बाबूराव : चूप ! राक्षस सूट घालता ?

राक्षस : अरे पण कपडेपटात कायच नाय ! तर मी घाला काय ?

बाबूराव : म्हणून टेरिलीनची पँट...कोट...टाय ? मेल्या, मी हगान आलो, शोधतो तर खुंटीवर माझे कपडे नाहीत !

राक्षस : अरे पण त्येका मी काय करू ? मी निजललंय !... माझी एंट्री इली म्हणान् ह्या सुभद्रा माका उठौक इला... ( सुभद्रा लाजून हसू लागते.) तू कित्याक हसतंय ?...त्येका मी काय करतलंय ?

बाबूराव : अरे, पण तुला तुझ्या कपड्याने एंट्री घेता आली नसती ?

राक्षस : तुझां आपला परत परत ताच ! माझ्या अंगावर कपडे होते खंय ? म्हणान् सुभद्रा पळाला....( सुभद्रा हसते. ) तुका हसाक काय गो झालां ? ऐन वेळां खुंटीवर ही पँट दिसली...म्हटलां, देवा तू पाव !

बाबूराव : तू घरून आलास तेव्हा तुझ्या अंगावर काय होतं ?

राक्षस : ह्यो टुवाल–( बाबूरावाचा टॉवेल दाखवतो. ) तो तू घेऊन गेलंय ! मी गाढ निजलेलो असताना !....आणि ह्य राक्षसाचे कपडे गावतले म्हणून मी टुवालाच्या आत लंगटीही नेसाय नाक.

बाबूराव : मला काय माहीत तिथं तू निजला होतास ते?...आता माझी पॅंट तरी दे.

राक्षस : आधी माझो टुवाल तू दी.

( एवढा वेळ या सर्व प्रकरणाला लोक हसत होते–टेपवर ! पण त्या भांडणामुळे कुणाचे लक्ष नव्हते. 'आधी माझो टुवाल तरी दी' हे वाक्य येताच 'तो टुवाल आत जाऊन सोड रे !' असे कोणीतरी बाहेरून ओरडतो आणि लोक मोठ्याने हसतात. त्यामुळे बाबूरावाचे एकदम पाठीमागे लक्ष जाते. पडदा उघडाच आहे हे बघून दचकतो. कपाळावर हात मारतो आणि ओरडतो. )

बाबूराव : बाळ्या, मायझंया, तू निजलाहेस का रे?

बाळ्या : ( बाहेरून ) नाय रे ! मी इथं पडद्यावर आहे.

बाबूराव : अरे भोसडीच्या, इथं हे महाभारत चाललंय....तू पडदा सोडायचा नाहीस ?

बाळ्या : आता सोडू ?

बाबूराव : नको ! ये आणि माझा टुवाल सोड. ( लोक मोठ्याने हसतात. बाबूराव सगळ्यांना आत घालवतो आणि सर्वांवर डाफरत ) चला...चला... आता सुरू करा. ( राक्षस, नारद, अर्जुन जातात. )

सुभद्रा : ( बेशुद्ध पडते आणि ) अरे मला कुणाला तरी उचलून न्यायला सांग... मी बेशुद्ध आहे ना ?

बाबूराव : ( चिडून ) आता तुला उचलायला हमाल आणतो ! उठ...आणि आपल्या पायांनी जा–

सुभद्रा : अरे, पण मी बेशुद्ध आहे ! चालू कशी ? तू त्या राक्षसाला बोलाव ना– त्याचं काम आहे ते–

बाबूराव : ( विंगेत बघत ) रे अर्जुना, अरे त्या राक्षसाला हाक मार.

अर्जुन : ( विंगेतून ) एऽऽ भिक्या...एऽऽ भिक्या !....अरे तो गेला.

सुभद्रा : मी इथं किती वेळ अशी पडून राहू ?

बाबूराव : तु तुझ्या पायांनी जा बघू या ! उगाच कटकटी नकोत. उठ आणि चालायला लाग–

( ती संतापाने उठते आणि ताडताड पाय आपटत आत जाते. लोक हुर्यो उडवतात...अर्जुन येतो. )

बाबूराव : ( वैतागून ) आता तुझं काय ?

अर्जुन : आता माझं काम आहे.

बाबूराव : मग सुरू कर ! खुंटासारखा उभा कशाला ?

अर्जुन : सुरू कर काय ? इथं पाण्याचा तांब्याही ठेवलेला नाही.

बाबूराव : ( घाबरून ) पाण्याचा तांब्या कशाला ? तुलाही घाईची लागली ?

अर्जुन : नाही रे ! सुभद्रेला शुद्धीवर आणायला पाणी नको ?

बाबूराव : ( हातातला कथलाचा तांब्या देत–) हा घे आणि कामाला लाग.

अर्जुन : शीः हा परसाकडचा तांब्या.

बाबूराव : घे रे ! आणि निभावून ने एकदा ( पटकन शिट्टी फुंकतो )

बाळ्या : पडदा सोडू ?

बाबूराव : कशाला पडदा सोडू ?

बाळ्या : मग तू शिटी का मारलीस ?

बाबूराव : चुकून मारली ! तू पडदा घट्ट धर ( आत जातो. अर्जून तांब्या लोंबवीत परसाकडे निघाल्यासारखा फिरतो. )

अर्जुन : ( आनंदाने ) आता एका घटकेत सुभद्रेला शुद्धीवर आणतो....(जागेवर सुभद्रा नाही असे पाहून–) अरे, इथं सुभद्रा होती ती कुठं गेली ?

आवाज : ता घरांक गेला रे– ( लोक हसतात. )

अर्जुन : मी जागा चुकलो की काय ? की वाघ–सिंहांनी तिला खाल्ली ? हाय–हाय ! अरे देवा ! आता माझी सुभद्रा हातची गेली ! आता रडून रडून दिवस काढायला हवेत ! ( इकडे तिकडे बघत ) अरे, हे काय इथं पडलं आहे ? ( पिशवी उचलतो. वास घेतो. कंटाळवाणे तोंड करतो. ) ही मासळेची पिशवी कोणाची ? ( लोक हसतात. ) ही पर्स सुभद्रेची दिसते आहे ! ( पिशवी उघडतो. रत्नमाला आणि पत्र बाहेर काढतो. ) आवशिक खाव ही रत्नमाला माझ्या ओळखीची आहे ! मी द्वारकेला गेलो होतो तेव्हा प्रेमाची खूण म्हणून मी हीच रत्नमाला सुभद्रेला दिली होती...त्या वेळेला मी ती वामन हरि पेठेकडे घेतली होती ! ह्या पत्रात तिनं काय लिहिलंय ते वाचतो....हे सुभद्रेचंच हस्ताक्षर : पत्रात तिनं लिहिलंय ( तो पत्र वाचत असताना टेपवर सुभद्रेच्या आवाजात गाणे सुरू होते. )

‘ शशिकुलभूषण सदया । मत्प्राणेश्वर विजया ।
विनवी ही तव जाया । मान्य कराया ॥
‘ रिपु नेता भार्येसी । सुचली यात्रा कैसी ।
याहुनि होउनि संन्यासी । न्या मज सेवेसी ॥ ’

( टेप थांबताच पत्र मिटतो. )

अर्जुन : ( दुःखाकुल होऊन ) हर हर ! हे पत्र वाचून माझ्या काळजाचं पाणी पाणी होतं आहे. असू दे ! आता ह्या अरण्यात रडून उपयोग नाही ! सुभद्रे, आता तू पत्रात लिहिल्याप्रमाणे मी संन्यासच घेतो ! नारदानं सांगितल्याप्रमाणे त्रिदंडी संन्यासच घेतो....

( तेवढ्यात नारद धावत धावत येतो. येता येता तो ' एऽऽ बाबल्या... एऽऽ बाबूराव.... मेल्या धाव....' असे ओरडतो. दुसऱ्या बाजूने बाबूराव येतो. तिथला तांब्या उचलतो.)

नारद : तू परत तांब्या घेऊन ?

बाबूराव : नाही रे ! तू ओरडलास कशाला ?

नारद : (धावपळ करीत) अरे, तो राक्षस पळाला.

बाबूराव : पळू दे ! त्याचं आता काम नाहीच आहे.

नारद : अरे मेल्या, तुझे कपडे घालून पळाला—

( ते ऐकून बाबूराव एकदम दचकतो. कमरेचा टॉवेल आवळून धरतो. काय करावे ते न कळून जागच्या जागी धावपळ करतो. )

बाबूराव : चल .. चल... धरूया त्याला ! माझे कपडे गेले तर वांधे ! पहाटेच्या एस्टीने मला मुंबईला जायचंय—

नारद : चल... चल लवकर ! (पण अर्जुन तिथेच उभा राहतो. ते पाहून ) तू चल ना रे, अर्जुना—

अर्जुन : चल कुठं ? अजून माझे संवाद म्हणायचे आहेत. ( संवाद म्हणत— ) आता मी त्रिदंडी संन्यासच घेतो—

बाबूराव : ( चिडून ) बाझंवतो तुझा संन्यास ! माझे कपडे गेले तर मला संन्यास घ्यायची पाळी येईल— (त्याला ओढत नेतो) मला घालायला दुसरे कपडे नाहीत—

बाळ्या : (बाहेरून ) बाबल्या, पडदा सोडू ?

बाबूराव : सोड... सोड....

बाळ्या : तू शिटी तरी दे—

( बाबूराव नाचानाच करीत शिटी देतो. बाळ्या पडदा सोडतो. त्याच-वेळी मोठा पडदा पडतो.)

॥ पहिला अंक समाप्त ॥

## अंक दुसरा

[ पडदा वर जातो. पण आतल्या मंचाचा पडदा अजून वर गेलेला नाही. बाळ्या पडद्याची दोरी धरून बाहेर उभा आहे. मंचावरचा गोंधळ दिसतो आहे. नारद, बलराम, सुभद्रा वगैरेंची उगाच धावपळ चालू आहे. तेवढ्यात घाईघाईने बाबूराव येतो. ]

**बाळ्या** : ( बाहेरून ) बाबल्या, ओढू पडदा ?

**बाबूराव** : ( आतून खेकसतो. ) थांब रे जरा ! बाळ्या, तुला घाई कसली झालीय ? ( बाकीच्यांना ) अरे, बाबांनो, आता सुरू करा ! अर्जुनाला दोनाच्या येष्टीनं मुंबईला जायचंय.

**नारद** : तू कधी जाणार ?

**बाबूराव** : मलाही जायचं होतं ! आता पण कसला जातो ?

**बलराम** : का ? आटपूया ना रे लवकर ? ही जुनी नाटकं हवी तिथं कापून लवकर आटपता येतात.

**बाबूराव** : अरे होय ! पण कपड्याचं काय करू ? या टुवालाने मुंबैला जाऊ ?

**बलराम** : तुझे कपडे गावलेच नाय ?

**नारद** : तो राक्षस मायझंया काळोखात निसटला ना रे.

**बलराम** : गावतील रे तुझे कपडे–

**बाबूराव** : ( चिडून ) गावतील ! पण कधी ?

**बलराम** : तो भिक्या कुठं तरी दारू पिऊन पडणार ...मग कपडे काढून घे !

**बाबूराव** : ( वैतागून ) आता तो कुठं आणि कधी पिऊन पडतो देव जाणे ! जाऊ दे ! आता तुम्ही सुरू करा. आता कृष्णाचा प्रवेश ना ? कृष्ण कुठं मेला ?

**नारद** : ( करंगळी दाखवीत ) लघवीला गेलाय.

**बाबूराव** : हे यांचं मला आवडत नाही ! मग एवढा वेळ काय करीत होता ? ( तेवढ्यात कृष्ण येतो. त्याच्यावर चिडून ) तरी बरं ! प्रवेश चालू असताना गेला नाहीस !

**कृष्ण** : सुरू करा ना रे ! माझ्यापासून वेळ कुठं आहे ?

**बाबूराव** : बाळ्या, जागा आहेस ना ?

**बाळ्या** : ( बाहेरून ) मी आहे इथं पडद्यावर ! उघडू ?

**बाबूराव** : उघड...उघड ! (सगळ्यांना आत घालवतो. )

**बाळ्या** : तू शिटी तरी मार.

( बाबूराव शिटी फुंकणार तोच दत्तू येतो. त्याच्या हातात दोन पाव. )

**बाबूराव** : ( त्याला हाकलून देत ) दत्त्या, तू भितूर चल !

**दत्तू** : भितूर चल, भितूर चल काय ?

**बाबूराव** : अरे, आमचं नाटक सुरू होतंय ?

**दत्तू** : तुमचं काय ते तुम्ही सुरु करा ! मी तुमच्या मध्येच येतोय !

**बाबूराव** : (त्याला ढकलत) तू आधी भितूर चल—

**दत्तू** : ( चिडतो ) माका ढकला नको ! भितूर चल, भितूर चल काय ! मी काय तुझी वाईल आसंय ? केवापासून मी सांगतंय... माका कपभर चहा द्या... तर कोण आयकाना....! ती दादा रेडकराची भैण.... कोण तां ? तां सुशी.... ता खय उलागला तेवा माका सुभद्रा करूक धावल्यात आणि आता माका च्याचा पाणी देवक कोण वाली नाय ? गरज सरो आणि वैद मरो तसा झालां मरे ह्यां !

**बाळ्या** : बाबल्या, पडदा ओढू ?

**बाबूराव** : (दत्तूला ओढून नेत—) ओढ.... ओढ....!

**बाळ्या** : (बाहेरून ) तू शिटी मार तरी—

**बाबूराव** : (कृष्णाला ) तू तुझं सुरू कर !

( शिटी फुंकतो. बाळ्या पडदा उघडतो. कृष्ण आसनावर बसतो. बाजूचे सुदर्शनचक्र उचलतो आणि बोटात घालून फिरवतो. मग विंगेत बघून)

**कृष्ण** : कोण आहे रे तिथं ?

(द्वारपाल येतो. त्याने आपला मंत्रालयातलाच पट्टेवाल्याचा पोषाख चढवला आहे. खादीची पँट, पांढरा डगला, तांबडा पट्टा, बिल्ला, वर पगडी.)

द्वारपाल : मी आहे, सैब!
(कृष्ण कपाळावर हात मारतो. आणि बाबूरावला हाक मारतो.)
कृष्ण : बाबूराव, एऽऽ बाबल्या– (बाबूराव येतो.)
बाबूराव : आता आणखी काय झालं?
कृष्ण : ह्याचा ड्रेस बघ– हा मंत्रालयातला पट्टेवाला–
द्वारपाल : सोनक्या, मी साधासुधा नाही, मुख्यमंत्र्यांचा पट्टेवाला आहे–
कृष्ण : (बाबूरावला) ह्याचा ड्रेस बघ! हा कृष्णाचा द्वारपाल आहे... की मंत्रालयातला पट्टेवाला?.... हा बिल्ला बघ! (वाचतो) महाराष्ट्र शासन! कृष्णाची काय इज्जत राहिली?
बाबूराव : म्हाद्या–
द्वारपाल : बाबल्या, माझं नाव महादेव आहे! म्हाद्या म्हणायचं नाही!
बाबूराव : महादेवा–
द्वारपाल : हांऽ! असं–
बाबूराव : अरे येडझंया, तुला द्वारपालाचा ड्रेस आणलाय ना? खाली सुरवार आणि वर सदरा–
द्वारपाल : अरे, पण माझा हा मंत्रालयातला रुबाब गाववाल्यांना कधी दिसणार?
कृष्ण : हा ड्रेस घाल आणि उद्या गावभर फिर–
बाबूराव : मग ती सुरवार आणि–
द्वारपाल : कसली सुरवार? कोणाच्या मापाची बाळ्याने आणलीय देव जाणे! घालून जरा वाकलो तर कुल्ल्यावर फाटली!
बाबूराव : (चिडून) कुल्ल्यावर फाटली म्हणून काय झालं? तुझे कुल्ले बघायला कोण आलंय? आणि वर सदरा आहे तो–
द्वारपाल : अरे तो सदरा आहे आखूड! तो येतो कुल्ल्याच्यावर–
बाबूराव : (आशेने) मग ते कपडे आहेत कुठे? मी तरी घालतो...केव्हापासून मी ह्या टुवालावर आहे....कधी सुटेल नेम नाही.
द्वारपाल : ते कपडे भितूर आहेत–
बाबूराव : (आत जाऊ लागतो–) भितूर?
द्वारपाल : भितूर म्हणजे तिकडे नव्हे रे– ह्या पँटीच्या भितूर चढवले. ते आता काढता येत नाहीत!
बाबूराव : शिरां पडो तुझ्या तोंडार! (वैतागून) जाऊ दे! तुम्ही सुरू करा– (शिट्टी मारतो आणि आत जातो.)
द्वारपाल : (कृष्णाला) पुनः घे– (आत जातो.)
कृष्ण : (टाळी वाजवीत) कोण आहे रे तिथं!

द्वारपाल : (बाहेर येत.) मी आहे, सैब !

कृष्ण : अरे चक्रदंडा, दादांची स्वारी कुठं गेली ?

द्वारपाल : दादांची स्वारी ? दिल्लीला–

कृष्ण : (चक्रावून) दिल्लीला ?

द्वारपाल : दिल्लीहून आले की सांगली ! दादा इथं असतात कुठं ?

कृष्ण : अरे, तू कुठल्या दादाचं सांगतो आहेस ?

द्वारपाल : वसंतदादांचं ना ?

कृष्ण : अरे, मी विचारतोय बलरामदादाचं.

द्वारपाल : (एकदम चूक लक्षात येते.) चुकलं ! आम्हाला रोजची मंत्रालयातली सवय–परत घे–

कृष्ण : अरे चक्रदंडा, दादांची स्वारी कुठं गेली ?

द्वारपाल : दादांची स्वारी गर्गमुनींच्या दर्शनाला गेलीय, महाराज.

कृष्ण : (स्वतःशी) असं ? ते एक बरं झालं ! गर्गमुनी माझ्या बाजूने आहेत... ते दादांना योग्य तेच सांगतील ! (उघड) बरं, चक्रदंडा, तू एक कर–

द्वारपाल : काय करू सांगा–

कृष्ण : दादांची स्वारी इथं आली की मला सांगायला ये !

द्वारपाल : येतो, महाराज ! (वाकून वंदन करतो आणि जातो.)

कृष्ण : (स्वतःशीच) हे सगळं आता लफडं झालंय ! आमच्या बलरामदादांचा स्वभाव म्हणजे एक नंबरचा हट्टी ! नाहीतर– एरव्ही लाख माणूस ! पण मनानं एक घेतलं की तेच करणार ! मग शेंडी तुटो नाहीतर पारंबी तुटो !...सुभद्रा दुर्योधनाला द्यायची हा दादांचा हट्ट ! तिकडे सुभद्रा म्हणते, मला दुर्योधनाला द्याल तर प्राण सोडीन ! तिला लग्न करायचं आहे अर्जुनाबरोबर ! नवरीमुलगी ती ! तिच्या मनासारखं व्हायला नको ? सगळीकडे स्त्रीमुक्तीची चळवळ चालू आहे. पण आमच्या दादा-वर त्याचा काहीएक परिणाम नाही ! म्हणून गर्गमुनींच्या बरोबर मसलती करून मला ही सगळी झेंगटं करावी लागली. अर्जुनाची तीर्थयात्रा ...त्याची आणि नारदाची भेट...संन्यास घेण्याचा उपदेश....राक्षसा-तर्फे सुभद्रेला पळवून नेणं, परत आणून तिच्या महालात ठेवणं....ही सगळीं झेंगटं मला करावी लागली ! (हसत) मलाही असल्या झेंगटांची आवडच ! (थांबून) आतापर्यंत तरी सगळं बरोबर जमलं आहे ! (हसत) काय सांगू तुम्हाला ? दुर्योधन सगळं वऱ्हाड घेऊन इथं आला. पण सुभद्रेला पळवून नेलं म्हणताच मुहूर्त चुकला ! आता चातुर्मास ! म्हणजे चार महिने मुहूर्त नाही !...तरी सुभद्रा परत आली म्हणताच

दुर्योधन इकडलं तिकडलं पंचांग आणून नवीन मुहूर्त काढायला बघत होता. पण मी त्याला सांगितलं....ज्योतिर्भास्कर जयंतराव साळगावकरांच्या 'कालनिर्णय' पंचांगातलाच मुहूर्त आम्हाला हवा ! कारण साळगावकर मालवणचे ! 'कालनिर्णय'ची मागली बाजू दुर्योधनाला दाखवली...दुर्योधन वाचत बसला— मक्याचे कटलेट...ब्रेडचे कबाब... भोपळ्याची खीर...आणि हस्तिनापुरात गेला ! त्यामुळे मलाही लटपटी करायला थोडा वेळ मिळाला !....आता आमचा अर्जुन साधुसंन्यासी होऊन रैवतक पर्वतातल्या गुहेत ध्यान करीत बसला आहे. मला बलरामदादाला त्याच्या नादाला लावायचं आहे ! त्यासाठी द्वारकेत या संन्याशाची ख्याती झाली पाहिजे. तशी व्यवस्था केली आहे ! पण लोकांचं काय सांगता येतं ? कुठं धावतील आणि कुठं पाठ फिरवतील याचा नेम नाही ! म्हणून आमचा मित्र वक्रतुंड ब्राह्मण त्याला त्या कामावर धाडलंय ! . ब्राह्मणाला पाठवलंय म्हणून काहीजण चिडलेत....मला प्रतिगामी म्हणताहेत ..पण वाकड्यातलं काम करायला ब्राह्मणच पाहिजे !....हा वक्रतुंड ब्राह्मण काय सांगतो ते बघूया ! (विंगेत पाहून) अरे वा: ! तोच येतो आहे ! (वक्रतुंड ब्राह्मण थकून येतो. )

वक्रतुंड : (हुश्श करीत—सुस्कारा टाकून) खरं म्हणाल, तर हे ओव्हरटाइमचं काम आहे ! पण मला ओव्हरटाइम मागता येत नाही ! काहीच मागता येत नाही. ब्राह्मण पडलो ! अहो, माझा अख्खा दिवस मोडला ! भल्या माणसानं या कृष्णाच्या नादाला मुळी लागू नये. मी म्हणतो, मरेना का तो साधू ! आपल्याला काय करायचंय ? खरं की नाही ? बरं, त्या गुहेचा तरी धड पत्ता द्यावा ? मी आपला शोध शोध शोधतोय... (थांबून) चला ! (कृष्णाला बघून) वा: ! राजेश्री ऐटीत बसला आहे ! महा झेंगटी माणूस ! त्याच्या कानावर काय ते घालतो... आणि घरचा रस्ता धरतो ! नाहीतर हा दुसरं एखादं लवंगाट गळ्यात बांधील ! (कृष्णाजवळ येऊन—) मित्रा, आज बरं बाबा, आमचं कांडप काढलंस !

कृष्ण : वक्रतुंडा, ये... ये.... बाबा, बस असा ! झालं काय ?... सांग तरी—

वक्रतुंड : झालं काय ? ह्याच्यापुढं असली कामं मला सांगू नकोस—

कृष्ण : अरे, पण झालं काय ते सांगशील की नाही ?

वक्रतुंड : हे माझ्या पायाचं कसं धिरडं झालंय ते बघ... नुसती चाळणी झालीय ! अरे, रैवतक पर्वताकडे जायचे रस्ते काय रस्ते आहेत ? मला वाटतं, ते रस्ते बॉंबे म्युनिसिपालिटीकडे असावेत—

कृष्ण : का ?

वक्रतुंड : अरे, ढोपरभर खोल खळगे ! आणि ते काय एक आणि दोन ? त्या पु. ल. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे रस्त्यात खळगा की खळग्यात रस्ता तेच कळेना ! बरं तर बरं ! माझे हातपाय मोडले असते !

कृष्ण : ते जाऊ दे ! त्या साधूची ख्याती किती झालीय ते सांग.

वक्रतुंड : त्याची तू मुळीच काळजी करू नकोस ! अरे कृष्णा, मी तिथं जातो तो लोकांची लाइन केवढी ? त्यामानानं मंगळवारची सिद्धिविनायकाची लाईन काहीच नाही ! ही ऽऽ लोकांची झुंबड !

कृष्ण : असं ? पण एकदम या साधूचं नाव कसं काय झालं ?

वक्रतुंड : नाव रे न व्हायला काय झालं ? आमची लोकं म्हणजे मायझयी मेंढरं ! एका मेंढरानं खळग्यात उडी घेतली की सगळी मेंढरं त्या खळग्यात ! झालं काय ? गर्गमुनी काही ब्राह्मणांबरोबर बोलत बसले होते. तेवढ्यात ते उठले आणि त्यांनी जाऊन त्या साधूच्या पायावर लोटांगण घातलं ! त्यासरशी सगळया भटांनी लोटांगण घातलं–

कृष्ण : ( हसत ) भटांना हल्ली लोटांगण घालायला सांगायलाच नको !

वक्रतुंड : तू भटाब्राह्मणांच्या नावानं बोटं मोडू नकोस ! तू क्षत्रिय म्हणून ? हल्ली सगळ्या जातीचे लोक लोटांगण घालण्यात पटाईत आहेत...या एवढ्याच एका कामात जातिभेद राहिलेला नाही !

कृष्ण : ( हसत ) बरं बुवा ! पुढं सांग –

वक्रतुंड : एक आडवा म्हणताच सगळे आडवे ! शंभर गावं साधूच्या दर्शनाला लोटली !

कृष्ण : ( हात जोडून वर बघत ) या गर्गमुनींनी मला वाचवलं ! गुरू असावेत तर असे ! ( गाण्यासाठी म्हणून दोन पावले पुढे येतो. हात पुढे करून गाण्याची पोज घेतो. विंगेत बघतो. दोन क्षण जातात. )

वक्रतुंड : तू हे काय करतो आहेस ?

कृष्ण : आता माझं गाणं आहे !....‘ कोण तुजसम सांग मज गुरुराया । कैवारी सदया । ’ ( विंगेत बघत ) साटम कुठं गेला ? निजला की काय ?

वक्रतुंड : म्हणजे काय ? तू निजला होतास की काय ?

कृष्ण : का ?

वक्रतुंड : साटम टेपरेकॉर्डर घेऊन मघाशीच घरी गेला.

कृष्ण : असं ? का ? झालं काय ?

वक्रतुंड : बाबल्याने त्याच्या कानपटात मारली–

कृष्ण : ही मालवणी माणसं म्हणजे ! पण का ?

वक्रतुंड : त्यांची भांडाभांड ! साटमाने बाबल्याचा टुवाल सोडला !

कृष्ण : का ?

वक्रतुंड : तू कृष्ण ! सर्वज्ञानी ! मला काय विचारतोस ?
(टॉवेल आवळत बाबूराव येतो. तो खूप चिडलेला आहे.)

बाबूराव : (भडकून) अडाणचोट आहात तुम्ही !

कृष्ण : काय झालं ?

बाबूराव : काय, झालं काय ? येडझये कुठले ?

वक्रतुंड : अरे पण बाबल्या झालं काय ?

बाबूराव : अरे, नाटक संपल्यावर करायच्या गजाली तुम्ही नाटक चालू असताना करताय...या लोकांसमोर...

कृष्ण : तू बाबल्या—

बाबूराव : बाबूराव ! पी. बाबूराव ! या लोकांसमोर तू परत परत मला बाबल्या बाबल्या म्हणू नकोस !

कृष्ण : (चिडून) तू बाबल्या, मोठा डायरेक्टर झाला आहेस...इथं माझं गाणं आहे तर ते वाजवायला साटम नाही !

बाबूराव : बाझंवता तो साटम ! तू गाण्याशिवाय डायलॉग घे ! त्या अण्णासाहेब किर्लोस्करांना नव्हता उद्योग ! साठ पानांच्या नाटकात सत्तर गाणी ! गायला आणि ऐकायला सवड कोणाला आहे ? चला...पटापट डायलॉग घ्या !... दोनाची येष्टी आहे. मुंबैला जाणारी.

कृष्ण : तो राक्षस.

बाबूराव : (एकदम आशेने—) कुठे ? कुठे ? (इकडे तिकडे बघतो.)

कृष्ण : कुठं गेला तेच विचारतोय. तुझ्या कपड्याचं काय ?

बाबूराव : (चिडून) त्याची चर्चा इथं नको ! तुझ्या अंगावर आहेत ना कपडे ? धोतर...शेला...उपरणं...कामं करा आपापली. (आत जातो.)

वक्रतुंड : तू तुझं काय ते घे !

कृष्ण : बरं, मित्रा, मी त्या साधूच्या पुड्यात ठेवण्यासाठी तुझ्याकडे मिठाई, आणि मालवणी खाजा दिलं होतं...त्यातला प्रसाद म्हणून तू काही आणलं असशीलच माझ्यासाठी ?

वक्रतुंड : (बाजूला तोंड करीत स्वतःशीच) मला वाटलं होतं. मेला विसरेल म्हणून ! पण पक्का आतल्या गाठीचा आहे ! उगाच नाही असली झेंगटं करतो ! (उघड) कृष्णा, मित्रा, तुला काय सांगू ?

कृष्ण : काय झालं ?

वक्रतुंड : अरे. वर कडक ऊन...खाली सगळं तापलेलं...

कृष्ण : ( त्याचीच छत्री दाखवीत. ) पण ही छत्री होती ना ?

वक्रतुंड : ती उघडायला विसरलो !...त्या उन्हातून पर्वतावर जातो...जातो... जातो.

कृष्ण : गेलास ! आता पुढचं सांग !

वक्रतुंड : वर गेलो....तर माझा जीव जातो की राहतो...जातो की राहतो .. जातो की राहतो....

कृष्ण : जीव राहिला ! आता पुढचं सांग !

वक्रतुंड : ( बाजूला ) असा चेंगट इसम माझ्या बघण्यात नाही ! ( उघड ) तर सांगतो काय ? वर गेलो...तिथं सावलीत एक झरा दिसला...तिथं बसलो–

कृष्ण : आणि पाणी प्यालास ! पुढचं सांग !

वक्रतुंड : नुसतं पाणी कसं पिणार ? गुळाच्या खड्याबरोबर पाणी प्यावं असं शास्त्र आहे ! म्हणून मिठाई आणि खाजा खाल्लं आणि वर पाणी प्यालो. हल्ली भडवीचे खाज्यात पूर्वीसारखं आलं–तीळ घालत नाहीत !

कृष्ण : म्हणजे सांगायचं काय ? ..तर माझ्यासाठी काही आणलेलं नाही–

वक्रतुंड : नाही कसं? आणलंय! ( पिशवीतून कागदाचे बोळे काढतो. ) मिठाई.... आणि खाजा बांधलेले कागद आणलेत.... ( कागद देतो. कृष्ण हसतो. ) आणि ती मिठाईसुद्धा–

कृष्ण : बरी नव्हती ?

वक्रतुंड : छा ! तू द्वारकेचा राजा !...दूध...दही.... लोणी.... तूप खाणारा–

कृष्ण : ते सगळं गेलं ! आमच्या गोपी राहतात लायनीत बाटल्या घेऊन ! सरकारी दुधासाठी !

वक्रतुंड : आणि द्वारकेत मिठाई डालडा तुपातली ! केव्हा ऐकलं होतंस ? जाऊ दे ! पण मला एक सांग–

कृष्ण : काय ?

वक्रतुंड : तुला एवढं त्या साधूचं प्रेम का ?

कृष्ण : असं कसं म्हणतोस, तू भटा ?

वक्रतुंड : ( चिडून ) तू भटा....भटा म्हणू नकोस ! त्यापेक्षा तू मला दोन शिव्या घाल–

कृष्ण : ( हसत ) अरे वक्रतुंडा, तो साधू म्हणजे ईश्वराचा अवतार आहे ! त्याला द्वारकेत आणावं–

वक्रतुंड : तो द्वारकेत आला की टीव्हीवर योगासनांचे धडे देणार–

कृष्ण : छे ..छे ! हा काही तसला ब्रह्मचारी साधू नव्हे ! हा ईश्वरी अवतार आहे !

वक्रतुंड : कोणी सांगितलं ?

कृष्ण : गर्गमुनींनी–

वक्रतुंड : हे बघ, हे साधू आणि मुनी यांच्या नादाला तू लागू नकोस...

कृष्ण : (चिडून) तुम्ही कोंकणी माणसं म्हणजे कुणाबद्दल कधी बरं बोलणार नाही !

वक्रतुंड : (चिडून) तू हे मला मुळीच सांगू नकोस ! उगाच साधूंची सोंगंढोंगं वाढवायची ही कामं आहेत !... मी हा असाच इथून जातो आणि दादासाहेबांच्या कानावर घालतो–

कृष्ण : पण यात तुझं काय वाकडं झालं ?

वक्रतुंड : वाकडं काय झालं म्हणजे काय ? हे साधुसंत म्हणजे बाईलमाणसं जमवण्याचे धंदे ! या साधूभोवती बायकांचा केवढा रे गराडा ? त्यांतली एक घागरा नेसून आली होती.... केवढी रे ? घागरा उघडला असता तर सर्कशीचा तंबू झाला असता !

कृष्ण : (हसत) पण त्यात तुझं काय गेलं ?

वक्रतुंड : काय गेलं ? अरे मी बघतो तर त्यात माझी बायको !

कृष्ण : (हसत) घागऱ्यात ?

वक्रतुंड : घागऱ्यात नव्हे, गराड्यात–

कृष्ण : त्यात वाईट काय ?

वक्रतुंड : वाईट काय ? अरे पाच नारळ घेऊन उभी ! हल्ली पाच रुपयांखाली नारळ मिळतो ?

(तेवढ्यात पट्टेवाला द्वारपाल गडबडीने येतो. वक्रतुंडाच्या कानात काहीतरी सांगतो. वक्रतुंड चिडतो.)

द्वारपाल : (त्याला ओढत) तू बेगिन आधी भितुर चल–

वक्रतुंड : (चिडून) तुमी मायझंयानु नाटका करतहात की, उपटतहात ?

कृष्ण ; काय झालं ?

वक्रतुंड : तो बाबल्या कुठं गेला ? पुनः तांब्या घेऊन गेला की, काय ?

कृष्ण : अरे, पण झालं काय ?

वक्रतुंड : अरे, त्या बलरामाला मिशा पाहिजेत म्हणून माझ्या मिशा मागायला आला आहे ! (चिडून) त्या गण्या रंगाऱ्याला मेकपवाला कोणी केला ? त्यापेक्षा हजामती कर म्हणावं ! ह्याला दोन मिशा एक्स्ट्रा ठेवता येत नाहीत....? माझ्या मिशा उलट्या करून बलरामाला लावणार !

द्वारपाल : (चिडून) अरे, पण मेल्या, तुझां झाला मा काय ? मगे दी त्यो मिश्यो

वक्रतुंड : (चिडून) जीव गेलो तरी मिश्यो दिवचंय नाय ! तू दी तुश्शो मिश्यो–

द्वारपाल : (चिडून) अरे ! मी माझ्यो मिश्यो कशो दिव ? ह्यो काय लायल्यो मिश्यो आसत ? माझ्यो ह्यो खऱ्यो मिश्यो–

वक्रतुंड : वस्ताऱ्याने उडव आणि दे–

द्वारपाल : वस्ताऱ्याने उडव आणि दे ! मग मंत्रालयात वेळ कसा घालवू ? मिशीला पीळ देता देता वेळ जातो–

(तेवढ्यात संतापलेला बाबूराव घाईघाईने येतो.)

बाबुराव : भिक्कारचोट माणसं आहात तुम्ही ! हे काय नाटक चाललंय की काय चाललंय ! (फटकन वक्रतुंडाची मिशी उपटतो आणि द्वारपालाकडे देतो) जा– बलरामाला चिकटव....(वक्रतुंडाला ढकलतो.)

वक्रतुंड : (नाइलाजाने) बरे बुवा ! नाटका करतंहत ! (द्वारपाल त्याला ओढत नेतो.)

कृष्ण : अरे, तुम्ही सुद्धा काय ? दोन मिशा ज्यादा आणू नयेत ?

बाबुराव : अरे, त्या मेल्या राक्षसाच्या दाढीच्या पन्नास मिशा झाल्या असत्या ! पण मायझंयो दाढीमिशासकटच पळालो...माझे कपडे घालून.... (टॉवेल आवळून धरतो.) तुम्ही तुमचं सुरू करा– (आत जातो.)

कृष्ण : रे म्हाद्या...महादेव–

द्वारपाल : (येतो–) काय ?

कृष्ण : तू विसरलास की काय ?

द्वारपाल : (जीभ चावतो– ) तांच इसारलंय ! महाराज, दादांची स्वारी इथंच येते आहे! ..येताहेत.... जरा मिशा चिकटायच्या आहेत....(जातो.)

(कृष्ण सुदर्शन चक्र बोटात घालून फिरवून बघतो. ते नीट फिरत नाही. तेवढ्यात बलराम मिशा दाबत येतो. विंगेत बघत– )

बलराम : एऽऽ गण्या, मिश्यो पडतहत मरे ! (आतून गण्याचा आवाज– 'वाईच दाबून धर... दाबन धर—' बलराम संवाद म्हणत असताना मधून मधून मिशा दाबत रहातो.)कृष्णा, काय चाललं आहे ?

कृष्ण : हे सुदर्शन चक्र जरा फिरवून बघत होतो–

बलराम : फिरतं ना ?

कृष्ण : वरं ऽऽ फिरत नाही !

बलराम : हल्लीची चक्रं तसलीच रे ! बॉल बेरींगं बरी नसतात ! बरं, दे जाऊ दे ! सुभद्रेची काय खबर ?

कृष्ण : सुभद्रा एकदम हडकली !

बलराम : खाते पिते की नाही ?

कृष्ण : थोडा पेजेचा निवळ घेते....

बलराम : उकड्या तांदळाची पेज बरी ! ( मिशा दाबत ) सुभद्रा मुहूर्ताच्या वेळेवर नाहीशी झाली आणि मुहूर्त टळून गेल्यावर परत आली हा चमत्कार—

कृष्ण : ( चमकून ) चमत्कार ? कोणाचा चमत्कार ?

बलराम : ( मिशा दाबत—) मला संशय आला की.... हे तुझं कपट—कारस्थान की काय? कारण तुला असली लफडी करण्याची सवय आहे—

कृष्ण : ( दचकून ) दादा, तू म्हणतोस काय ? तुलाही माझा विश्वास नाही ?

बलराम : ( चिडून कसली रे तुझी मेल्या कामं ?

कृष्ण : ( दचकून ) माझी कामं ?

बलराम : तुझी नव्हे रे ! मी त्या मेल्या गण्याला सांगतो— माझ्या या मिशा सटकताहेत— ( मिशा चिटकवतो. )

कृष्ण : दादा, तुलाही संशय येतो की हे माझं कपटकारस्थान म्हणून ?

बलराम : नाही रे ! आता माझा संशय फिटला ! गर्गमुनींनी मला सगळं सांगितलं—

कृष्ण : काय सांगितलं ?

बलराम : त्यांनी सांगितलं.... यक्षकिन्नर जातीतल्या काही काही यक्षिणी मोठ्या मायावी असतात... त्या आकाशात फिरतात....

कृष्ण : असं ?

बलराम : आणि सुंदर राजकन्येच्या लग्नाच्या वेळेला काही तरी चमत्कार करतात. त्यांचा काहीतरी कोप असतो—

कृष्ण : कोप आमच्यावर की दुर्योधनावर ?

बलराम : दुर्योधनावर असं ते म्हणाले ! म्हणून दुर्योधनाला ताबडतोब पत्र पाठवून मी इथं आलो !

कृष्ण : पत्र ताबडतोब पाठवलंस ते बरं केलंस ! कारण पत्रं हल्ली वेळेवर पोचत नाहीत—

बलराम : गर्गमुनीनी हे सगळं सांगितलं म्हणून बरं झालं !

कृष्ण : ( बाजूला—स्वगत ) गुरुमहाराज ! तुमच्यामुळे मी बचावलो ! (बलरामास) दादा, मी अर्जुनाच्या पक्षाचा असलो तरी तुझ्याबरोबर कपट करीन असं तुला वाटलं तरी कसं ?

बलराम : अरे, हल्ली कोण कुठल्या पक्षाचा आणि कुठल्या गटाचा ते कळायला काही साधन आहे का? ते जाऊ दे ! या झेंगटात त्या बिचाऱ्या दुर्योधनाला फुकटचा हेलपाटा पडला !

कृष्ण : दुर्योधनाचं जाऊ दे ! सुभद्रेच्या तब्येतीचं आधी काय ते बघायला पाहिजे ! ती नुसती निजून असते—

बलराम : नुसती निजून असते ?

(तेवढ्यात सुभद्रा गडबडीने येते.)

कृष्ण : (तिला बघून चक्रावतो–) अग, तू निजून असतेस असं मी ह्याला सांगतोय आणि तू इथं पायांनी कशी चालून येतेस ?

सुभद्रा : (दुर्लक्ष करीत–) बाबूराव कुठं गेला ?... बाबल्या ऽऽ

बलराम : झालं काय ?

(तेवढ्यात बाबूराव गडबडीने येतो.)

बाबूराव : आता आणखी काय गडबड ?

सुभद्रा : बाबल्या–

बाबूराव : तू माका बाबल्या म्हणू नको !

सुभद्रा : (चिडून) मी तुला बाबल्याच म्हणणार–बाबल्या, मेल्या तू कसलं डायरेक्शन करतोस ?

बाबूराव : काय झालं ?

सुभद्रा : कुसुमावती आणि सारंगनयना आहेत कुठं ?

बाबूराव (गडबडून) त्या कोण ?

सुभद्रा : हेच ते ! ह्या कोण ? ह्या सुभद्रेच्या दोन दासी ! कुसुमावती आणि सारंगनयना....दोघींचाहीपत्ता नाही ! आता तुम्ही काय ते बघून घ्या– (जाते.)

बाबूराव : दोघीही आल्या नाहीत ? (चिडतो–)बाळ्या, अरे तू कुठं मेलास ?

बाळ्या : (बाहेरून) मी इथं पडद्यावर आहे ना रे–

बाबूराव : तू आधी इथं ये ! तुझ्या गांडीवर लाथ घालतो.

(बाळ्या वर जातो.)

बाळ्या : काय झालं ?

बाबूराव : (एकदम प्रेक्षकांकडे लक्ष जाते) अरे मायझंया, पडदा सोडायच्या आधी वर कशाला आलास ?

बाळ्या : पडदा सोडू ?

बाबूराव : सोड ना रे लवकर.

बाळ्या : पण तू शिटी तरी मार.

(तो खाली येतो. बाबूराव शिटी मारीत राहतो. बाळ्या पडदा सोडतो. आणि वर जातो.)

बाबूराव : (थकतो) बाळ्या––

बाळ्या : झालं काय ?

बाबूराव : अरे मेल्या, कुसुमावती आणि सारंगनयना गेल्या कुठं ?

बाळ्या : ह्या कोण ?
बाबूराव : अरे, त्या बाप्पा गोडकराच्या मुली.
बाळ्या : दीप्ती आणि तृप्ती ?
बाबूराव : तू कामं कसली करतोस ?
बाळ्या : सात वाजताना मी गोडकराच्या घरी जाऊन आलो.
बाबूराव : मग ?
बाळ्या : गोडकरीण म्हणाली, दोघीही गेल्या.
बाबूराव : कुठं मसणात ? अरे, गेल्या म्हणजे कुठं गेल्या ?
बाळ्या : तेच मला कळत नाही ! मारुतीच्या देवळाकडे गेल्या की काय ?
बाबूराव : तिथं काय ?
बाळ्या : तिथं वालावलकरांचं नाटक आहे.
बाबूराव : सौभद्रच ?
बाळ्या : छा ! तिथं 'रामविजय' नाटक आहे !
बाबूराव : मग ह्या दोघी तिथं काय करणार ?
बाळ्या : सीतेच्या दासी !
बाबूराव : सुभद्रेच्या दासीचे संवाद तिथं म्हणणार ?
बाळ्या : चालतं ! इथं सगळं चालतं !
बाबूराव : पण तिथल्या सीतेच्या दासी इथं कशा नाही आल्या ?
बाळ्या : मी जाऊन घेऊन येऊ ?
बाबूराव : सीतेच्या दासी ?
बाळ्या : नाही रे ! सुभद्रेच्या दासी– दीप्ती आणि तृप्ती !...त्या दोघीनाही घेऊन येतो.
बाबूराव : किती वेळ लागेल ?
बाळ्या : तासाभरात येतो–
बाबूराव : तासाभरात ? मेल्या तोपर्यन्त प्रेक्षक मला जिवंत ठेवतील ?
बाळ्या : मग काय करूया तर ?
(तेवढ्यात प्रारंभी नटी झालेली मुलगी रुक्मिणीच्या वेषात येते. सर्वांचे अस्तित्व पूर्णपणे विसरून ती काहीतरी शोधते आहे ! शोधता शोधता केसात बोट घालून उवा मारते आहे.)
बाबूराव : गो ऽ बाये ऽ ऽ (ती उवा मारता मारता वेंधळ्यासारखी बघते. बघता बघता ती ओठातल्या ओठात पुटपुटते.) तू पुटपुटते आहेस काय ? स्तोत्र म्हणते आहेस ?
रुक्मिणी : मी रुक्मिणीचे संवाद पाठ करते आहे– ('स्' असा आवाज करीत नखावर उवा मारते.)

बाबूराव : अगो ऽ बाये ऽऽ, ही उवा मारायची जागा ?

रुक्मिणी : उवा खूप झाल्या रे केसात ! ती भावजय शेजारी झोपते ना...कधी एकदा मुंबैला जाते असं झालंय !...उवांनी जीव हैराण झाला !

बाळ्या : तू ' उना ' तेल लाव ना गो–

रुक्मिणी : उना तेल ?

बाबूराव : बाळ्या, मायझंया, तुझ्याकडे काय तेल विकायची एजन्सी आहे ?

बाळ्या : का ?

बाबूराव : इथे आमच्यावर प्रसंग काय आलाय....आणि तू ' उना ' तेल विकतो आहेस–

रुक्मिणी : प्रसंग कसला ? ( बाहेर लोकांच्या शिट्ट्या. )

बाबूराव : अगो, त्या गोडकराच्या पोरीच आल्या नाहीत–कुसुमावती आणि सारंगनयनाची कामं करणाऱ्या–

रुक्मिणी : मग आता ?

बाबूराव : तू करशील ?

रुक्मिणी : काय ते ?

बाबूराव : दासीचं काम !

रुक्मिणी : बाबल्या, मेल्या, तुझं मस्तक ठिकाणावर आहे ना ?

बाबूराव : काय झालं ?

रुक्मिणी : काय झालं काय ? सूत्रधाराबरोबर नटीचं काम करायला मी ! रुक्मिणीच्या कामाला मीच ! आता परत सुभद्रेच्या दासीच्या कामाला मीच ! त्यातलीच एक रुक्मिणीची दासी !– कोकिळा ! तेही काम मीच करू ? म्हणजे रुक्मिणीही मी.... आणि तिची दासीही मीच ?

बाबूराव : हे माझ्या लक्षात नाही आलं ! .... मग आता कसं करूया तर ? ( तेवढयात नारद ' नारायण....नारायण ' म्हणत येतो. )

नारद : बाबल्या, सुभद्रेचा माका धड दिसणाहा नाय –

बाबूराव : काय झालं ?

नारद : अर्जुन आणि तां...सुशी... काळोखात बसून कुचूकुचू करतहत–

बाबूराव : आग लागो त्यांच्या तोंडाला ! कुणाचंच नाटकात लक्ष नाही !

नारद : काय झाला ?

बाबूराव : काय झाला काय ? ती मेली गोडकरांची पोरं आलीच नाहीत–

नारद : कुसुमावती आणि सारंगनयना – ?

बाबूराव : तू आता माझं ऐकशील ?... तू निभावून ने –

नारद : ( घाबरून ) दोघींची कामं ?

बाबूराव : एकीचं कर ! एकीवरच भागवू –

नारद : अरे पण, मी कधीच स्त्रीपार्ट केलेला नाही –

बाबूराव : आता कर – ( निकरावर येऊन ) उचला रे ह्याला – नेसवा लुगडं... ( कृष्ण, बलराम, बाळ्या त्याला उचलतात आणि आत घेऊन जातात. तो ओरडत प्रतिकार करतो.... रुक्मिणी काहीतरी शोधतेच आहे. ती आत जाते... शोधत बाहेर येते. )

बाबूराव : तू शोधते आहेस काय ? तुझे पाव कुठं पडले काय ?

रुक्मिणी : ( न कळून ) कुठले पाव ?

बाबूराव : मग तू शोधते आहेस काय ?

रुक्मिणी : माझी पंचेजोडी कोणी नेली ?

बाबूराव : चक्रावतो ) पंचेजोडी ? पंचेजोडी इथं कशी आली ?

रुक्मिणी : मी नाटेकराकडे पंचेजोडी विकत घेतली आणि सरळ इथं आले.... कपडेपटात खिडकीत मी ठेवली होती... राजापुरी पंचेजोडी !

बाबूराव : ( काही न कळून ) पण पंचेजोडी ' सौभद्रा 'त कशाला ?

रुक्मिणी : नाटकासाठी नाही रे ! उद्या सकाळी मला डोक्यावरून न्हायचं आहे ! उवा झाल्यात ना केसात – ?

बाबूराव : अगो, तुला लाज वाटत नाही ?

रुक्मिणी : कसली ?

बाबूराव : अगो, रुक्मिणी तू ! कृष्णाची बायको ! पंचेजोडी शोधतेस...? आणि डोक्यात उवा झाल्या म्हणतेस ? शी ! तू आत जा बघूया... ( ती आत जाता जाता नारदाला लुगडे नेसवून तिथे घेऊन येतात. नारदाने दासीचा वेष केला आहे. परंतु डोक्यावरची ताठ शेंडी चुकून तशीच राहिली आहे. )

बाबूराव : ( त्याला निरखून बघत हसतो.... ) अरे मेल्या, तू नारदापेक्षा दासी म्हणूनच अधिक बरा दिसतोस–

नारद : दुसरी दासी कोण ?

बाबूराव : होय, दुसरी आणि तिसरी ! त्या अण्णासाहेब किर्लोस्कराचं काय जातं ? त्या काळात नुसतं जेवण दिलं तरी चार चार कामकरणी मिळत होत्या. आता मिळतील ? एकीवरच भागवा ! तूच कुसुमावती...तूच सारंगनयना....आणि रुक्मिणीच्या प्रवेशात तूच तिची दासी-कोकिळा ! समजलं ना ?

नारद : आणि संवादाचं काय ?

श्री. सं. ढाणे, वाचनालय शाखा.

बाबूराव : बाळ्या प्रॉम्प्टिंग करील– बाळ्या, पडदा ओढ– आणि तू आत ये–
(बाळ्या टुणकन् उडी मारून बाहेर येतो. पडद्याची दोरी धरून उभा राहतो. तोपर्यंत आतले दृश्य तयार होते. सुभद्रेचा महाल. सुभद्रा पलंगावर झोपलेली आहे. आणि कुसुमावतीच्या वेषात नारद उभा आहे. कोणाच्याही लक्षात न आल्यामुळे नारदाची ताठ बांधलेली शेंडी तशीच चुकून राहिली आहे. कुसुमावती सुभद्रेला पंख्याने वारा घालते आहे.)

बाबूराव : बाळ्या, तू कुठं आहेस रे?

बाळ्या : अरे, मी पडद्यावर आहे ना रे–

बाबूराव : मग पडदा ओढ ना रे–

बाळ्या : अरे, पण तू शिट्टी तरी मार–
(बाबूराव शिट्टी वाजवतो. बाळ्या पडदा खेचतो. नारदाला स्त्री वेषात पाहून लोक हसतात ते शेंडीमुळे हसतात. हे नारदाच्या लक्षात येत नाही. त्याला वाटते त्याने चोळीत पाव भरले आहेत म्हणून लोक हसत आहेत. म्हणून तो परत परत लोकांकडे बघून छातीवर पदर घेतो.)

आवाज : नारदाच्या शेंडीचा अंबाडा घाला ना रे– (लोक हसतात.)

कुसुमावती : (शेंडीला हात लावून जीभ चावतो) ही शेंडी तशीच रवली मरे–
(आत जाऊ लागतो.)

सुभद्रा : तू आता आत कुठं चाललास? (लोक हसतात.)

कुसुमावती : ही शेंडी तशीच रवली मगो.

सुभद्रा : असू दे! तू असाच उभा रहा इथं!
(तेवढ्यात कृष्ण आणि बलराम येतात.)

कृष्ण : सारंगनयने, आता सुभद्रेचं कसं आहे?

सारंग : तेवढंसां बरां नाय–

बलराम : पोटात काय घेतलं?

सारंग : मी?

बलराम : तू नव्हे! सुभद्रेनं–

सारंग : सकाळी उकड्या तांदळाची पेज दिली ताटलीभर–

कृष्ण : पण बाकी तब्येत कशी आहे?

सारंग : माझी?

बलराम : (खेकसून....आत बघत–) बाळ्या, ह्याला सांग ना रे मोठ्याने–

बाळ्या : (मोठ्याने) तो प्रकार झाल्यापासून त्या भ्रमिष्टासारख्या करताहेत–

सारंग : (विंगेत बघून) कोण?

बाळ्या : ( चिडून मोठ्याने ) अरे मेल्या, ह्यां तू म्हण–
सारंग : ( गडबडून ) अरे मेल्या ह्या तू म्हण–
कृष्ण : ( सावरून ) लक्षात आलं ! तो अरण्यातला प्रकार झाल्यापासून सुभद्रा भ्रमिष्टासारखी करते आहे !
सारंग : ( सुटल्यासारखे करीत ) हां ऽऽ ! समजला मा ?
बाळ्या : ( मोठ्याने ) त्या शुद्धीवर आल्या की रक्ताने कपडे भरलेले ते तरुण प्रवासी कुठं आहेत असं त्या विचारतात–
सारंग : ( विंगेत बघत– ) त्या शुद्धीवर आल्या की–
कृष्ण : समजलं...समजलं !
सारंग : ( सुटल्यासारखे करीत ) हां ऽऽ ! समजलां मा ?
बलराम : अग, कुसुमावती–
सारंग : काय म्हाराज ?
आवाज : अरे ती सारंगनयना की कुसुमावती ? ( लोक हसतात. )
सारंग : मी सारंगनयना, म्हाराज–
बलराम : ( गडबडतो ) तू सारंगनयना का ? असं...असं ! तुझा अंबाडा मला कुसुमावतीसारखा दिसला.
सारंग : छे...छे ! आज सारंगनयनेचा खाडा आहे.
कृष्ण : ( चिडून ) अरे ह्यां काय चलला हा तुझा ? एक काय तरी सांग....
सारंग : ( वैतागून ) अरे ह्यो एकदा सारंगनयना म्हणान् हाक मारता, तर एकदा कुसुमावती म्हणान् हाक मारता ! नारद म्हणान् हाक मारणा नाय ह्यां नशीब !
सुभद्रा : ( चिडून ) तुमचा ह्या झाला म्हणजे माका सांगा....मग मी जाग्या होतंय.
बलराम : कृष्णा, ही बघ सुभद्रा जागी झाली !
सुभद्रा : ( दचकून उठत ) मी कुठं आहे ? अरण्यात की महालात ?
कृष्ण : सुभद्रे, तू तुझ्या महालात आहेस.
सुभद्रा : ( इकडे तिकडे बघत ) ज्यांचे कपडे रक्ताने भरलेले आहेत असे ते सुंदर तरुण पुरुष कुठं गेले ?
सारंग : ( प्रॉम्प्टिंगवरून ) अशी सारख्यो चौकशी करीत असतंत !
बलराम : सुभद्रे, तुझी तब्येत कशी आहे ?
सुभद्रा : मला कसली धाड भरली आहे ?....चांगली खाते....जेवते....खरं म्हणजे मला आता मरण येईल तर बरं !

बलराम : सुभद्रे, असं म्हणू नकोस ! ( कृष्णाकडे वळून ) कृष्णा, रैवतक पर्वताच्या गुहेत एक मोठा साधू येऊन राहिला आहे ! गर्गमुनींनी माझ्याकडे त्याची खूप तारीफ केली आहे, त्या साधूचं तीर्थ...

कृष्ण : ( एकदम शंकाखोर ) साधूचं तीर्थ ?

बलराम : साधूचं चरणतीर्थ रे ! हे तीर्थ सुभद्रेच्या अंगावर शिंपडलं की, ती खडखडीत बरी होईल असं गर्गमुनींनी सांगितलं आहे – ( टाळी वाजवीत ) कुठं आहे रे ते तीर्थ ? ( सेवक तीर्थ घेऊन येतो. ते तो सारंगनयनेकडे देतो.)

सुभद्रा : ( स्वतःशी ) असलं पाणी मारून मला बरं वाटणार ? ( उघड – ) जाऊ दे ! काय काय कराल ते खरं !

बलराम : कुसुमावती –

कृष्ण : तो सारंगनयना रे –

बलराम : सारंगनयने, हे तीर्थ रोज चार वेळा हिच्या अंगावर शिंपड ! (कृष्णाला) कृष्णा, आता आपण त्या साधूच्या दर्शनाला जाऊ या –

कृष्ण : ( गडबडून ) छे ! छे ! मी कशाला ? तू जा –

बलराम : तूही ये ! हे बघ – मी त्या साधूला इथं वाड्यात आणून ठेवण्याच्या विचारात आहे. म्हणजे सर्वांनाच साधूमहाराजांचं दर्शन होईल –

कृष्ण : मग चल तर–
( कृष्ण आणि बलराम जातात, न् जातात तोच दत्तू झिंगत–झेलपाटत येतो आणि विरुद्ध दिशेला जातो. त्याच्याकडे सुभद्रा आणि सारंगनयना बघतात. )

सुभद्रा : गेला ?

सारंग : दत्तू ?

सुभद्रा : ( खेकसत ) दत्तू नव्हे ग ! कृष्ण–

सारंग : दोघेही गेलै–

सुभद्रा : माझं खरं दुखणं काय ते या दोघांनाही कळत नाही !

सारंग : तुमी वाइच पडान् रवा ! मी तुमका पंख्यान वारो घालतंय–

सुभद्रा : कुठं लागतोय माझा डोळा ? जीव नुसता कासावीस होतो !
( तेवढ्यात दत्तू दोन हातात दोन कप चहा घेऊन येतो आणि समोरच्या विंगेत जातो. त्या दोघी त्याला बघत राहतात. )

दत्तू : ( जाता...जाता.... झेलपाटे खात– ) अगो, तुमी कशाक थांबलात ? तुम्ही तुमचा सुरू करा मगो– ( जातो.)

सारंग : असा म्हणा नकात ! मग तुम्हाला जास्ती तरास व्हनार–

सुभद्रा : आता माझं काही खरं नाही...तुला खरं ते सांगते !
(तेवढ्यात दत्तू झिंगत झिंगत येतो. तो चहाचे कप ठेवून आला आहे.)

दत्तू : गो सुभद्रे, तुझी चोळी बघया–

सुभद्रा : (भडकते... दोन्ही हात छातीवर धरून) दत्त्या, तुझ्या मुस्कटात देन ! अर्जुनाला बोलावू ? (सारंगनयना घाबरून आपली छाती आवळून धरतो.)

दत्तू : माझे पाव खंय गेले ? तुझ्या चोळयेत आसत ?

सुभद्रा : दत्त्या मला तुझ्या पावांची गरज नाही ! समजलं ना ?
(तेवढ्यात दत्तूचे सारंगनयनेकडे लक्ष जाते)

दत्तू : मग माझे पाव गेले खंय ? (सारंगनयनेकडे बघताच चकित होऊन–) अरे मायझंया ! बरो मरे ! ह्यो धोंडगो वेंगुर्लेकार ! मी वळखाकच नाय ! माका वाटला, ह्या गोडकराचा दीप्ती, नायतर तृप्ती !...मेल्या, आत्ता तू नारद झालंय मरे ? (सारंगनयना घाबरून आपली छाती दाबून धरतो.) तू धोंडग्या, बरा बोलान् माझे पाव दी !.... नायतर तुका म्हागाईत पडात–

सारंग : तुझे पाव मी घेवूक नाय–

दत्तू : मगे तुझ्या चोळयेत काय ता दाखय–(सुभद्रा अजून भयभीत होऊन आपली छाती धरून आहे.) दाखंय तुझ्या चोळयेत काय तां...एवढे म्हणून तो चक्क सारंगनयनेच्या चोळीत जबरदस्तीने हात घालतो. झटापट होते. तेवढ्यात सुभद्रा मध्ये पडते.) सुभद्रे, तू मधेन पडा नको हा ! मी तुझे पाव मागणंहय नाय–
(सारंगनयना आणि सुभद्रा झटापट करता करता 'बाबूराव.... रे बाबल्या' अशा हाका मारतात. पण तो येईपर्यंत दत्तू दोन पाव बाहेर काढतो.)

दत्तू : (पाव दाबून बघत–) शीः ! शिंरा पडो मेल्याचार ! माझे कडक पाव दाबान दाबान नरम केल्यानी... (पाव बघत आत जातो. तेवढ्यात बाबूराव धावत जातो.)

बाबूराव : अगो, झालां काय ?

सुभद्रा : बराच लवकर आलास–

बाबूराव : पण झालं काय ?

सारंग : (सैल झालेली चोळी दाखवीत–) ह्यां बघ काय झालां तां–

बाबूराव : ह्यां असा कसां झालां ? (चकित होतो.)

सारंग : तो मायझंयो दत्तो पाव काढून घेवून गेलो–

बाबूराव : (चिडतो.) असा? थांब! घेवून येतंय! मायझंयो समाजता काय?
(टॉवेल घट्ट करीत आत जातो.)

सुभद्रा : त्याच्या आत आता दुसरं काय तरी घाल—
(विंगमध्ये दत्तू आणि बाबूराव यांची आरडाओरड होते ती ऐकू येते.)

बाबूराव : (परत येत) मेल्याने दोन्ही पाव चहात बुडवून ठेवलेत!

सारंग : मगे आता?

बाबूराव : जांव दे रे! कामकरीण... दासी तू! तुझ्या छातीकडे बघता कोण? पदर बरो ओढून घे— सुरू करा... सुरू करा— (आत जातो.)
(दोन क्षण दोघेही गप्प! विंगेतून दबलेल्या आवाजात प्रॉम्प्टिंग करीत करीत बाळ्या थोडासा बाहेर येतो.)

बाळ्या : (खुणावीत—) धोंडग्या, तू घे मरे—

सारंग : काय घे? पाव.... भिजयलेले?

बाळ्या : पाव न्हयरे, संवाद घे—

सारंग : पण काय घेव तां सांग मरे— (त्याचे लक्ष परत परत चोळीकडे जाते.)

बाळ्या : तुम्ही अरण्यातून एकदम महालात आलात हा चमत्कार नव्हे?

सारंग : त्यात चमत्कार कसलो? (लोक हसतात.)

बाळ्या : अरे, येडझंया, तां तू म्हण मरे—

सुभद्रा : (सावरून घेत) अग सारंगनयने, चमत्कार म्हणजे काय असला तसला! तुला सांगते काय, हे द्वारकेत होते ना—

सारंग : म्हणजे अर्जुनराव—

सुभद्रा : हो! त्यावेळी त्यांना मी मोठ्या प्रेमानं एक शेला भेट दिला होता. रेशमी.... जरीचा.... त्याच्यावर काशिदा काढून.... त्यांचं नाव घालून.

सारंग : 'फर्गेट मी नॉट?' (हसते.)

सुभद्रा : (लाजून) चल! मेली फाजील आहे!.... तर सांगते काय... अरण्यात मी बेशुद्ध पडले. शुद्धीवर येऊन बघते.... तर तो शेला माझ्या अंगावर! आणि त्यांनी एक हिऱ्यांचा हार माझ्या गळ्यात घातला होता... खरे हिरे हां ऽऽ आता कोणी पाहिले तर स्मगलिंगचे हिरे म्हणणार!... तर तो हार माझ्या गळ्यातून नाहीसा झाला!.... हा चमत्कार नव्हे?

सारंग : तो शेलो आता आसा खंय?

सुभद्रा : कुणाच्या दृष्टीस पडेल म्हणून मी तो शेला त्या पेटीत लपवून ठेवलाय—

सारंग : मी बघू तो शेला?

सुभद्रा : बघ ना— (दोघीही पेटी शोधतात. पेटी नसते)

सारंग : होही चमत्कार नाही? पेटीसुद्धा हयसून नाहीशी झाली—

सुभद्रा : (चिडून) हा चमत्कार कुठला? तो मेला बाळ्या पेटी ठेवायला विसरलाय. (मोठ्याने) बाळ्या, अरे इथं पेटी कशी नाही?

बाळ्या : (बाहेर येत–) मी ठेवली होती, गो! कोणीतरी हालवली ती... (दुसऱ्या विंगेत जातो आणि पेटी घेऊन येतो.)

सारंग : (पेटी उघडून) छा! पेटीत शेलो खंय आसा?

सुभद्रा : (पेटीत बघत–) बाळ्या, अरे पेटीत शेला कुठं आहे? (पेटीतला पंचा उचलून) ही पंचेजोडी आहे! (वाचते–) 'राजापुरी पंचा'! बाबल्या... रे बाबल्या–

बाबूराव : (धावत तेतो–) तुला ओरडायला काय झालं?

सुभद्रा : हे काय चाललंय ते बघ–

बाबूराव : झालं काय?

सुभद्रा : ह्या पेटीत शेलाच नाही! शेला नाही... मग मी 'अरसिक किती हा शेला' हे गाणं कसं म्हणू?

बाबूराव : गाण्याचं राहू दे ग! हा बाळ्याकुठं मेला?... बाळ्या ऽऽ

बाळ्या : (तिथेच असतो!) मी इथंच आहे ना रे–

बाबूराव : ह्या पेटीत शेला कोण ठेवणार? तुझा बापूस?

बाळ्या : (एकदम संतापतो.) बाबल्या, मी सगळां ऐकान् घेन.... पण कोणी बापूस काढलेलो ऐकान घेवचंय नाय.... माझो बापूस थंय बसून नाटक बघताहा... आणि तू त्येका–

बाबूराव : (नरम येत–) तसं नव्हे रे! पण पेटीत शेला नाही–

बाळ्या : मी कुठला ठेवू शेला? कपडेपटातच शेला नाही–

बाबूराव : पण एक शेला आणला होता ना?

बाळ्या : तो कृष्णानं कमरेला बांधला–

बाबूराव : (चक्रावून) कृष्णाला धोतर नाही?

बाळ्या : धोतर आहे, पण धोतरावर शेला बांधला–

बाबूराव : (एकदम तडकतो) ह्यो मायझंयो कृष्ण स्वताक समाजता कोण? धोतरार शेलो...शेल्यावर उपरणा! जा...घेवून ये शेलो– (बाळ्या जातो.)

सुभद्रा : (हसते) शेला नाही म्हणून बाळ्याने पंचा ठेवला आहे!

बाबूराव : (पंचा बघत) हीच पंचेजोडी ती शोधत होती–

सुभद्रा : कोण?

बाबूराव : ती रुक्मिणी! उवा मारीत असते ती–

बाळ्या : (येतो) तो शेलो दिणंय नाय म्हणता–

बाबूराव : बाळ्या, अरे मेल्या, तू शेलो नाय म्हणान पंचो ठेयतंय–?

बाळ्या : मी करा काय? कपडेपटात टुवाल सुद्धा नाय! (बाबूराव पटकन् आपला टुवाल आवळून धरतो.)

बाबूराव : जांव! समजलं ना? आता पंच्यावरच भागवा–

सुभद्रा : शीः! पंच्यावर?

बाळ्या : शीः काय? अगो, राजापुरी पंचो तो! राजापूरच्या गंगेखालोखाल राजापुरी पंचो!

सुभद्रा : नेसान बघ! सगळा दिसतला....आरपार–

बाळ्या : अगो, असताला तां दिसतांला...! आणि आम्ही काय तुका पंचो नेसाक सांगतंहो?

सुभद्रा : चल मेल्या!

बाबूराव : जांव दे गो! आजची रात्र पंच्यावर मारून न्या.

सुभद्रा : मग 'अरसिक किती हा पंचा' असं गाणं म्हणू?

बाबूराव : गाणं गेलं बाझंवत! साटम आहे कुठं? तो गेला टेप घेऊन– (जाता जाता) तुम्ही सुरू करा गो....बाळ्या पडदो वरती घे–

बाळ्या : पडदो वरतीच आसा मरे!

बाबूराव : (प्रेक्षकांकडे बघून दचकतो....आणि बाळ्यावर खेकसतो–) सामको अडाणचोट मरे तू– (एकदम टॉवेल सावरीत पळ काढतो.)

सारंग : (पचा उलगडून निरखून पाहात–) बायसैब, तुमच्या कुशलतेची म्हणजे एकदम मोठी कमालच आसा! ह्या पंच्यावर तुम्ही जी येलबुट्टी काढली आहे ती किती सुंदर दिसताहा...! वाटता...या पंच्याकडे टक लावून बघत रवचा! मधेन मधेन तुम्ही जे हे पक्षी काढलेत ते तर पंच्यो घेवूनच उडान् जातीत की काय असा वाटताहा–

सुभद्रा : (पंचा घेऊन फाडल्याचा आविर्भाव करीत–) सारंगनयने, ह्या मेल्या पंच्यांचा मला इतका राग येतो आहे की त्याचे फाडून फाडून तुकडे करावेत असं वाटतं आहे–

(तेवढ्यात रुक्मिणी तावातावाने येते आणि पंचा हिसकावून घेते.)

रुक्मिणी : तुकडे तुकडे? हा काय तुझ्या बापाशीचा पंचा आहे? (उवा शोधते.)

सुभद्रा : अग, तुझं काय आणखी मधेन?

रुक्मिणी : केव्हापासून मी ही माझी पंचेजोडी शोधते आहे. उद्या सकाळी मला डोक्यावरनं न्हायचं आहे...

बाबूराव : (धावत येतो–) अगो, ह्या काय ह्यां? तू आता हंयसर न्हातलंय!

रुक्मिणी : मी सक्काळी न्हातलंय! माका पंचो व्हयो–

बाबूराव : (अजीजीने–) ह्यां बघ–तू आतापुरतो पंचो हयसर ठेव! नाटक संपला कीं दितंय–

रुक्मिणी : बाबल्या, तुला सांगून ठेवते.... माझी पंचेजोडी गेली तर मी भरून घेईन—

बाबूराव : होय.... होय ! घे! (रुक्मिणीला) तू आता चलाक लाग— (ती जाते.) तुम्ही सुरु करा गो—

सुभद्रा : (वाट बघून—सारंगनयनेला) तू घे मरे— (सारंगनयना पंचा उचलून घेतो. पंचा घे नाही म्हटलं, संवाद घे—

सारंग : माझो संवाद काय तो सांग मरे— (विंगेत पाहतो.)

बाळ्या : (आतून मोठ्याने) सखे, ह्या मेल्याचा मला असा राग येतो आहे—

सुभद्रा : (बाळ्याला—) अरे तो माझा संवाद ! मी घेतला मघाशी—

बाळ्या : (आतून) बायसैब, असो अपराध तरी काय केलोहा या पंच्यान् ! (लोक हसतात.)

सारंग : भाईसैब—

सुभद्रा : (जरा हळूच) भाईसाहेब नव्हे.... बाईसाहेब—

सारंग : बाईसैब, असो अपराध तरी काय केलोहा या पंच्यान् ?

सुभद्रा : (पंचा घेत—) ह्या पंच्यान् ? (लोक पुन्हा हसतात.)

बाबूराव : (चिडून येतो—) अगो, पंच्यान्...पंच्यान् काय ? तुमका शेलो म्हणाक येणा नाय ?

सुभद्रा : अरे, पण हा पंचा आहे ना ?

बाबूराव : (चिडून) अगो, पण एवढ्या लांबून कोणाला ओळखता येतो ? पंचा की शेला तो !.... आणि इथल्या लोकांनी कधी शेला पाहिलाय ? पंचा हा खरा !

(तेवढ्यांत प्रेक्षकांतून कोणी तरी मोठ्या खड्या आवाजात गाणे गाऊ लागतो.... 'अरसिक किती हा पंचा । अरसिक किती हा पंचा ।।
त्या सुंदर तनुला सोडुनि आला । अरसिक किती हा पंचा ।।'
लोक मोठ्याने हसतात. बबूराव आणि रंगमंचावरची पात्रे एकदम चमकून बाजूला प्रेक्षकांत बघतात.)

बाबूराव : कोण हा ? हा गातोय कोण ?

बाळ्या : (तो माणूस ताना घेतो आहे ते ऐकू येते. बाळ्या क्षणभर बघतो—) अरे, ह्यो मायझंयो ?

बाबूराव : (त्या माणसाला दूरवर बघत—) कोण तो ? (त्या माणसाला) अरे बापया, तू तोंड मिटान् ओगी रव ! आमका नाटक करू दे ! (तो इसम गातच राहतो.)

अर्जुन : (चिडून येत—) अरे बाबल्या, हे चाललंय काय ? माझी येष्टी दोनाची हांऽ ! मी कपडे उतरणार आणि चालायला लागणार—

बाबूराव : (हतबल होऊन) ह्याला, अर्जुना, आता मी काय करू? तो मध्येच उठून कसा गातोय बघ ना—

अर्जुन : (दूरवर प्रेक्षकांत बघत—) कोण तो?

बाळ्या : अरे, सुतारवाड्यातलो सिलिंडर तो—

अर्जुन : (गोंधळून) किलिंडर का सिलिंडर?

बाळ्या : सिलिंडर रे—

अर्जुन : सिलिंडर ह्यां त्येचा नाव?

बाळ्या : तसा न्हय रे! त्येच्या पोटात गॅस खूप होता.... म्हणान् आमी त्येका सिलिंडर म्हणतो—

बाबूराव : (चिडून) अरे एकटय़ूब हाड मरे! याक टॉक हकडे (कुल्ल्याकडे हात दाखवीत) लाय.... आणि दुसरा टॉक शेगडेक लाय... आणि पेटय मरे— मेल्या बघतहय काय?... त्येका उचलान् बाहेर फेक.... मेलो हयसर येवन गॅस काढताहा! (बाळ्या धावत जातो. प्रेक्षकांत गोंधळ झाल्याचा आवाज. गाणे थांबते.)

अर्जुन : चला.... चला! बेगीन बेगीन सुरू करा— (असे म्हणत आत जातो. तेवढ्यात ठुमकत ठुमकत रुक्मिणी येते. आल्याबरोबर सारंगनयनेच्या हातून पंचा घेते.)

बाबूराव : (चिडून) तुला वाइंच धीर धरता येत नाही? तू ह्या पंच्यासाठी इथं कडमडायला आलीस?

रुक्मिणी : (निऱ्या काढीत) असं काय करतोस बाबल्या? माझी आता रुक्मिणीची एंट्री आहे ना रे—

बाबूराव : मग पंच्याच्या निऱ्या कसल्यां काढतेस? डॉयलाग घे ना—

रुक्मिणी : डॉयलाग हिचा आहे—(बाबूराव जातो.)

सुभद्रा : (डॉयलॉग घेत) कोण? रुक्मिणीवयनी? वयनीबाय, तुला आज सवड गावली?

रुक्मिणी : असां गो काय? मी चार वेळा येऊन गेले! तू झोपली होतीस— (बाहेर दरवाजा ठोठावल्याचा आवाज).

सुभद्रा : (सारंगनयनेला) अग, दरवाजा कोण वाजवतं बघ! ती मेली कुसुमावती असणार—

सारंग : (विंगेत जाऊन येत) कुसुमावतीच तां! तां सांगताहा— न्हावचा पाणी काढला हा—

रुक्मिणी : माझां पाणी? मी सकाळी डोक्यावरून न्हातलय—

सुभद्रा : (चिडून) तुझां नाय गो, माझा!

रुक्मिणी : (लक्षात येऊन) हां...हां! नाटकातला!...मला वाटलं, माझंच पाणी...(केसात बोटे घालते.)

सुभद्रा : मी वहिनीबाय, पाहातेय...हल्ली तुझी माझ्यावरची मायाच आटली आहे—

रुक्मिणी : नाही ग! खरंच नाही!...पण तू अशी चार दिवसांत एकदम हडकलीस कशानं?

सुभद्रा : वयनीबाय, अगे, माझ्या लग्नाची काय विटंबना चालली आहे ते तू पाहाते आहेस ना?...आणि तुझा नवरा डोळे मिटून गप्प आहे—

रुक्मिणी : विटंबना? म्हणते आहेस काय तू? अग, दुर्योधनसारखा नवरा शोधून मिळेल का? एवढा मोठा राजा...अग, त्येचा जमीनजुमला केवढा? त्याच्या रूपात काय कमतरता आहे? शिवाय हुंड्याची कटकट नाय! दोन्हीकडला खर्च तो करणार....संध्याकाळी रिसेप्शन नाही. म्हणजे आइस्क्रीमचा खर्च नाही....असं स्थळ शोधून सापडेल? मग तुला हे लग्न कां नको?

सुभद्रा : वयनीबाय, तुला एक विचारू का? विचारल्यावर तुला राग येईल—

रुक्मिणी : नाय गे बाये, तू विचार...(केसात बोटे घालते.)

सुभद्रा : तुझा भाऊ तुला शिशुपालाला देत होता...तो काय रूपाने....ऐश्वर्याने आणि पराक्रमाने कमी होता? मग तो तुला कां नकोझाला? तू कां त्या भटाबरोबर चिठ्ठी पाठवून कृष्णाबरोबर लग्न केलंस? (रुक्मिणी लाजून मान खाली घालते.) तू मला उपदेश करीत होतीस, मग आता कां तुझं तोंड धरलं?

रुक्मिणी : तू म्हणतेस ते खरं ग! पण मी तरी काय करू?

सुभद्रा : काय करू म्हणजे काय? तू कृष्णाला सांगून बघ ना — त्याच्या मनात आलं तर तो इथलं तिथं आणि तिथलं इथं करील —
(तेवढ्यात गडबडीने विदूषक येतो)

विदूषक : वयनीबाय... अक्काबाय, तुम्ही इथं गजाली कसल्या करताहात? तिथं ते साधुमहाराज येऊन पाटावर बसले! दादासाहेबांनी सांगितलंय की आक्काबायनी साधुमहाराजांच्या हातावर पाणी सोडायला पाहिजे... चला.... चला लवकर —

रुक्मिणी : चल बाये... चल लवकर! हल्ली त्या साधूचं प्रस्थ फार झालंय वाड्यात.
(जातात)
(कृष्ण प्रवेश करतो.)

कृष्ण : (आपल्याशीच आनंदाने—) आज मी खूप खूप आनंदात आहे! गंमत

म्हणजे मला काही एक करावं लागलं नाही ! दादानंच हट्ट धरून त्या साधूला वाड्यात आणून ठेवलाय.... आणि त्यानंच सुभद्रेला साधूच्या सेवेला लावलीय ! तो साधू म्हणजे अर्जुन आहे हे कुणालाच माहीत नाही ! त्याला कोण म्हणतात साधू सदाचारी, तर कोण म्हणतात साधू ब्रह्मचारी ! म्हणेनात ! (खूष होऊन) चला, आज कुठं तरी दोन घटका जीव रमवायला पाहिजे ! कुठं बरं जाऊ या? सत्यभामेकडे? की रुक्मिणीकडे? रुक्मिणीकडेच जातो ! (तो जाता जाता 'बहुत दिन नच भेटलो सुंदरीला । म्हणुनि धरुनि बैसेल रूष्टतेला ।' या गीताचे स्वर ऐकू येतात आणि दृश्य बदलते.)

(दृश्य : रुक्मिणीचा महाल. रुक्मिणी झोपली आहे. आणि कोकिळा दासी म्हणजे नारदच– पंख्याने वारा घालते आहे. तेवढ्यात कृष्ण येतो.)

कोकिळा : अगे बाये, ह्यावेळा सरकारस्वारी कशी इली ?

कृष्ण : (कोकिळेकडे बघत–) अरे मेल्या, ती शेंडी तरी लपवचं होतंय–

कोकिळा : रंगपटात आंबाड्याचो विगच नाय ! आणि हो नारदाचो विग काढलंय तर आत टक्कल आसा –

कृष्ण : जाव ! कोकिळे, रुक्मिणी निजलीशी ? एवढया लवकर ?

कोकिळा : तुम्ही नसताना तिका उद्योग काय ? उठौ ?

कृष्ण : उठव...उठव... !

कोकिळा : बैसैब ओ बैसैब.... सरकार इलेहत... डोळे उघडान् बघा –

रुक्मिणी : (डोळे उघडत....कंटाळून) छे ! कोकिळे, काय ग तुझी कटकट ? आत्ता कुठं माझा डोळा लागला होता.... इथं वाराही नाही ! (केसात बोट घालते.)

कृष्ण : शिवाय आकाश तर ढगांनी भरून गेलं आहे. ('नभ मेघांनी आक्रमिले ! तारांगण सर्वही झांकुनि गेले ॥' या गीताचे सूर ऐकू येतात. रुक्मिणी काहीशी रूष्ट होऊन बघत राहाते. सूर थांबतात.)

रुक्मिणी : आज तुम्ही इथं कसे ?

कृष्ण : म्हणजे ?

रुक्मिणी : तिथं नाही गेलात ?

कृष्ण : तिथं कुठं ?

रुक्मिणी : सत्यभामेकडे ?

कृष्ण : हे बघ ! तू उगाच चिडू नकोस....मी रोजच्या रोज इथं यायचं यायचं म्हणत होतो....पण त्या साधूची काय गडबड चालली आहे ते तू बघते आहेस ना ?

रुक्मिणी : ( चिडून ) मी सगळं बघते आहे ! तुम्ही मला बंडलं मारू नकात.

कृष्ण : ( हसत ) बंडलं ? अशी जवळ तरी ये ! तुला कडकडून मिठी मारतो.

रुक्मिणी : शी : काय हे ? कोणी पाहिलं बिहिलं तर ? ( हा संवाद चालू असताना ' नच सुंदरी करू कोपा । मजवरी धरी अनुकंपा ॥ ' हे सूर ऐकू येतात. एकदम सूर तुटतात. आणि त्याच क्षणी एक बाई प्रेक्षकांतून ढुणकन उडी मारून समोरून रंगमंचावर येते. ही बाई पुरुषी दिसते. प्रत्यक्षात पुरुष नटानेच स्त्रीवेष घेऊन यावे. पदर खोवून स्त्रीपार्ट करणारे पुरुष जसे नाटकी पद्धतीने उभे राहातात तशी ती उभी राहाते. तिचे रुष्ट डोळे गरगर फिरतात. दोन्ही हातांच्या मुठी डाव्या कमरेवर घेऊन ती उभी राहते. तिला बघून कृष्ण घाबरतो. )

बाई : ( मान हालवीत ) असा जवळ तरी ये ! तुका कडकडून मिठी मारतंय.. मारा...मिठी मारा !... मी हंयसर उभ्या रवन् बघतंय ! मारा...मिठी मारा— आणि ह्या निलाजरा म्हणता....शी : ! कोणी बघला बिघला तर ? मी हडेसून बघतहय ! मोठा रुक्मिणी झालाहा ! लागोरा मेला ! दुसऱ्याचो घो पळौक इलाहा !

कृष्ण : अगो, ह्या नाटक आसा ! तू तुझ्या जाग्यार जाव् नबस बघू या.

बाई : ( चिडून ) होय...होय ! ह्यां नाटक आसा ! माझ्या जन्माचा नाटक चललाहा !

रुक्मिणी : ( गोंधळून ) हा कोण ?

कृष्ण : ( वैतागून ) हा नव्हे, ही !

रुक्मिणी : ही कोण ?

कृष्ण : माझी बायको—

रुक्मिणी : सत्यभामा ?

कृष्ण : नाटकातली नव्हे, खरी बायको—

बाई : आजून माका बाइल म्हणताहात तां नशीब माझां ! ह्यां...ह्यां इतक्या लोकांसमोर त्या लागोऱ्याक तुम्ही मिठी मारूक उठल्यात म्हणजे तुमका आता मनाची सोडां, जनाचीय लाज नाय झाली मां ?

कृष्ण : अगो, तुझा काय ह्या मध्येनच ? मी कृष्ण आसंय—

बाई : होय....होय ! मोठो आयलो कृष्ण ! त्येका सोळा हजार बायलो ! तुमका किती त्यो मेजतंय आता -- ( रुक्मिणीला ) गो बाये, तू हयसरसून् चलाक लाग हां ऽऽ ! नायतर तर दोन्ही हातांनी तुझ्यो जटा उपाटतलंय मी— ओगी रवाचंय नाय ! ( ती रुक्मिणीच्या अंगावर धावणार तोच ' बाबूराव...बाबूराव ' अशा रुक्मिणी हाका मारते. बाबूराव गडबड

करीत धावत येतो. अजूनही त्याच्या कमरेला टॉवेलच आहे. त्यामुळे तो एकदम अवघडतो. इकडे तिकडे बघतो. त्याला काय चालले आहे ते कळत नाही ! ती उभी असलेली बाई पुरुष नट आहे असा त्याचा समज होतो. )

**बाबूराव** : अरे, हे चाललंय काय ?

**कृष्ण** : तुका परत लागलां ?

**बाबूराव** : म्हंजे ?

**कृष्ण** : तू अजून टुवालादसो ?

**बाबूराव** : ( एकदम भडकून ) अरे करणार काय ? तो मायझंयो राक्षस....माझा सूट घालून कुठं गेला तो गेलाच ! पाच–सातशे रुपयांचा सूट ! बदल्यात हा चार रुपयांचा टुवाल ! बाझंव ?

**रुक्मिणी** : अरे, बाबल्या, ते राहू दे ! आधी हे काय ते बघ.

**बाबूराव** : ( त्या बाईला न्याहाळीत– ) हा पोरगा कोण ? त्याला स्त्रीपार्ट घेऊन इथं यायला कुणी सांगितलं ?

**रुक्मिणी** : ( हसते. ) अरे, तो पोरगा नाही....त्याची ( कृष्णाची ) बायको ती–

**बाबूराव** : ( चक्रावतो ) म्हणतेस काय ? ( तिच्याभोवती फिरून तिला न्याहाळीत ) मला वाटलं, हा कुठला पुरुषपार्टी स्त्रीपार्ट घेऊन आलाय .. ( ती संतापाने बाबूरावाला न्याहाळते ) गे बाये, तुझा हंय काम काय ? ( कृष्णाला ) तू सांग मरे, तुझ्या बायलेक–

**कृष्ण** : सांग काय ? तिनी ऐकाक होया मा ?

**बाबूराव** : ( एकदम चिडून ) एऽ बायेऽऽ, तू हयसरसून जातंय, का तुका ढकलून घालव ?

**बाई** : ढकलून ? तुझो टुवाल जाग्यार रवात ?

**बाबूराव** : ( एकदम घाबरून टॉवेल आवळून धरतो आणि ओरडतो. बाळ्या....ए बाळ्याऽ हो बाळो खंय मेलो ?

**बाळ्या** : मी हंयसर पडद्यार आसंय मरे !

**बाबूराव** : थंय काय निजलंहय ?

**बाळ्या** : ( बाहेरून ) कित्याक ? टुवाल सोडू ? ( एकदम गडबडून ) पडदो सोडू ?

**बाबूराव** : तू, मेल्या, आधी हंय ये ! ( बाळ्या उडी मारून रंगमंचावर जातो. ) हिका आधी घालंय हयसून.

**बाळ्या** : ( हात जोडून ) गे बाये, ह्या नाटकात आणखी तुझा नाटक नको ! तुझा काय तां मगे बघया-

बाई : मगेबिगे काय एक चलचा नाय ! ( चिडून ) मी, बाळया, तुका सांगान् ठेयतंय हां ऽऽ! ( बाईला पुनः पुन्हा पदर नीट करून खोचायची आणि दोन्ही मुठी कमरेवर ठेवून बोलायची सवय आहे. ) हे मोठे क्रिस्न झाले आणि ह्येनी पत्र्याचे मुकूट घातले म्हणान् मी ओगी रवाचंय नाय ! ह्येंका बाईलमाणूस दिसला की हे खुळावलेच ! पण ह्यां लागोरा आंग घसटून बसला तर मी तिचो बुचडो जाग्यार ठेयचंय नाय— ! तुका, बाळया, सांगान् ठेयतंय.

बाळया : अगे बाये, ती रुक्मिणी आसा...तिका जरासा घसटाक व्हयाच !

बाई : ( पदर नीट करीत. ) बघतंय मी... कसा घसटतां ता.

बाळया : तू आत जावून बघ मगे.

बाई : मी ह्यसरसून हलाचंय नाय.

बाळया : आणि नाटकाचा काय ?

बाई : तां माका विचारू नको ! ही दोघाय ह्य अशीपर्यंत मी ह्यसर उभ्या रवतलंय.

बाबूराव : ( शरण जात ) रवांदे तिका थंय उभी !... तुमी तुमचां सुरू करा.

रुक्मिणी : ( कृष्ण संवाद आठवायचा प्रयत्न करताना. ) छे ! सगळं विसरून गेले. कुठपर्यंत आलो होतो आम्ही ?

बाई : ( लांबून ) कुठपर्यंत ? मिठी मारीपर्यंत.

कृष्ण : ते जाऊ दे ! तू पुढचं घे.

बाई : पुढचा ? मिठी मारून झाल्यार पुढचा काय तां माका समजणां नाय ?

कृष्ण : ( चिडून ) तां न्हय गो. ( रुक्मिणीला. ) तू घे.

रुक्मिणी : आता तुम्ही विषय काढलात म्हणून विचारते ! काय ते खरं मात्र सांगा. ( उवा शोधते. )

कृष्ण : काय विचारणार ? ( बायकोकडे चोरून पाहतो. ती खाकरून, डोळे मोठे करून ऐकत राहते. )

रुक्मिणी : सुभद्रेच्या लग्नाचं चाललंय तरी काय ?

कृष्ण : ( बायकोकडे घाबरून बघत ) काय चाललंय ? हा चातुर्मास संपला की पहिला मुहूर्त धरून सुभद्रेचं लग्न— दुर्योधनाशी !

रुक्मिणी : (घाबरून त्या बाईकडे बघत ) मी काय म्हणते....भावजींचा पहिल्यापासून कौरवाकडे ओढा ! म्हणून त्यांना दुर्योधनाचं स्थळ बरं वाटतं ! पण सुभद्रेला ते स्थळ नको असेल तर तिच्यावर जबरदस्ती का ? ह्या जन्माच्या गाठी असतात ! तुम्ही सगळ्यांनी सुभद्रेवर जबरदस्ती केली आणि तिनं आपल्या जिवाचं काही बरंवाईट केलं तर ? (जवळ येते.

कृष्णाच्या तोंडाकडे बघते. कृष्णाचे लक्ष हळूच आपल्या बायकोकडे जाते.) मी काय बोलते आहे तिकडे तुमचं लक्ष तरी आहे ?

कृष्ण : (हलक्या आवाजात) जवळ येऊ नको ! ती बघतेय– (बाई टवकारून बघते. कृष्ण मोठ्याने– ) पुरे...पुरे ! मला सगळं समजतं ! माझ्यात आणि थोरल्या भावांत तंटाबखेडा करण्याचा हा तुझा डाव आहे ! म्हणजे मग वेगळं बिऱ्हाड करायला बरं– भावाभावांत वाकडेपणा आणायला कारण म्हणजे तुम्ही बायका– (बायकोकडे बघतो.)

बाई : (रागाने) मगे जाया आणि रवा त्या थोरल्या भावाकडे ! त्येनी आमच्यो आठ कोंबड्यो चोरल्यो त्यो त्येनी अजून दिवक नाय ! जाया आणि रवा त्येच्याकडे–

कृष्ण : (तिला) तू वाइंच गप रव गो ! तुका नाटकातला काय समाजता ? (मोठ्याने रुक्मिणीला) रुक्मिणी, तुला ह्या विषयावर बोलायचं असेल तर हा मी चाललो–

बाई : चला तर सोमते घरा– (कृष्ण वैतागून तिच्याकडे बघतो.)

रुक्मिणी : मला सगळं माहीत आहे ! इथनं जायच्यासाठी तुम्ही काहीतरी निमित्त शोधत असता– (चिडते.)

कृष्ण : (स्वतःशीच) वाः वाः ! ही अशी चिडली की किती सुंदर दिसते–

बाई : (ओरडते) होय...होय, सुंदर दिसता ! तर बघान् घ्या...बघान् घ्या !

कृष्ण : (गडबडतो...रुक्मिणीकडे जातो.) हे बघ, तू अशी चिडू नकोस ! (तिच्या खांद्यावर हात ठेवणार तोच दचकून बायकोकडे बघतो, आणि) तुझं म्हणणं काय ते तरी सांग–

रुक्मिणी : सुभद्रेला अर्जुनाबरोबर लग्न करायचं असेल तर तिच्या मनासारखं व्हायला पाहिजे– (उवा शोधते.)

कृष्ण : होईल....होईल ! तू काळजी करू नकोस...! एक गोष्ट सांगतो ती मात्र गुप्त ठेव.

रुक्मिणी : सांगा तरी–

कृष्ण : जरा कान इथं कर–

बाई : माका ऐकूक येव नये म्हणान ?

कृष्ण : (बायकोला) तू ओगी राव गो– (रुक्मिणीला) तू कान जरा इथं कर– (रुक्मिणी ऐकण्यासाठी जवळ येते...तोच दचकून) तू थोडी लांब उभी रहा ग –

बाई : तू लांब उभ्या रवगो – (रुक्मिणी लांब जाऊन वाकून ऐकण्याचा प्रयत्न करते. कृष्णही लांबूनच तिच्या कानात सांगतो. ती बाईही लांबून कान देऊन ऐकण्याचा प्रयत्न करते.)

रुक्मिणी : (आश्चर्यकारक मुद्रा करून) म्हणतां काय ? होय ? अग बाई ! मला हे खरंच वाटत नाही !

कृष्ण : तू बारकाईनं त्याला बघ ! तू सुद्धा त्याला ओळखशील !

रुक्मिणी : (आनंदित होते.) तर मग आता माझी काळजी दूर झाली ! देव पावला !

बाई : (चिडून कृष्णाला) तुमी तिका कानात काय सांगल्यात ता सांगा–

कृष्ण : काय नाय गो ऽऽ

बाई : काय नाय ? ती देव पावलो म्हणता तां काय ?

कृष्ण : तां अर्जुनाचा गो ऽ –

बाई : ह्यो अर्जुन कोण ?

कृष्ण : (भडकून) तुझो आजो ! तू घरा जा–

बाई : मी तुमका घेतल्याशिवाय घरा जावचंय नाय–

कृष्ण : चला ! बोलता बोलता पहाट झाली ! कोंबडा सुद्धा आरवला ! (कोंबडा आरवल्याचा आवाज)

रुक्मिणी : बोलता बोलता वेळ किती गेला ते कळलंच नाही !

बाई : (वेडावत) वेळ कसो गेलो तां कळलाच नाय ! मी हय उभ्या म्हणान् नुसतोच वेळ गेलो ! निलाजरा, लागोरा मेला–

कृष्ण : चला (एकदम ' प्रिये पहा रात्रीचा समय सरुनि येत उषःकाल हा–' या गीताचे ऑर्गनवरील सूर ऐकू येतात. दोघे जाता जाता मागून ती बाईही पहारा केल्यासारखी जाते.)

(सुभद्रा येते. एक फेरी मारते आणि हाका मारते.)

सुभद्रा : कोण आहे ग तिकडे ? सारंगनयने... एऽऽ सारंगनयने... कुठं गेली ही ?

सारंग : (आतून येत) काय म्हणतास ?

सुभद्रा : अगो, तू तिथं जाऊन साधूमहाराजांचं ध्यान संपलं का बघ जा !... आणि मग येऊन काय ते मला सांग – (सारंगनयना जाते.) माझा सगळा वेळ त्या साधूमहाराजांच्या तैनातीत जातो. श्वास घ्यायला फुरसत नाही ! (तेवढ्यात रुक्मिणी येते.)

रुक्मिणी : अगो तुला पाच मिनिटं वेळ आहे का बोलायला ?

सुभद्रा : म्हणजे गे काय वयनी ?

रुक्मिणी : नाय, तुला हल्ली टैम असतो कुठं ? बघावं तेव्हा तू त्या साधूमहाराजाबरोबर ! सांभाळून रहा ग बाये ! नाहीतर आपलं काहीतरीच होऊन बसेल.

म. ग्रं. सं. वाचनालय शाखा.
क्र. ९७८६२ ३१०७८६

सुभद्रा : ( लाजून ) शीः ! काहीच्या काहीच काय बोलतेस तू ? तुझ्या जिभेला काही हाड ? मी त्यांच्या जवळ असते म्हणजे काय, त्यांची सेवा बरोबर व्हायला नको ?

रुक्मिणी : त्यामुळे तुझीही तब्येत हल्ली जरा बरी दिसतेय ! महाराजांच्या दयेनं का होईना, तुझी एकदा काळजी मिटली म्हणजे देव पावला !

सुभद्रा : वयनी, तू कृष्णाकडे काही बोललीस ?

रुक्मिणी : एकदा ? चार दिवस मी त्यांच्या पाठीशी आहे ! पण त्यांचं धड उत्तर नाही !

सुभद्रा : म्हणजे आता मला कसलीच आशा नाही !

रुक्मिणी : असं म्हणू नकोस ! महाराजच तुझ्या मनातले सगळे हेतू पूर्ण करतील ! महाराज प्रसन्न झाले म्हणजे त्यांनाच सांग– अर्जुनाची भेट घडवा म्हणून– नाहीतर तुम्हीच पळवून न्या म्हणून सांग–

सुभद्रा : शीः ! तू, वयनी, काहीतरीच बोलतेस– ( ती एकदम बोलणे थांबवते. एकदम गळा...कपाळ चोळते...तिला मळमळते– ) मला एकदम मळमळतंय–

रुक्मिणी : ( गडबडते ) हे नाटकात कुठं आहे ? कुठला डायलॉग घेते आहेस तू ?

सुभद्रा : ( वैतागून ) अगो, हा नाटकातला डायलॉग नाही......मला खरंच मळमळतंय...ओकारी येतेय...ऑ...ऑ...( ती पाठ करून वाकते आणि ओकते ).

रुक्मिणी : ( तिला धरून बाबूरावला हाका मारते. ) बाबूराव...एऽऽबाबूराव ! अरे लवकर ये...ही ओकतेय...

आवाज : अगो, त्येका बाबूराव काय करतलो ? अर्जुनाक बोलाय मगो– (लोक हसतात.)

बाबूराव : ( धावत येतो– ) आता झालं काय ?

रुक्मिणी : ही ओकते आहे !

बाबूराव : पित्त झालं की काय ? ( ती पुनः आवाज काढून ओकते. )

आवाज : पित्त खंयचं ?...अर्जुनान् बाण मारलो रे तो– ( लोक हसतात. )

सुभद्रा : ( उठत ) मी आता घरी जाते ! मला पुढलं काम झेपणार नाही !

बाबूराव : वाइच जमवून घे मगो– लवकर आटपूया–

सुभद्रा : ( थकली आहे ! ) छे, मला जमायचं नाही !...मी जाते...( जाते. )

बाळ्या : ( बाहेरून ) बाबल्या, पडदो टाकू ?

बाबूराव : ( तडकतो एकदम ) अरे, मेल्या, तुका काय कडकडला ? थांब जरा ! ( रुक्मिणीला ) आता पुढला सीन कुठला ?

रुक्मिणी : मी अर्जुनाच्या दर्शनाला जाते.

बाबूराव : ( गडबडीने ) आणि मग ?

रुक्मिणी : ( केसात बोट घालीत ) मग अर्जुनाचा सीन– सुभद्रेचा प्रवेश शेवटाला आहे.

बाबूराव : होय ना ?... मग चिंता नाही ! तोपर्यंत मी दत्त्याला सुभद्रा म्हणून उभा करतो....

रुक्मिणी : पण दत्त्या आहे ना ?

बाबूराव : तो असणार ! तू सुरू कर. ( 'दत्त्या–दत्त्या' अशा हाका मारीत जातो. )

रुक्मिणी : ( पुढे येऊन पोज घेत संवाद म्हणते. ) आता मी इथं आले आहे तर साधूमहाराजांचं दर्शन घेऊनच जाते !....पहिल्या दिवशी मी त्यांचं दर्शन घेतलं तेव्हा ते फार मोठे साधू आहेत असं वाटलं होतं....पण ह्यांची आतली गडबड कोणाला ठाऊक ? ( विंगेत बघून ) अगे बाये, हे काय ? महाराज येऊन बसले सुद्धा ! त्यांच्या भेटीलाच जाते .. ( ती जायला निघणार....तोच सारंगनयना म्हणजे नारद गडबडीने येतो.... त्याचे पातळ त्याला कटकटीचे झाले आहे म्हणून त्याने ते उचलून धरले आहे. )

रुक्मिणी : ( त्याला बघून–आश्चर्याने ) ह्यावेळी तुझी एंट्री कुठं आहे ?

सारंग : एंट्री गेली तेल लायत ! अगो, अर्जुन पळालो.

रुक्मिणी : म्हणतोस काय तू ?

सारंग : येष्टीर गेलो ! ( हांका मारतो. ) बाबल्याऽ....एऽऽ बाबल्याऽऽ ( बाबूराव धावत येतो ) अर्जुन मायझंयो पळालो–

बाबूराव : ( डोक्यावर हात मारीत. ) खंय गेलो ?

सारंग : येष्टीर गेलो...त्येची दोनाची येष्टी.

बाबूराव : दोन खंय वाजले ? ( मनगटावरचे घड्याळ बघतो. चिडतो. ) शिंरा बसो ! घड्याळही बंद पडलं !

सारंग : अर्जुन पळालो म्हणजे काय ? सुशी....सुभद्रा ओकला म्हणान् पळालो. ( लोक हसतात. बाबूराव एकदम दचकून लोकांकडे बघतो. )

बाबूराव : अजून पडदो वरतीच आसा ? ( चिडतो. ) बाळ्या, अरे मेल्या, मेलंय खंय ?

बाळ्या : मी हयसर पडद्यार आसंय मरे.

बाबूराव : मगे, मायझंया, तू पडदो सोड मरे.

बाळ्या : अरे, तू शिटी मार मरे.
( बाबूराव जोरजोराने शिटी मारतो. बाळ्या पडदा सोडतो. तरीही आतले सगळे दिसतेच आहे. )

बाबूराव : ( कपाळाला हात लावीत– ) आता कसं करणार ? ( वैतागून ) कुठल्या मुहूर्तावर हे नाटक सुरू केलं...( त्याचे लक्ष एकदम रुक्मिणीकडे जाते.. ती उवा शोधण्यात मग्न– ) गो, तू सुभद्रा होशील !

रुक्मिणी : ( झटकीत ) छे ! काय तरी काय ! ( हसतो ) आणि रुक्मिणीचं काम कोण करणार ?

बाबूराव : ( सारंगनयनेला गयावया करीत ) तू हो मरे सुभद्रा–

सारंग : ( पातळ झटकीत ) सारंगनयनेचे चार संवाद माका झेपणंहत नाय !...
( बाबल्या हताश होतो. ) तू बाबल्या, माझा आयकशीत ?

बाबूराव : काय ?

सारंग : तू सुभद्रा हो–

बाबूराव : चल–

सारंग : चल का ? एरव्ही मारे गमजा मारतोस... विजया मेहताचा असिस्टंट होतास म्हणू... 'हयवदन 'बरोबर जर्मनीला जाणार होतास–

बाबूराव : जाणार होतास म्हणजे काय ? जाणार होतोच ! पण ऐनवेळेला बाई म्हणाली, ह्यावेळेला तू नको ! पुढच्या वेळेला तू ये – म्हणून राहिलो !.... पण म्हणून तू मला असा तसा नट समजू नको !

सारंग : मग सुभद्रेचं काम करून दाखव ना–! बघूया तरी–

बाबूराव : ( चिडून ) तू मला मुद्दाम पेटवतो आहेस ?.... तू मला चॅलेंज देतो आहेस...?

सारंग : बाकीच्या गजाली नको ! हिंमत असेल तर सुभद्रेचं काम करून दाखव.

बाबूराव : ( चिडून निकराला घेतो– ) हिंमत ?... हिंमत ?... तुला दाखवतो तर... ( एकदम रुक्मिणीला– ) सोड .... सोड तुझो शालू– ( तिच्या लुगड्याला हात घालतो. )

रुक्मिणी : ( एकदम शालू पकडून ) चल मेल्या ! तू मला काय पुरुषपाटीं समजलास की काय ?

बाबूराव : ( अंगात संचारल्याप्रमाणे...सारंगनयनेला ) तुझां सोड –

सारंग : घे सोडून हवं तर....पण माझं दासीचं लुगडं सुभद्रेला कसं जमेल ?
( बाळ्या आतून शालू आणि चोळी आणतो. )

बाबूराव : मेकपवाल्याला बोलव – ( बाळ्या आत पळतो. बाबूराव शालू नेसायला लागतो. टॉवेल सोडून फेकून देतो – ) हा टुवाल सोडताच इतकं बरं

वाटलं... किती वेळ मी ह्या टुवालावर आहे ! त्या राक्षसानं मला चांगलाच हात दाखवला.... माझा पाचसातशे रुपयांचा सूट घेऊन गेला.... या टुवालाच्या बदल्यात ! (बाळ्या आणि मेकपवाला येतात... मेकपवाला ताबडतोब आपले काम सुरू करतो. कानात डूल अडकवतो, ब्रश मारतो .. पॉवडर लावतो....)

सारंग : बाळ्या, ह्याला चोळीत घालायला काय तरी आण ना रे–

बाबूराव : करवंट्या नको हां ऽऽ

सारंग : (बाळ्याला) काहीतरी मोठंसं आण ! मोठा नट आहे– ( बाळ्या पळत जातो.)

बाबूराव : (सारंगनयनेला) अरे, तू उभा कशाला ?

सारंग : मी काय करू ?

बाबूराव : तू आता अर्जुन तरी हो ना रे–

सारंग : अर्जुनचे संवाद मला कुठं पाठ आहेत ?

बाबूराव : (नेसणे चालू असताना–) अरे मेल्या, नुसता उभा रहा ! काय ऐनवेळी जमेल ते बोल–

सारंग : छा ! माका नाय हां जमाचां– तेवढ्यात दत्तू झिंगत झिंगत येतो. त्याने संन्यासी अर्जुनाचा वेष धारण केला आहे ! हातात दाढी-मिशी.) तो बघ अर्जुन आला–

बाबूराव : दत्त्या तू ?

दत्तू : अर्जुन ऐन वेळेक पळालो मरे– त्येनी जाताना माका सांगला....तू अर्जुन म्हणान् उभे रव म्हणान् ....आमी नाटकी ! (झेलपाटतो.) नाटक अडाक दिवचो नाय– (तोल जातो.)

बाबूराव : दत्त्या, तुला जमेल ना ?

दत्तू : ( जड आवाज ) म्हंजे काय ? (तोल जातो.)

बाबूराव : तू अच्छेर मारून आला आहेस म्हणून म्हणतो–

दत्तू : तू चिंता करू नको ! मी मुंबैचो नट न्हय ! पडदो वरती गेलो की, माझ्या एंट्रीच्या वेळेक 'अर्जुन' म्हणान् माझ्या कानात कोणी तरी ओरडा !....नायतर मी कोणाचे संवाद म्हणीन् नेम नाय ! ( हसतो.... थुंकतो.)

बाबूराव : दत्त्या, तुझ्याकडे पाव आसत ?

दत्तू : छा ! मघाशीच खाल्ले मरे मी – बाळ्याक पाठंय मरे बेकरीत – (तेवढ्यात बाळ्या दोन वाटोळी, न सोललेली मोठी आडसरे घेऊन येतो. सर्वजण क्षणभर आडसरांकडे बघत राहतात.)

बाबूराव : ही आडसरं तू कशाला आणलीस ?

बाळ्या : चोळीत घालायला ! बरी आहेत... हातखरपी... मलयवाली– ( सगळे हसतात. बाबूराव चिडतो.)

बाबूराव : मेल्या, दुधीभोपळे आण ! ( छातीकडे दाखवून ) इथं दोन शिंकी बांधतो ! अडाणचोट कुठला ! ..मला काय पुतनामावशी समजलास की काय ?

दत्तू : ( काही न समजून, बाळ्याला. ) आडसरा सोलून हाड मरे ! शेंडी उडवून ( सगळे हसतात. )

बाबूराव : बेकरीत पाव आहेत का बघ जा लवकर...( बाळ्या आडसरे घेऊन पळत जातो ) धाव मार–

( हे सर्व चालू असताना मेकपवाला बाबूरावाला आंबाड्याचा टोप घालतो. )

सारंग : ( मेकपवाल्याला ) मघाशी मी आंबाड्याचा टोप मागितला, तर तू नाही म्हणालास.

मेकपवाला : अरे एक होता तो चुकून कपड्याच्या पेटीत पडला होता... आता मिळाला....

सारंग : आता मिळाला ! मी ह्या शेंडीने काम करतोय.

( मेकपवाला बाबूरावाला माळा घालतो. )

बाबूराव : ( मेकपवाल्याला ) मिशा राहिल्या.

( मेकपवाला खिशातून वस्तरा काढतो आणि हातावर पाजळतो; तो वस्तरा बाबूरावाच्या मिशीवर फिरवणार तोच. विंगेतून 'खबरदार–' असा खड्या आवाजात इशारा ऐकू येतो. पाठोपाठ बाबूरावाचा बाप येतो. त्याच्या हातात काठी आहे. तो करारी आहे. त्याच्या मिशा भरदार आहेत. )

बाप : खबरदार त्येच्या मिशांना हात लावशील तर.

सारंग : हो कोण ?

बाबूराव : ह्यो बापूस माझो !

सारंग : झालं काय ?

बाप : ( सारंगनयनेला- ) तुझ्या कानपटात व्हया ? ( सारंगनयना घाबरून मागे जातो. )

बाबूराव : अरे पण झालं काय ?

बाप : झाला काय म्हणान् विचारतंहस, तर तुका काय लाजलज्जा नाय ?

बाबूराव : पण झाला काय ता सांगशीत का नाय ?

बाप : झाला काय तां सांगशीत का नाय ह्या विचारूक तुका लाजलज्जा वाटणा नाय ?

बाबूराव : पण तू झालं काय ते सांगतच नाहीस.

बाप : ( चिडून ) अरे येडझंया, तू मिशा काढायला उठलास, तो काय तुझा बाप मेला ? तुझा हा बाप धडधडीत जिवंत असतांना...माझा मुलगा मिशा काढतो ? म्हणजे तुला हिंदुधर्माचंही काही नाही ?

बाबूराव : अरे, पण मी सुभद्रा झालोय....सुभद्रेला मिशा कशा चालतील ?

बाप : सुभद्रा झालास म्हणून तू काय लंगोटीतलं कापलं आहेस ? ( बाबूराव ओशाळून गडबडतो. बाकीचे हसतात. ) मग ओठावरचं का कापतोस ? प्राण गेला तरी मी तुला मिशा काढायला देणार नाही ! हिंदुधर्माचं पालन झालंच पाहिजे.

दत्तू : ( समेट करीत ) रवांदे रे ! रवांदे मिश्यो ! हंयच्या लोकांकनी चलता मिशयाळी सुभद्रा !

सारंग : ( बाबूरावाला ) राहूं दे ! मधून मधून रुमाल धर मिशावर— आणि मिशा दडव.

( तेवढ्यात बाळ्या धावत येतो. त्याच्या हातात दोन पाव आहेत. )

बाळ्या : ( पाव देत ) दोन बनपाव गावले....गोडे पाव....घाल तू चोळयेत....

दत्तू : नाटक झाल्यार मगे पाव माका दी हां ! गोडे पाव खावक बरे—

( बाबूराव पाव चोळीत घालतो आणे बटणे लावतो. तेवढ्यात बाहेरून लोकांची गडबड सुरू होते.)

बाबूराव : बाळ्या, आता वेळ नको ! तू पडदा उघड— ( बाळ्या धावत बाहेर येतो, आणि पडद्याची दोरी धरून उभा राहतो ) बाळ्या, पडदो उघड मरे—

बाळ्या : ( बाहेरून ) तू शिटी मार मरे—

बाबूराव : ( शिटी शोधतो... आणि ) शिटी चोळीत अडकली रे ! तू उघड पडदा !

( बाळ्या पडदा उघडतो. अर्जुन बसला आहे. हातात जपमाळ. त्याचा तोल जातो आहे. आवाजही प्यालेल्या इसमासारखा !)

अर्जुन : नाराश्वण... नारायण ! ( स्वतःशी ) ही सुभद्रा गेली कुठं ?

आवाज : घरां गेलां... घरां गेला.... तां ओकताहा रे— ( लोक हसतात.)

अर्जुन : ( जड आवाजात ) नारायण... नारायण !

सारंग : ( येऊन ) आता महाराजांना काय पाहिजे ?

अर्जुन : ( कंटाळून ) तू लांब.... लांब उभी रहा ! ही कामकरणींची पोरं हल्ली खूप उद्धट झालीत—

सारंग : ह्येना एवढं चिडायला काय झालं ?

रुक्मिणी : (येऊन) अगो, सारंगनयने, तू इथं काय करते आहेस ? तू वाड्यावर जा बघू– तिथं केवढी गडबड चालली आहे–

सारंग : कसली ? गडबड कसली ?

रुक्मिणी : अगो, सुभद्रेच्या लग्नाचा मुहूर्त ठरला ! आज वाड्यावर केळवण आणि देवकार्य आहे ! परवा आम्ही सर्वजण हास्तिनापूरला जाणार... दुर्योधनाकडे–

सारंग : म्हणजे आज सुभद्राताई महाराजांच्या सेवेला येणार नाहीत ? (अर्जुन कान देऊन ऐकतो.)

रुक्मिणी : छे ! आज तिला फुरसत कुठं आहे ? उद्या महापर्वणी ! म्हणून सकाळी समुद्रावर आंघोळीला जाईल.... तिथनंच महाराजांना निरोप देणार– आता चातुर्मास संपतो आहे ना.... तू लवकर वाड्यावर जा बघू.

सारंग : मग ह्यंच्या सेवेला कोण ?

रुक्मिणी : ह्यांचं काय ते मी बघते– (ती जाते. महाराजास) महाराज, तुमची मी काय सेवा करू ?

अर्जुन : (चिडून– पण प्यालेल्या आवाजात–) आग लागो तुझ्या सेवेला ! सुभद्रेच्या लग्नाची वार्ता आणलीस... आता मी करू तरी काय ?.... तू इथनं तोंड घेऊन जाशील तर बरी–

रुक्मिणी : अगे बाये ! हा कोणी खरा संन्यासी दिसत नाही ! हा कोणी तरी बोके संन्यासी दिसतो आहे–

अर्जुन : (चिडून) मी सुभद्रेसाठी इथं आलो...आणि तुम्ही तिचं परस्पर दुर्योधनाबरोबर लगीन लावता ? राग न येणार तर काय होणार ?

रुक्मिणी : अगे बाये ! म्हणजे हा अर्जुनराव की काय ?

अर्जुन : (स्वतःशी) आवशिक खांव ! हे लवंगाट झालं ! एकदम चिडून मी गोंधळ केला–

रुक्मिणी : आता मी जाते आणि सगळं भावजींना सांगते–

अर्जुन : (घाबरून उठतो...तोल जातो) वयनीबाय, मी अर्जुन ! तुझ्या पाया पडतो ! मला ह्यातनं सोडव– (साष्टांग नमस्कार घालता घालता पडतो.)

रुक्मिणी : अर्जुना....अर्जुना...काय हे ? उठ...उठ...(त्याला उठता येत नाही... ती चिडून) उठायला येत नाही तर एवढी प्यावी कशाला ?

अर्जुन : (उठत) नाय गो....जास्ती नाय....नवटाकभर घेतलंय...

रुक्मिणी : अरे, पण संन्यास घेतला आहेस ना ?

अर्जुन : (उठून) ते सगळं खोटं गो ! ते सगळं मी सुभद्रेसाठी केलं ! तूच काय ती आता माझी सुटका कर–

रुक्मिणी : कान कर इथं ! (त्याने कान जवळ करताच ती नाक दाबून धरते, आणि कानात सांगते.)

अर्जुन : काय म्हणतेस काय तू ? (तोल जातो.) नारायण....नारायण !
(दृश्य बदलते. समुद्र किनारा. अर्जुन आणि सुभद्रा.)

आवाज : अरे, सुभद्रेक मिश्यो आसत....मिश्यो ! मिशयाळी सुभद्रा– (लोक हसतात.)

अर्जुन : सच्चिदानंद परमेश्वर ! नारायण....नारायण ! सुभद्रे, तुझ्या वाड्यावरून आम्ही इथं समुद्रावर आलो–बरं वाटलं ! तुझा वाडा म्हणजे नुसता कोंडवाडा ! सुभद्रे, अशी जवळ ये–

सुभद्रा : (दूर होत) जरा लांब तोंड करून बोल ! शी: ! नुसता वास मारतो आहे ! पिणं पिणं म्हणजे काय तरी सुमार पाहिजे–

अर्जुन : (तोल जातो.) नाही रे ! नवटाकभर सुद्धा घेतली नाही ! पण काजूची दारू म्हणजे वास मारणारच ! ते असू दे ! (मोठ्याने) सुभद्रे, ह्या समुद्रकिनाऱ्यावरून तुला तो रैवतक पर्वत दिसतोय ना ? त्या पर्वतावर आम्ही जावया ?

सुभद्रा : जाऊ या....पण एक अट आहे–

अर्जुन : कसली अट ? सांग मगो–

सुभद्रा : तिथं ज्या गुहेत तुम्ही बसत होता ती तुम्ही मला दाखवली पाहिजे–

अर्जुन : दाखवीन ! दाखवीन मी तुला माझी ती गुहा ! चल...सांभाळून चढ हां ऽऽ (आपण पडतो. हात टेकतो.) सांभाळून...(उठत) पडशील हां ऽऽ पर्वत उंच आसा–

सुभद्रा : (मिशीवर रूमाल धरीत) अगे बाये, किती उंचावर आलो आम्ही– इथं तुमची ती गुहा कुठं आहे ? (पोटापाशी, काखेत खाजवते.)

अर्जुन : ती काय ! आत जाऊन बघून ये जा– (ती आत जाते. तोपर्यंत अर्जुन छोटी बाटली काढतो आणि पितो.)

सुभद्रा : (बाहेर येत) त्या गुहेत हे मला काय सापडलं बघा ! (ती छोटे बोचके दाखवते. सोबत धनुष्य आणि बाण !) मी हे बोचके उघडून बघू–?

अर्जुन : बघ मगो ! त्यात विचारण्यासारखं काय ?
(सुभद्रा बोचके उघडते. त्यात एक पट्ट्यापट्ट्याची अर्धी चड्डी आणि लंगोट.)

सुभद्रा : (त्या वस्तू दाखवीत–) हे बघा काय ते ! (एकदम चिडून) बाळ्या, मायझंया–

बाळ्या : (बाहेरून) पडदो सोडू ?

सुभद्रा : नको, लंगोट सोड !

बाळ्या : ( बाहेरून ) कोणाचो ?

अर्जुन : अरे, ती त्येची...बाळ्याची चूक नाय ! ह्यां बोचक्या मी ठेवला ! अर्जुन आपल्या कपड्यांचा बोचक्या घेऊन यष्टीवर गेलो. म्हणून मी माझ्या कपड्याचा बोचक्या ठेवलां ! माझे इतकेच कपडे ! लंगटी आणि चड्डी ! मी तरी काय करू ?

सुभद्रा : असू दे ! तू आता पुढचं बोल– ( छाती खाजवते )

अर्जुन : पुढचं माझं कुठं ?...पुढचं तुझं आहे !

सुभद्रा : ही वस्त्रं मी पूर्वी कुठंतरी, कुणाच्या तरी अंगावर पाहिलेली आहेत।

अर्जुन : तुझ्या अर्जुनाच्या अंगावर नाही ना ?

सुभद्रा : असतील । (आपल्याशी ) हेच ते अर्जुन नव्हेत ना ? ( उघड ) महाराज माझी एक इच्छा आहे...ती आपण पुरी कराल ? (काखा खाजवते).

अर्जुन : जरूर करीन ! काय ती सांग तरी ।

सुभद्रा : ही अर्जुनाची वस्त्रं अंगावर घालून मला दाखवा– वस्त्रे देते.

अर्जुन : ही वस्त्रं ? आता घालू ? असू दे....असू दे ! आता पुढचं बोल.

सुभद्रा : पुढचं तुझं आहे ! असं काय करतोस ? ( अंग खाजवते...मुंग्या आता लुगड्यातही शिरल्या आहेत. )

अर्जुन : तुझां ह्या चललाहा काय ? ( धनुष्यबाण हाती घेतो. )

सुभद्रा : अगे बाये, हे तर माझे अर्जुन ! ( खूप खाजवते... आणि ओरडते. ) अरे बाळ्या––

बाळ्या : ( बाहेरून ) मी हंयसर पडद्यार आसंय म रे––

सुभद्रा : अरे मेल्या, हे पाव कुठून आणलेस ?

बाळ्या : बेकरीतून ! काय झालां !

सुभद्रा : काय झालां काय ? अरे मेल्या, मला मुंग्या चावताहेत... पावात सगळ्या मुंग्या––

बाळ्या : मुंग्यो ?

अर्जुन : ते बनपाव रे... गोडे पाव... म्हणान मुंग्यो आयल्यो त्यो.

सुभद्रा : ह्या मुंग्या मला चावून चावून खाताहेत.

अर्जुन : असांदे ! गरम चहात पाव बुडयले की सगळ्यो मुंग्यो मरतल्यो.

सुभद्रा : अरे मेल्या, पण पाव जरा बघून तरी आणायचे.

अर्जुन : असू दे ! तू पुढचं बोल.

सुभद्रा : पण बलरामदादांची समजूत कशी घालणार ? दादाचा कोप म्हणजे... छे... माझं काळीज नुसतं धडधडतं आहे. ( जोराने खाजवते. )

अर्जुन : मुंग्यो चावतहत म्हणून ?

सुभद्रा : (अंगभर मुंग्या पसरतात.) छा ! या मायझंयान पाव बघून आणू नयेत ? तू पुढचं बोल ना रे—

अर्जुन : तुझं काळीज धडधडतं आहे ? बलरामदादाला समजलं तर काय होईल या भीतीनं तुझं काळीज धडधडतं आहे ? (दारूमुळे त्याला नीट बोलता येत नाही.) तू, सुभद्रे, भिऊ नकोस ! अगो, ही वस्त्रां... ही वस्त्रं हातात असली.

सुभद्रा : वस्त्रं नव्हे रे... शस्त्रं... (चोळीतला एक पाव काढून निरखून झाडते.)

अर्जुन : होय.... तेच ते ! ही शस्त्रं हातात असली म्हणजे मी कुणाला भीत नाही ! दादाला गो कोण भितो ? (तोल जातो. शस्त्रे खाली पडतात.) (अर्जुन बोलत असताना सुभद्रा चोळीतले पाव काढून झाडते आणि चोळीत ठेवते. खाजवते. तेवढ्यात संपूर्ण सूट घातलेला एक माणूस स्टेजवर येतो. तो भयानक संतापलेला आहे.) त्याचे नाव दादा रेडकर. पाठोपाठ त्याला कृष्ण आवरतो आहे. )

दादा : अरे, मायझंयानु, ह्यां चललाहा काय ?

सुभद्रा : (कृष्णाला) हा कोण ? (त्याचा सूट न्याहाळतो. कारण तो बाबूरावचाच सूट.)

कृष्ण : हो दादा—

सुभद्रा : बलरामदादा ?

कृष्ण : छा ! दादा रेडकर ! नारळाचा व्यापारी–

दादा : अरे, मी नारळ घेऊन गेलो होतो बेळगावला ! मला हीं खबरच नाही ! ट्रक घेऊन आलो तर घरात ही रडारड–

कृष्ण : कशाला ?

दादा : आमची सुशी.... माझी बहीण... ओक ओक ओकते आहे–

अर्जुन : दादा, तू माझा ऐक–

दादा : तू कोण ?

अर्जुन : मी अर्जुन– (तोल जातो)

दादा : तू अर्जुन ? तुलाच शोधतोय मी ? (अर्जुनाच्या दोन मुस्कटात देतो. तो कोलमडून पडतो.)

अर्जुन : (उठत) अरे, माका मारतंय तां मी काय केलहंय तुझां ?

दादा : (चिडून) काय केलंय ? (पुन्हा मारायला धावतो. सर्वजण त्याला धरतात) मायझंया, मोठा अर्जुन झाला आहेस ! ही मुंबै नव्हे ! लक्षात ठेव–

अर्जुन : अरे, पण माझां ऐक तू–

दादा : गांडीवर लाथ घालीन !... तुला तसा मी सोडणार नाही झालास म्हणून आपला कुणावरही बाण मारतोस ?

सुभद्रा : तू माझं ऐकशील ? तो अर्जुन हा नव्हे ! तो येष्टीवर गेला आहे–

दादा : मग हा कोण ?

सुभद्रा : हा दुसरा अर्जुन ! तो पहिला अर्जुन !

दादा : ( गोंधळतो.) बाण मारणारा कुठला ?

सुभद्रा : तो पहिला ! तो गेला येष्टीवर–

दादा : येष्टीवर ? – मी येष्टीवर जाऊन धरतो त्याला ! मायझंयाला.... त्या अर्जुनाला मी मारल्याशिवाय .... जुत्याने मारल्याशिवाय सोडणार नाही ! ( तो जायला वळणार तोच गर्गमुनी येतो. त्याचा लांब भगवा झगा दुसऱ्याच कोणाच्या तरी मापाचा असल्यामुळे जमिनीवर लोळेल एवढा लांब आहे. त्यामुळे तो झगा गर्गमुनी उचलून धरतो. त्याशिवाय त्याला चालताच येत नाही ! )

गर्गमुनी : ( संवाद फेकत ) थांबा दादा ! बळीरामदादा थांब ! शुद्धीवर ये ! असला अविचार करू नकोस !

दादा : ह्यो मायझंयो कोण ?

गर्गमुनी : मी गर्गमुनी !

दादा : ( भडकून ) बा झंवता गर्गमुनी ! तू पार्टी कोण ?
( सुभद्रा मुंग्यामुळे सारे अंग खाजवीत आहे. )

गर्गमुनी : अरे दादा, तू मला ओळखलं नाहीस ? मी परशराम आरोलकर.

दादा : ( त्याची दाढी वर करून बघत ) अरे मेल्या, परशरामा, तू गर्गमुनी केव्हापासून ? आणि हल्ली करतोस काय ?

गर्गमुनी : हल्ली संपावर ! डॉ. सामंताचं तिकिट काढलंय.

दादा : ( घाईघाईने ) ते सगळं मग बोलू या ! मी धावत येष्टीवर जातो ! आणि त्या अर्जुनाला धरतो.... ( खात्री करण्यासाठी ) अर्जुन पहिला की दुसरा ?

गर्गमुनी : पहिला ! पण तू तिथं जाऊ नकोस ?

दादा : ( नाटकी आवाजात ) जाऊ नको ? माझी सुशी भळभळा ओकते आहे....आणि तू म्हणतोस जाऊ नकोस ? अर्जुनाला मारू नकोस ?

गर्गमुनी : ( सुभद्रेला ) बाबल्या, दादाला सत्तर रुपये दे.

दादा : ( चिडून ) सत्तर ? सत्तर रुपय त काय होता ?

गर्गमुनी : गर्भपात होता !

दादा : ते सोड ! माझं मी बघेन !.... आता अर्जुन जिवंत राहत नाही !

गर्गमुनी : ( नाटकी आवाजात संवाद फेकतो. ) थांब दादा ! बळीरामदादा, थांब ! बुद्धीवर ये ! असला अविचार करू नकोस.

दादा : ( चिडून ) हे तू कोणाला सांगतो आहेस ? तू कोण स्वतःला गर्गमुनी समजतास की काय ?.... अरे, जा....जा... !
( हे सर्व चालू असताना सुभद्रा सारे अंग खाजवीत आहे. पाव काढून झाडीत आहे. दत्तूही मुंग्या झाडण्यात त्याला मदत करतो आहे ! )

सुभद्रा : ( कळवळून ) अरे, बाबानो, त्याला जाऊं दे येष्टीवर ! आपण हे नाटक लवकर आटपूया. मी हे सगळं कधी सोडतो असं मला झालंय.
( तेवढ्यात पाठीमागे दादाची आई मोठ्याने हंबरडा फोडते. )

दादा : ( दचकून ) कोण...कोण ? काय झालं ? रडलं कोण ?

बाळ्या : ( धावत येतो. ) दादा, तुझी आई रडते आहे...सुशी पळाली. मुंबैला गेली. अर्जुनाबरोबर !

दादा : ( भडकतो. ) काय ? सुशी मुंबैला गेली ? अर्जुनाबरोबर ? ती काय स्वतःला सुभद्रा समजते की काय ? हा मी निघालो—

गर्गमुनी : थांब दादा, थांब ! असला अविचार करू नकोस ! सुभद्रा एकवीस वर्षाची आहे ! कायद्याने तुला तिला अटकाव करता येत नाही ! त्यापेक्षा तू बऱ्या बोलाने तिच्या लग्नाला संमती दे !

दादा : अरे, पण जातीपातीचं कांय आहे की नाही ? त्या अर्जुनाची जात काय ?

गर्गमुनी : तू जातीपातीचा विचार करू नकोस ! तू जातीपातीचा विचार केलास तर जातपात मानणारेच तुला प्रतिगामी म्हणतील ! तू या लग्नाला— आंतरजातीय लग्नाला— संमती दिलीस तर काही न करता तू एका रात्रीत पुरोगामी होशील ! ज्या लोकांनी आपल्या मुलामुलींची लग्नं आपल्या जातीत केली ते सगळे तुझा सत्कार करतील ! वर्तमानपत्रात तुझा फोटो छापून येईल ! शिवाय सरकारकडून तुला पाच हजार रुपये मिळतील !

दादा : (विचार करीत—) असं म्हणतोस ? मग जरूर विचार करावा लागेल !

बाळ्या : (आनंदाने पडद्यात बघत—) आवशिक खांव ! तां बघा काय तां—
(सगळे पडद्यात बघतात ... अर्जुन आणि सुशी येतात.)

गर्गमुनी : तुमची दोनाची येष्टी चुकली का काय ?

अर्जुन : आज येष्टी वेळेवर सुटली !

गर्गमुनी : अरे वेळेवर सुटली ते सोडा ! पण वेळेवर आली कशी ?

कृष्ण : मुनिवर्य, ती माझीच करणी !

**गर्गमुनी** : ते बरोबर ! तू येष्टीचाच कंडक्टर ! (दादाला) दादा, आता वेळ नको ! तू अर्जुनाचा हात हातात घे ! आणि सुभद्रेच्या हातात दे ! (दादा तसे करतो.) अर्जुना, तू खूप घाई केलीस ! मेल्या लग्न होईपर्यन्त तरी थांबायचंस. हल्ली त्या निरोधच्या थैल्या मिळतात ना ? त्या तरी वापरायच्या. भात्यात बाण आहे म्हणून आपला मारतोस ? असू दे ! तू आता दादाच्या पाया पड ! आणि हुंडा नको म्हणून सांग -

**दादा** : असू दे ! काय केलंस ते केलंस ! इलाज नाही ! (आशीर्वाद देतो) तुमचं कल्याण होवो !

**गर्गमुनी** : ! झालं ना ? आता आपण प्रार्थना करू या—हात जोडा (सर्वजण हात जोडून प्रार्थना करतात.)

'वसो नृपतिच्या मनी सदयता समाबुद्धि ती ।
प्रजाजनहि सूद्यमें करुत आत्मदेशोन्नती ॥
सुकाव्यरचनी असो सुलभ ती कवींना मती ।
स्वयंभु सकलां जनां निपजवो सुकाव्यीं रती ॥'

॥ पडदा ॥

॥ दुसरा अंक समाप्त ॥

IRBK-0121462

IRBK-0121462

म. ग्रं. सं. ठाणे,
क्र. २९.७.८२ नों. दि. ३१०५८६
३१२